# कृत्तिका

[ निबंध संग्रह ]

पुरुषोत्तम मंगेश लाड

केशव भिकाजी ढवळे : मुंबई ४

प्रथमावृत्ति
२९ जानेवारी, १९४५

प्रकाशक
के. भि. ढवळे,
श्रीसमर्थ-सदन,
मुंबई ४

सर्व हक्क
लेखकाचे स्वाधीन

मुद्रक
र. रा. बखले,
मुंबईवैभव प्रेस,
मुंबई ४

किंमत
दीड रुपया

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| प्रस्तावना | ... | ... | [ पांच ] |
| अर्थशास्त्राचें स्वरूप | ... | ... | १ |
| मराठी भाषेचा आदर्श कोश | | ... | ९ |
| ललितवाङ्मय, ध्येयवाद व नवमतवाद | | | ३० |
| भारतीय कलेचा पुनर्जन्म | | ... | ४८ |
| वाङ्मय आणि टीका | | ... | ५७ |
| कवीचें कार्य | ... | ... | ७३ |


नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत
ता. ........
सातारा

" कृत्तिकास्वग्नीऽआदधीत ।
एता वाऽअग्निनक्षत्रम् । ....
एताऽएव भूयिष्ठा यत्कृत्तिका-
स्तद्भूमानमेवैतदुपैति तस्मा-
त्कृत्तिकास्वादधीत ॥ २ ॥
एता ह वै प्राच्यै दिशो न च्यवन्ते । "

—शतपथब्राह्मण, २·१·२

# प्रस्तावना

स्फुट पद्यांचा थोडासा मधुपर्क सादर करतांनाच गद्याचा विखुरलेला संभार—स्वल्प कां होईना—गोळा करावा असें मीं योजिलें होतें. त्या योजनेनुसार केवळ परीक्षणात्मक आणि म्हणूनच कांहीं अंशीं परभृत असें लिखाण वगळून इतर सहा निबंध प्रकाशनाच्या कालक्रमानें या संग्रहांत मांडले आहेत. तळटीपेंत दिलेल्या प्रकाशनाच्या कालाकडे लक्ष दिल्यास त्या वेळीं त्या त्या विषयाचें नावीन्य कसें होतें हें ध्यानांत येईल. पहिले तीन निबंध विशिष्ट कल्पनांच्या पुरस्कारार्थ मूळांतच लिहिले गेले, तर शेवटचे तीन मूळच्या भाषणांतून मागाहून लिहून काढले. अक्षररूप पावतांना वाङ्मयावर वाणीचा ठसा साहजिक राहणारच. पहिले दोन निबंध कांहींसे अपुरे वाटतात याची मला जाणीव आहे. काळवेळ अनुकूल झाल्यास पुढेंमागें ही उणीव भरून काढतां येईल. आज हे सहा निबंध फेरफार न करतां छापीत आहें. ते संग्रहित करतांना ज्यांनीं ते पूर्वीं वेळोवेळीं प्रसिद्ध केले त्यांचे पुनः एकवार आभार मानतों.

" कृत्तिका " या नांवासंबंधीं चार शब्द लिहिणें आवश्यक आहे असें मला वाटतें. वाचक या तारा–मैत्रकाविषयीं नाहक बुचकळ्यांत पडावयास नको. हें उघडच आहे, कीं दुसऱ्याच्या पुस्तकास नांव ठेवणें जितकें सोपें त्याहून स्वतःच्या पुस्तकास नांव ठेवणें फारच कठीण. तशांत या संग्रहांतील निबंधांचे विषय निरनिराळे आणि परस्परविभिन्न. त्यांना एकसूत्रीपणा देणारें समर्पक पण सुटसुटीत नांव काय द्यावें याची मला जराशी विवंचनाच पडली होती. अशा वेळीं माझे एक मित्र सहज म्हणाले, " अहो ! तुमच्या संग्रहांत कोश, कला, काव्य इत्यादि क-कारांचा भरणा अधिक दिसतो व निबंधांची संख्या सुद्धां सहा आहे. मग कृत्तिका नांव कां नाहीं ठेवीत ? " विचार करतां करतां संख्या-वर्णांइतकेंच इतर बाबतींत देखील कृत्तिका हें नांव मला सूचक व उचित वाटूं लागलें. नक्षत्राचें नांव असलेली कन्या वरूं नये असा मनूचा नियम होता; पण नक्षत्राचें नांव असलेलें पुस्तक वाचूं नये असा साहित्यशास्त्राचा कानू असल्याचें कोठेंच ऐकिवांत नाहीं. कृत्तिका शब्दाची

व्युत्पत्ति कृत् म्हणजे कांतणें किंवा कृत् म्हणजे कापणें या दोन्ही धातूंपासून सिद्ध करतात. तेव्हां धागेदोरे एकत्र आणून कंथा[1] करावयाची असो किंवा पिकाची कापणी करून जुडगा बांधावयाचा असो, त्या कृतीस कृत्तिका हेंच अभिधान साजेल. या संग्रहांतील निबंधांत कृत्तिकांतील ताऱ्यांप्रमाणें कांहीं संलग्न तर दुसरे दूरचे आणि विभिन्न. योगायोगानें एकत्र आले एवढेंच. त्यांचा झुबका दिसला तरी संघटन थोडेंसें विस्कळितच राहावयाचें.[2] पूर्व आणि पश्चिम हीं किप्लिंगच्या मतें कधीं न सांधतां येणारीं टोकें जोडण्याचा या निबंधांत वारंवार प्रयत्न झाला आहे. या प्रयत्नांच्या योगतारा होण्यास कृत्तिकाच सर्वथैव योग्य. कारण चीनपासून ग्रीसपर्यंत कृत्तिकांची समान मनानें लोक पूजा करीत आले आहेत. इंग्लडांतील आर्थर्स सीट्स्, इजिप्तचे पिरामिड्, ग्रीसमधील पार्थेनॉन्, हीं सर्व कृत्तिकांच्या वेदीसाठीं अस्तित्वांत आलेलीं स्थळें असें समजतात[3]. चिनी आणि आर्य नक्षत्रगणनेचा कृत्तिकांनींच आरंभ करीत असत. आज सुद्धां कार्तिक महिन्यानेंच आपण संवताचा आरंभ धरितों. कृत्तिका या देवनक्षत्रावर अग्नीचें आधान करावें अशी आपल्या पूर्वजांची शिफारस होती. तसें केल्यानें विपुलता प्राप्त होते असें ते मानीत असत. त्यांच्या काळीं थेट पूर्वेवरच कृत्तिका अढळ होत्या.[4] तेव्हां पौर्वात्य आर्यांची परंपरा विशेष साक्षेपानें संभाळणाऱ्या या निबंधांस कृत्तिका खचित मार्गदर्शक व्हाव्यात.

या अशा अनेक संकेतांस्तव कृत्तिका हें नांव मला पसंत पडलें. परंतु ज्योतिर्गणिताची एक मोठीच अडचण आड येऊं लागली; ती ही, कीं कृत्तिकांची संख्या नक्की सहा कीं सात याविषयीं मतभेद दिसूं लागला. अधिक खोलांत गेल्यानें असें ठरलें, कीं फार पुरातन काळीं कृत्तिका जरी सात दिसत असत, तरी आज त्या सहाच दिसतात व शास्त्रज्ञांप्रमाणें सहाच गणाव्यात. शतपथब्राह्मणाच्या फार पूर्वीं लिहिलेल्या तैत्तिरीय ब्राह्मणांत त्यांचीं अंब्रादि सात नांवें

१. “इयम् अपि इतरा कृत्तिः एतस्मात् एव सूत्रमयी,” यास्क निरुक्त ५, २२. २. The System of the Stars : Clerke, p. 226. ३. Star Lore of All Ages; Olcott, p. 410. ४. पुस्तकाच्या आरंभीं छापलेलें शतपथब्राह्मणांतील अवतरण पहा.

दिलीं आहेत. परंतु पुढें पुराणकालीं त्या सहाच मानल्या आहेत. याचा उत्कृष्ट पुरावा महाभारतांतील वनपर्वांतर्गत तीर्थयात्रापर्वाच्या अष्टावक्रीयांत सांपडतो. बंदी आणि अष्टावक्र यांच्या संख्याज्ञानाच्या अहमहमिकेंत सहा या संख्येच्या उदाहरणांत "षडिन्द्रियाण्युत षट् कृत्तिकाश्च।" असा स्पष्ट निर्देश आहे. कार्तिकेय हा षाण्मातुर आहे हें सुप्रसिद्धच आहे. सातवी कृत्तिका फार प्राचीन कालीं दिसत असे. ती हळू हळू लुप्तप्रभ होऊन दिसेनाशी झाली हा समज जगांतील सर्व राष्ट्रांत सारखाच आढळून येतो.[१] आज कृत्तिकांच्या पुंजांत तिसऱ्या प्रतीची एक, पांचव्या प्रतीच्या तीन, सहाव्या प्रतीच्या दोन आणि अनेक लहान अशा तारा आहेत; आणि शिवाय तेजोमेघ. अर्थात् नुसत्या डोळ्यांनीं सहापेक्षां अधिक तारा दिसणें शक्य नाहीं असें ज्योतिर्विदच सांगतात. काझ्विनी या तेराव्या शतकांतल्या ज्योतिर्विदानें वर्णन केल्याप्रमाणें या पुंजाचा एकंदर देखावा "सहा तेजस्वी तारा व मध्यंतरीं बऱ्याचशा अंधुक तारका" असाच दिसतो.[२] सारांश, शास्त्र आणि पुराण यांनीं सहा हीच संख्या मुक्रर केली आहे.

असो. देवांचा सेनानी स्कंद त्याच्या ज्या माता, अग्नीच्या ज्या सख्या, त्या कृत्तिकांच्या नांवें हा लहानसा निबंधसंग्रह सादर करितांना "अग्निर्नः पातु कृत्तिकाः।[२]" या प्रार्थनेनें ही प्रस्तावना पुरी करितों.

बेळगांव, २२·१·१९४५ **पु. मं. लाड**

★

१. Star Lore of All Ages, p. 420; The System of the Stars, pp. 217–218. २. तैत्तिरीयब्राह्मण, ३. १. १. १.

# .१. अर्थशास्त्राचें स्वरूप*

**‘अर्थ एव प्रधानः। अर्थमूलौ हि धर्मकामौ।’**

—कौटिल्य, अधि. १, अ. ७.

अर्थशास्त्र हें गौडबंगाल आहे तरी काय? ‘मातींत सोनें मिळतें’ असलीं सोंगें तर्कांत सांपडतात; तर ‘सोनें मातीप्रमाणें आहे’ असला परमहंसी उपदेश अध्यात्मांत मिळतो. अर्थशास्त्रास मात्र “प्रपंचीं पाहिजे सुवर्ण” या व्यावहारिक सत्याची पुरी जाणीव आहे; कारण हें तर बोलून चालून ‘अर्था’चेंच शास्त्र! ब्रह्म म्हणजे काय? आत्म्याचें परमात्म्याशीं नातें कोणच्या प्रकारचें? असल्या प्रापंचिक मनुष्यास शुष्क वाटणाऱ्या गोष्टींचा काथ्याकूट करणारे तत्त्वज्ञानी पंडित आपण पाहतों. त्यांच्या या उदंड कल्पनांपासून निश्चित लभ्यांश मात्र कांहींच नाहीं; त्यांच्या शास्त्राचा प्रारंभ ‘अथातो ब्रह्मजिज्ञासा’ या महासूत्रानेंच व्हावयाचा; पण ही त्यांची तत्त्वजिज्ञासा इतकी प्रबळ असते कीं ती त्यांस स्वस्थ म्हणून बसूं देत नाहीं. त्या जिज्ञासेंतच अध्यात्माचा उगम, व ज्ञानप्राप्ति हेंच त्याचें ध्येय. पण विचारी पुरुषांना समाजाविषयीं जी कळकळ वाटते त्या कळकळींत अर्थशास्त्राचा खरा उगम झालेला आहे; केवळ ज्ञानलालसेंत नव्हे. श्रीमंतांची चैन व ऐषआराम आणि गरिबांचें दैन्य व हलाखी हीं दोन चित्रें आपल्या डोळ्यांपुढें सतत उभीं असतात. ज्यांस खावयास पोटभर अन्न आणि नेसावयास अंगभर वस्त्र मिळत नाहीं, अशा गरीब लोकांचाच समाजांत जास्त भरणा असतो. त्यांच्या जीवितांत कांहीं सुधारणा करणें शक्य आहे कीं नाहीं? व ती कोणत्या उपायांनीं करितां येईल? हे प्रश्न विचारी महात्म्यांच्या हृदयास सदैव जाचत असतात. पण ज्याप्रमाणें रोग बरे कसे करावे हें शिकण्यापूर्वी प्रथम माणसाच्या शरीराचे व्यापार कसे चालतात याची माहिती करून घ्यावी लागते त्याप्रमाणें समाजाच्या या दुःसाध्य दारिद्र्यरोगावर उपाय सुचविण्यापूर्वी प्रथम समाजाचे आर्थिक व्यापार वस्तुतः कसे-काय चालले आहेत हें समजून घेणें भाग आहे व तें समजावून देणें हेंच अर्थशास्त्राचें कार्य. अर्थशास्त्रानें घालून दिलेल्या पायावर सुधारणेची इमारत उठवितां येईल; किंबहुना अशा सुधारणेच्या कार्यास

* लोकशिक्षण, वर्ष २, अंक ३, मार्च १९२९.

मदत करणें हाच अर्थशास्त्राच्या अस्तित्वाचा खरा हेतु; व समाजाचें आर्थिक कल्याण ज्या मार्गानें होईल तो मार्ग दाखविणें हेंच त्याचें अंतिम ध्येय.

तेव्हां वरील हेतूस अनुसरूनच अर्थशास्त्राची व्याख्या केली पाहिजे; आणि असली चर्चा मराठींत थोडीबहुत नवीन असल्यामुळें, या शास्त्राचें स्वरूप उघड व स्पष्ट करून सांगणारी अशी जेवढी समर्पक व्याख्या करतां येईल तेवढी ती करण्याचा प्रयत्न होणें इष्ट आहे. यास्तव प्रारंभींच "अर्थशास्त्र" यांतील "अर्थ" या शब्दाचा "भावार्थ" स्पष्ट करूं. मराठींत ह्या शास्त्राचीं मूलतत्त्वें विशद करण्याचे दोन चार प्रयत्न आजवर झाले आहेत. परंतु ते प्रायः भाषान्तरवजा व किरकोळ. मुख्यत्वें इंग्रजी ग्रंथांच्या आधारेंच पण थोड्याशा स्वतंत्र बुद्धीनें लिहिलेलें पहिलें अर्थशास्त्रावरील पुस्तक म्हटलें म्हणजे फर्ग्युसन कॉलेजांतील अर्थशास्त्राचे माजी अध्यापक प्रो. गो. चि. भाटे यांचें होय. हें पुस्तकही प्रसिद्ध होऊन आज दीड तप उलटलें. पण या कालांत व मुख्यतः गेल्या दहा बारा वर्षांत आपल्या विद्यापीठांतून ह्या विषयाच्या अध्ययनाध्यापनाकडे प्रवृत्ति होऊं लागल्यानंतर नुकतेंच गतवर्षी अर्थशास्त्रावर आणखी एक नवीन मराठी पुस्तक त्याच कॉलेजांतील हल्लींचे प्रसिद्ध अध्यापक प्रो. वा. गो. काळे आणि प्रो. द. गो. कर्वे यांनीं लिहून प्रसिद्ध केलें आहे हें सुचिह्न होय. तथापि प्रस्तुत ग्रंथांत देखील 'अर्थ' या शब्दाची प्रोफेसरद्वयांनीं बरीच ओढाताण केलेली आढळते. इंग्रजींत ज्यांना Economic Goods किंवा "आर्थिक वस्तु" म्हणतात, त्यांना समानार्थक प्रतिशब्द म्हणून त्यांनीं 'अर्थ' ह्या शब्दाची योजना केलेली दिसते. ते म्हणतातः–"यावरून 'अर्थ' या शब्दाची व्याख्या 'मनुष्याच्या आधिभौतिक सुखाचें जें साधन मिळविण्यास तो आपलें आलस्य व ऐदीपणा सोडून कांहींतरी श्रम करण्यास व त्रास सोसण्यास तयार होतो तें साधन' अशी करावी लागते." आणि मग साहजिकच आधारासाठीं त्यांना मोरोपंतांच्या एका आर्येकडे धांव घ्यावी लागली! अर्थ हा शब्द आपण पैसा किंवा धन[1] यासाठीं बहुशः वापरितों; हा झाला अर्थ

१. उदाहरणार्थ—"अर्थमनर्थं भावय नित्यम्...पुत्रादपि धनभाजां भीतिः।" (शंकराचार्य) किंवा 'निष्क्रष्टुमर्थं चकमे कुबेरात्।' व 'अथोष्ट्रवामीशतवाहितार्थम्।' (रघुवंश ५. २६, ३२)-या श्लोकांत **अर्थ**=धन.

या शब्दाचा नित्याचा मर्यादित व संकुचित आशयाचा प्रयोग. पण तोच शब्द जरा व्यापक रीतीनें योजिला म्हणजे 'धर्मार्थकाम' या त्रिवर्गातील अर्थपदवी पावतो; व हा 'अर्थ' शब्द आपणा सर्वांच्या ओळखीचा आहे. आमच्या मतें 'अर्थशास्त्र' ह्यांतील अर्थाचा हाच प्रयोग मुक्रर करून टाकावा हें बरें, व ही सूचना नवीन नसून अगदीं 'अभिमत' अशीच आहे. कारण कौटिल्यानें आपल्या ग्रंथाच्या शेवटच्या प्रकरणांत "**मनुष्याणां वृत्तिरर्थः**" अशीच अर्थाची व्याख्या केली आहे. 'वृत्ति' म्हणजे जीवनाचा किंवा चरितार्थाचा नेहमींचा व्यवहार असें म्हणतां येईल; व मग तदनुरोधानें अर्थशास्त्र म्हणजे "नित्याच्या व्यवहारधंद्यांतील माणसांच्या वागणुकीची चर्चा करणारें शास्त्र" अशी अर्थशास्त्राची व्याख्या करितां येईल. ही व्याख्या अगदीं शास्त्रसंमत[1] आहे. अर्थशास्त्राचा संबंध निर्जीव व जड संपत्तीशीं नसून जिवंत व सचेतन माणसांशीं आहे ही गोष्ट या व्याख्येवरून मनांत तत्काळ ठसते, हा तिचा मुख्य गुण होय; व म्हणूनच काळे व कर्वे या प्रोफेसरद्वयांची 'आधिभौतिक सुखसाधनांचें शास्त्र' ही व्याख्या, किंवा प्रो. भाटे यांनीं स्वीकारलेली 'राष्ट्राच्या संपत्तीचें खरें स्वरूप व त्याच्या उत्पत्तीचीं कारणें यांचें विवेचन करणारें शास्त्र' ही ॲडम् स्मिथ्ची व्याख्या, या दोहोंपेक्षां वरील व्याख्या जास्त अन्वर्थक, सूचक व समर्पक आहे. शिवाय तींतील 'अर्थ' शब्दाचा उपयोग स्वाभाविक व सनातन आहे हा तिचा दुसरा विशेष होय.

आणखी या व्याख्येवरून असें दिसून येईल कीं अर्थशास्त्र हा समाजशास्त्राचा एक पोटभाग आहे. समाजाचा एक घटक या नात्यानें माणसांच्या वैयक्तिक व सामुदायिक वागणुकीची समाजशास्त्राकडून सर्व बाजूंनीं चर्चा होते. अर्थशास्त्राचा व्याप एवढा विस्तृत नाहीं; फक्त "आर्थिक" वागणुकीशीं त्याचा संबंध येतो. आतां, मनुष्याच्या वर्तनाचे किंवा कृतींचे आर्थिक व आर्थिकेतर असे दोन विभाग कल्पिणें ही आधींच कृत्रिम गोष्ट होय; व तशांतही या प्रत्येक विभागाच्या अगदीं रेखीव सीमा आंखून देणें हें तर

---

१. "Political Economy or Economics is a study of mankind in the ordinary business of life." Marshall—*Principles of Economics*, p. l.

दुरापास्तच. तथापि सामान्य माणसास आर्थिक बाबी कोणच्या हें विशेष प्रयासावांचून सहज कळतें. निळा किंवा तांबडा रंग कोणचा हें कळण्यास ज्याप्रमाणें एक लांबलचक शास्त्रोक्त व्याख्या द्यावी लागत नाहीं, त्याप्रमाणेंच आर्थिक बाबी कोणच्या याची फोड करून सांगण्यास शास्त्रज्ञांस कांहीं उरस्फोड करावयास नको ! माणसास सदेह वैकुंठास जातां येतें कीं नाहीं, किंवा स्त्रियांनीं व शूद्रांनीं वेदाध्ययन करावें कीं नाहीं, असले प्रश्न " आर्थिक " नव्हत हें कोणीही चटकन् सांगेल. तथापि, शास्त्रीय रीतीनें चर्चा करणें सोपें जावें म्हणून, ज्या कृतींचें किंवा वागणुकीचें अर्थानें म्हणजे पैशानें मोल ठरवितां येतें ती वागणूक किंवा ती कृति ' आर्थिक ' असें आम्ही मानून चालतों. कोणत्याही शास्त्रास अगदीं मुळांतच दोन गोष्टींची जरूरी असते. एकतर ज्या वस्तूंची चर्चा करावयाची त्या सुसंलग्न अशा असल्या पाहिजेत, व दुसरें त्यांची परस्पर तुलना करण्यासाठीं सर्वसाधारण असें एक परिमाण किंवा माप असलें पाहिजे. अर्थ म्हणजे पैसा हें अर्थशास्त्राचें माप होय. माणसांच्या ज्या वर्तनाची व कृतींची या मापानें मोजणी करतां येते, फक्त त्याच कृतींशीं व वर्तनाशीं अर्थशास्त्राचा प्रत्यक्ष संबंध येतो. माणसांच्या नेहमींच्या व्यवहारांतील बऱ्याचशा कृतींची पैसा ह्या परिमाणानें मोजणी करतां येते; व ह्या कृती अन्योन्यसंबंधानें निगडित आहेत हेंही निर्विवाद आहे. यावरून पैसा हें माणसाचें अंतिम ध्येय आहे अशीच अर्थशास्त्राची शिकवण आहे, असा मात्र कोणी आपला गैरसमज करून घेऊं नये. अर्थशास्त्राचें म्हणणें एवढेंच कीं मानवी आचरणाचा **प्रायः** पैसा हा **प्रधान** हेतु असतो. ' जनांचा लालची स्वभाव ' असल्याचें रामदासस्वामीसुद्धां कबूल करतात, व पैशाकरितांच आपल्या आयुष्यांतील बरीचशी खटपट असते हें कोणीही समंजस मनुष्य नाकबूल करणार नाहीं. दैवी संपत्तीची व सात्त्विक गुणांची शेखी मिरविणाऱ्या आपल्या हिंदुस्थानांतसुद्धां अगदीं जुन्या काळापासून ' अर्थस्य पुरुषो दासः ' ही तक्रार चालत आलेली आहे. सगळेच लोक सदैव 'कांचनभटजी'प्रमाणें वागतात असें अर्थशास्त्राचें बिलकुल म्हणणें नाहीं. स्वामिभक्तिसाठीं एकादा खंडो बल्लाळ राखेचे तोबरे घेतो, तर परोपकारार्थ एकादा दामाजीपंत धान्याचीं पेवें लुटावितो. पुत्रप्रेमामुळें

नगर वाचनालय, सातारा.



किंवा पतिपरायणतेसाठीं पुष्कळ स्त्रिया जिवापाड श्रम करितात. पण या उच्च हेतूंची व उदात्त भावनांची प्रेरणा सदासर्वकाळ सारखीच टिकत नाहीं. शिवाय ह्या भिन्न भिन्न कृतींची तुलना करण्यास साधारण परिमाण तरी काय लावावयाचें ? व परिमाणाच्या अभावीं यांचा अन्योन्यसंबंध शोधून काढावयाचा तरी कसा ? आणि म्हणूनच अर्थशास्त्रास आपला व्याप मोठ्या कष्टानें आकुंचित करून या उच्च आर्थिकेतर कृतींना आपल्या कक्षेंतून वगळावें लागतें. पण त्यांचें महत्त्व अर्थशास्त्र कधींही विसरत नाहीं.

आतां कोणीही साहजिकच असें विचारील कीं असल्या आर्थिक बाबींची चर्चा करण्यास पुस्तकी शास्त्रज्ञ कशास हवेत ? हरघडी असल्या घडामोडींत स्वतः भाग घेणारे, अगदीं त्यांत घोळलेले मुरब्बी, व्यापारी व धंदेवाले लोकच या कार्यास जास्त लायक होत. शास्त्रज्ञांचें ज्ञान पढीक किंवा ऐकीव असावयाचें. स्वानुभवापुढें त्याची काय मातब्बरी ? याचें उत्तर अगदीं उघड आहे. धंदेवाईक लोकांचें ध्येय म्हटलें म्हणजे नफा जास्त कमावून **स्वतः** श्रीमंत व्हावें; आपल्यापलीकडे इतर जग आहे याची त्यांना जाणीव नसते; व असली तरी पुष्कळदां त्यांना त्याची पर्वाही नसते. पण व्यक्तीपेक्षां समाज कसा श्रीमंत होईल याचा अर्थशास्त्रास विचार करावा लागतो, व पुष्कळदां व्यक्तीची श्रीमंती सामाजिक कल्याणास कशी विघातक होते हें स्पष्ट करून दाखविणेंच अर्थशास्त्राचें प्रमुख कर्तव्य होऊन बसतें. बायकां-मुलांकडून थोड्याशा रोजमुऱ्यावर कारखान्यांत रगड काम करून घेतल्यानें एकाद्या कारखानदाराच्या धंद्याची भरभराट होईल; पण त्यांत समाजाची बरकत होत नसून उलटी हानि होत आहे हें कटु सत्य अर्थशास्त्रास लोकांपुढें मांडावें लागतें. तसेंच धंदेवाल्यांना जरी वर्तमानकाळापलीकडे बघण्याची आवश्यकता नसली, तरी अर्थशास्त्रास आपली दृष्टि मागें पुढें बरीच लांबवर पोंचवावी लागते. कारण समाजाचें अस्तित्व कालाबाधित आहे, व म्हणूनच जंगलें तोडून लांकूड विकण्यांत किंवा खाणी भराभर उपसण्यांत आज जरी फायदा दिसला तरी तो मिथ्याभास असून आपण पुढच्या पिढ्यांच्या सुखाच्या आड येत आहोंत याची अर्थशास्त्र जाणीव करून देतें. अशा व्यापक चिकित्सक दृष्टीनें आपल्या सभोंवतालीं चालणाऱ्या घडामोडींची मीमांसा

करणें हें काम धंदेवाईक माणसांचें नव्हे. असला नीरस व निरर्थक उपद्व्याप ते करतील तरी कशाला ?

पण माणसांच्या आर्थिक वर्तणुकीची अशी सोपपत्तिक मीमांसा करून, तिचें खरें स्वरूप शोधून काढून, कार्यकारणांचा योग्य संबंध दाखविणें व त्यांचा मेळ घालणारे सिद्धांत बसविणें हेंच तर अर्थशास्त्रज्ञाचें खरें काम. अर्थशास्त्राची माहिती होण्यास ह्या सिद्धांतांचें खरें स्वरूप समजून घेणें आवश्यक आहे. एकाद्या विशिष्ट परिस्थितींत समाजांतील माणसें एका विशिष्ट तऱ्हेनें वागतील अशा प्रकारचें, आर्थिक वागणुकीविषयींचें, जें अपेक्षात्मक विधान त्यास " आर्थिक सिद्धांत " म्हणतात.[1] कापडाची किंमत उतरली तर लोक जास्त कापड खरेदी करतील; किंवा कोणीही मक्तेदार (मोनॉपोलिस्ट) स्वतःचा जास्तींत जास्त फायदा होईल अशाच रीतीनें आपल्या मालाची विक्री करील; हीं आर्थिक सिद्धांतांचीं अगदीं साधीं उदाहरणें होत. निरीक्षणाच्या बळावर रचिलेले सिद्धांत बहुशः अनुमानाच्या धर्तीवरच असतात. तथापि, प्रसंग पडल्यास, उपपत्तिप्रधान विवेचनपद्धतीचा अवलंब करून, या मूलप्रमेयांपासून निघालेलीं उपप्रमेयेंसुद्धां अर्थशास्त्रांत मांडिलीं जातात. माणसें वागतील कशीं याची दिशा दाखविणें ही या ठोकळ अनुमानांची कामगिरी. पण त्या वर्तणुकीचें अगदीं कांटेतोल पद्धतीनें मोजमाप करून परिमाणात्मक अथवा गणनात्मक सिद्धांत बांधणें ही गोष्ट सध्यां तरी अर्थशास्त्राच्या आटोक्यांतील नाहीं. किंमत उतरल्यास लोक जास्त कापड खरेदी करतील एवढें सांगूनच अर्थशास्त्रास स्वस्थ बसावें लागतें; परंतु अगदीं बरोबर मागणी किती वाढेल हें सांगणें दुरापास्तच. कारण अशा तऱ्हेचें गणिती विधान करण्यास पदार्थविज्ञानादि इतर शास्त्रांस जीं साधनें अनुकूल आहेत, तीं अर्थशास्त्राचे नशिबीं नाहींत.

---

१. " A Social Law is a statement of social tendencies; that is, a statement that a certain course of action may be expected under certain conditions from the members of a social group. Economic Laws or Statements of economic tendencies, are those social laws which relate to branches of conduct, in which the strength of the motives chiefly concerned can be measured by a money price. " Marshall-*Principles*, p. 33.

प्रत्यक्ष प्रयोग करून पडताळा घेतां आल्याखेरीज असलीं विधानें कशीं करितां येतील ? पण समाजावर नाना तऱ्हेचे प्रयोग करून बघण्याचें स्वातंत्र्य गरीब बिचाऱ्या अर्थशास्त्रज्ञास देतो कोण ? म्हणूनच "प्रचितीविण जें ज्ञान । तो अवघाचि अनुमान ।" ही रामदासांची उक्ति या सिद्धांतांस लागू पडते. आधींच माणसांच्या वागणुकीची चर्चा मोठी गुंतागुंतीची असते. तशांत साऱ्या साधकबाधक गोष्टींचा एकसमयावच्छेदेंकरून विचार करणें हें अशक्यप्रायच. म्हणून अर्थशास्त्रज्ञाला पायरीपायरीनें वर जावें लागतें. आधीं वगळलेलीं बाधक प्रमाणें क्रमाक्रमानें ध्यानांत घेऊन अर्थशास्त्रज्ञ आपला मार्ग पुढें क्रमीत असतो; यामुळें त्याचे सिद्धांत बहुशः अपुरे असेच भासतात; व "बाधक कारणांच्या अभावीं"च आमचीं तत्त्वें खरीं आहेत ही पुस्ती त्याला पदोपदीं जोडावी लागते. असें असलें तरी, आधिभौतिक शास्त्राचे सिद्धांत व आर्थिक सिद्धांत हीं शास्त्रीय दृष्ट्या भावंडेंच होत. आंकडेशास्त्राच्या मदतीनें दिवसेंदिवस अर्थशास्त्र आपलीं तत्त्वें गणनात्मक करण्याच्या मार्गास लागत आहे. तसेंच आधुनिक अर्थशास्त्रज्ञ आपल्या सिद्धांतांपैकीं व्यक्तिप्रधान, समाजप्रधान इत्यादि भिन्न समाजरचनेस सारखेच लागू पडणारे त्रिकालाबाधित सिद्धांत कोणते हेंही शोधून काढीत आहेत.[1]

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, दिवसेंदिवस अर्थशास्त्रांतील "शास्त्रीयत्व" ठळकपणें प्रकट होत आहे. ज्या वेळीं अर्थशास्त्राचा उदय झाला, त्यावेळीं शास्त्रीय सिद्धांत व राष्ट्राचा कारभार चालविण्याचे नियम यांची त्याच्या चर्चेत भेसळ झालेली दिसत असे, व त्याचें नांवही अन्वर्थकच होतें. त्या वेळीं त्याला "Political Economy" म्हणत असत. याचा व्युत्पत्तिदृष्ट्या खरा अर्थ "राष्ट्रकुटुंबाचा संसार" असा आहे;[2] व म्हणून लोकांचा साहजिकच असा समज होत असे कीं राष्ट्राचा संसार गुण्यागोविंदानें कसा चालवावा याविषयीं अर्थ-शास्त्रांत नियम घालून दिलेले आहेत. या समजाचा फायदा घेऊन अर्थशास्त्राच्या सिद्धांतांस नीतीच्या नियमांचें स्वरूप देऊन कांहीं आपमतलबी लोकांनीं

१. Gustav Cassel: *Theory of Social Economy* व Henderson: *Supply and Demand* हीं पुस्तकें या विधानांची साक्ष पटवितील.

२. रस्किन्चें *Munera Pulveris* पहा.

इंग्लंडांत त्या वेळेस मजूर वर्गाची जी हीनदीन स्थिति होती तिचें समर्थन करावयाचा उपक्रम केला, व तो अर्थशास्त्राच्या उगवत्या प्रतिष्ठेस बराच भोंवला. सहृदय सुधारकवर्गाकडून अर्थशास्त्राचा निषेध होऊं लागला. कार्लाईल त्याला "सुतकी शास्त्र" म्हणत असे. रस्किन्नें त्याचा केलेला उपहासही प्रसिद्धच आहे. याप्रमाणें जेव्हां अपयशाचें खापर त्यांच्या डोक्यावर फोडण्यांत आलें तेव्हां अर्थशास्त्रज्ञांनीं सावध होऊन आपल्या शास्त्राचें दिशाभूल करणारें जुनें नांव बदललें; व शास्त्रीयत्वाचा ध्वनि ज्यांतून निघेल असें Economics हें नवें नांव रूढ केलें. हेतु एवढाच कीं अर्थशास्त्राच्या खऱ्या स्वरूपाविषयीं लोकांचे मनांत बिलकुल गैरसमज राहूं नये. समाजाचे आर्थिक व्यापार प्रत्यक्ष **कसे** चालले आहेत व ते तसे **कां** चालले आहेत एवढेंच समजावून देणें हें अर्थशास्त्राचें काम. ते व्यापार चांगले आहेत किंवा वाईट, ते सुधारावे कसे, इत्यादि विधानें अर्थशास्त्र करीत नाहीं. तीं करण्यास त्यास नीतिशास्त्राची मदत घ्यावी लागेल.[१]

अर्थशास्त्राच्या ह्या वरील सर्व मर्यादा आपण पूर्णपणें ध्यानांत बाळगिल्या पाहिजेत; म्हणजे आपण भलतीच अपेक्षा करणार नाहीं व निराशही होणार नाहीं. अर्थशास्त्राच्या सिद्धांतांपासून नित्याच्या व्यवहारांत विधायक मदत पुष्कळदां होते. पण त्याहीपेक्षां वेळोवेळीं अज्ञानामुळें किंवा अतिज्ञानामुळें केलेल्या चुकीच्या सूचनांचें पुरें खंडन करण्यांत त्यांचा जास्त उपयोग होतो. "नाना किंत निवारिले । नाना संशयो छेदिले । नाना आशंका फेडिले । नाना प्रश्न ॥" हीच अर्थशास्त्राची खरी फलश्रुति.

१. "And it is held that the laws of economics are statements of tendencies expressed in the indicative mood, and not ethical precepts in the imperative." Marshall—*Principles*, Preface to the First Edition.

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA.
087302

नगर वाचनालय, सातारा

# .२. मराठी भाषेचा आदर्श कोश*

" बाप उपेगी वस्तु शब्दु । स्मरणदानीं प्रसिद्धु ।
अमूर्ताचा विशदु । आरिसा नोहे ॥
आपण तंव खपुष्प । परि फळ दे जगद्रूप ।
शब्द मवितें उमाप । कोण आहे ॥ "

१

ज्ञानेश्वरांच्या या प्रगल्भ शब्दांनीं या निबंधाचें मीं मुद्दामच मंगलाचरण केलें आहे. कारण निबंधाचा नीरस मथळा वाचून पानें भराभर उलटण्याची उतावीळ करणाऱ्या वाचकाचें रसिक चित्त वरील शब्दब्रह्माच्या स्तुतीनें प्रस्तुत निबंधाकडे कदाचित् आकर्षिलें जाईल. सामान्य वाचकास शब्दकोश कसा तयार करावा हा विषय केव्हांही रूक्षच वाटेल; व क्रीतो आणि फिदो यांचे संवाद, किंवा सहकारी पतपेढ्यांवरील लेख, यांसारख्या गडकऱ्यांनीं उल्लेखिलेल्या शिक्षावजा कंटाळवाण्या लिखाणांत भर घालणाऱ्या शब्दाभ्यासजड लेखकाची त्यास केव्हांही कींवच येईल. शब्दाच्या सगुण साजिऱ्या मूर्तीचे भक्त फार; निर्गुण शब्दब्रह्माची उपासना करणारे विरळा. पण वाग्देवीच्या विविध विलासांनीं ज्यांचें मन मोहून जातें त्यांना कोशव्याकरणादि टापटिपीच्या, ठरीव व उपयुक्त साजाचा विसर पडून कसें चालेल ?

या साजाच्या स्वरूपाचें व गुणावगुणांचें वर्णन करण्याचें काम मराठींत यापूर्वी कोणीं केलेलें दिसत नाहीं. नाहीं म्हणावयास, राजवाड्यांनीं या विषयावर कांहीं वर्षांमागें एक लेख लिहिला होता;[1] पण तो " सरस्वतीमंदिराच्या " एका अज्ञात कोनाड्यांत पडून राहिला आहे. या लेखांत राजवाड्यांनीं अत्यंत उपयुक्त अशा बऱ्याचशा सूचना केल्या आहेत. तथापि त्यांच्या नित्याच्या स्वभावास अनुसरून त्यांनीं याही लेखास एककल्ली कल्पनांचें गालबोट

---

* कोल्हापुरच्या १७व्या (१९३२) महाराष्ट्र साहित्यसंमेलनांत हा निबंध वाचिला होता, व विविधज्ञानविस्ताराच्या जानेवारी १९३३ च्या अंकांत तो प्रसिद्ध झाला.

१. " राष्ट्रीय मराठी कोश "—श्री सरस्वतीमंदिर, श्रावण, शके १८२७.

लाविलें आहे. राजवाड्यांचा हा लेख वगळला तर या महत्त्वाच्या विषयावर मराठींत चर्चा जवळ जवळ झालीच नाहीं असें म्हणावें लागेल. परंतु प्रस्तुत निबंध केवळ नवलाईसाठीं लिहिलेला नाहीं. आज या विषयाची सांगोपांग चर्चा करण्याची सुसंधि आली आहे. शंभर वर्षांनंतर फिरून एकदां कोशवाङ्मयाचें नवें युग सुरू होणार, अशीं सुचिह्नें दिसूं लागलीं आहेत. "महाराष्ट्र शब्दकोशा"चें काम सुरू झालें आहे व लवकरच त्याचा पहिला भाग आपणांस पाहावयास मिळेल. अशा वेळीं शब्दकोश कसा तयार करावा या अगत्याच्या विषयाचा महाराष्ट्रांतील विद्वानांनीं चांगलाच खल केला पाहिजे. स्थूल व सूक्ष्म सूचना करावयाच्या त्या याच वेळीं.

आमच्या सुदैवानें महाराष्ट्रशब्दकोशाचें काम जाणत्या व जबाबदार लोकांच्या हातीं आहे. तथापि त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या हस्तपत्रकांतील कोशाच्या पानाच्या नमुन्यावरून हा कोश कदाचित् सर्वांगसुंदर होणार नाहीं, अशी आम्हांस भीति वाटते. ही आमची भीति प्रत्यक्ष कृति पाहिल्यानंतर कदाचित् निराधार ठरेल व ठरो; कारण शितावरून भाताची परीक्षा करणें नेहमींच समंजस नसतें. दरम्यान् उपयुक्त, नमुनेदार व सर्वांगपरिपूर्ण कोश कसा तयार करावा या विषयावरील शिष्टसंमत व विद्वन्मान्य तत्त्वांची फिरून एकदां उजळणी करावी हें श्रेयस्कर असें आम्हांस वाटतें.

२

प्रथम आपण आपल्या महाराष्ट्रशब्दकोशाचा आदर्श कसा असावा हें ठरविण्याचा प्रयत्न करूं; कारण जसा आदर्श तसा कोश. जो आदर्श आपण पुढें ठेविला असेल त्याला अनुसरूनच कोशाची रूपरेषा असणार, व कोशाच्या एकंदर स्वरूपाची रूपरेषा रेखाटल्याशिवाय कोशरचनेविषयीं तपशीलवार व सूक्ष्म अशा सूचना करतां यावयाच्या नाहींत; कारण या रूपरेषेवरच सूचनांचें ग्राह्याग्राह्यत्व अवलंबून राहील. आरंभींच आदर्श मुक्रर केल्यानें दुसरा एक फायदा होतो; तो असा कीं, त्यामुळें कोशरचनेच्या कामास एक प्रकारचा

१. या निबंधांत मांडलेल्या तत्त्वांच्या अनुरोधानें मराठींतील ह्या नव्या व जुन्या कोशांची चिकित्सा पुढें कधींतरी करण्याचा माझा विचार आहे, व तेव्हां मराठी कोशरचनेच्या प्रपंचाचा विस्तार करीन.

नगर वाचनालय, सातारा.
नगर वाचनालय, सातारा.



एकसूत्रीपणा येतो. एकदां ध्येय कायम केलेलें असलें म्हणजे मार्गांत ज्या अडचणी उपस्थित होतात–आणि कोशरचनेच्या कामांत बारीकसारीक बाबींचीच किचकट मोठी असते–त्यांनीं बावरून न जातां काम सुरळीतपणें चालत असतें. नाहीं तर अनुभव असा आहे कीं, अंगीकृत कार्याची अगोदर यथायोग्य कल्पना न झाल्यामुळें, प्रत्यक्ष काम चालू झालें म्हणजे त्यांत व्यवस्थितपणा राहत नाहीं. तसेंच, कोशाचा आदर्श एकदां आगाऊच ठरवून लोकांपुढें मांडिलेला असला, म्हणजे जसजसे कोशाचे भाग जनतेपुढें येतात तसतसें रचनेचें काम मूळ आदर्शाला अनुसरून व मूळच्या तत्त्वांबरहुकूम चाललें आहे कीं नाहीं, हें विद्वानांस ताडून पाहतां येतें; व विद्वन्मताची ही जिव्हाळ्याची जागरूकता कोशरचनेसारख्या कामास आवश्यक नाहीं असें कोण म्हणेल ?

आतां आमचा नवा महाराष्ट्रशब्दकोश खिशांत राहणारा, सुवह व केवळ शालोपयोगी नसावा हें सांगणें नलगे. आजवर मराठी कोशांचे जे बरेवाईट अनेक प्रयत्न झाले आहेत त्या सर्वांहून उत्कृष्ट व नमुनेदार असा हा कोश झाला पाहिजे; तरच या नव्या आरंभाची महती. मागील मराठी कोशांपेक्षां केवळ एक पाऊल पुढें टाकून भागणार नाहीं; इतर भाषांत जे मोठे मान्य कोश रचिले आहेत त्यांसारखा हाही कोश सर्वांगपरिपूर्ण झाला पाहिजे.

अशा कोशाचा आदर्श ठरवितांना आम्हांस कांहीं परक्यांच्या तोंडाकडे बघावयास नको. इतर सर्व देशांपेक्षां आमची शब्दकोशांची परंपरा खरोखर पुरातन आहे; व या परंपरागत पद्धतीचा आम्हांस खचित उपयोग करून घेतां येईल. म्हणून संस्कृत भाषेंतील शब्दकोश कोणत्या हेतूनें रचिले आहेत, त्यांत शब्द कोणते व कसे दाखल केले आहेत, शब्दांची इतर कोणती माहिती दिली आहे, हें आपण प्रथम पाहूं. दुर्बोध होत असलेल्या तत्कालीन जुन्या वाङ्मयांतील कठीण शब्दांची यादी अगर टिप्पणी हाच इतर भाषांप्रमाणें[१] संस्कृतांतील शब्द-

१. इंग्रेजी भाषेंतील कोशांचीं लॅटिन Glossary व Vocabulary हीं पहिलीं रूपें होत. (The Evolution of English Lexicography by Dr. J. A. H. Murray, pp. 7–14 ). ग्रीक भाषेंत देखील कोशवाङ्मयाचा आरंभ असाच झाला. ( Die Indischen Wörterbücher, Zachariae, p. 3 ). " When the work is merely a list of explanations of the difficult words and

कोशाचा प्रथमावतार होय, हें आज उपलब्ध असलेल्या वैदिक निघण्टूवरून दिसून येतें. यास्काचार्यांपाशीं असले पांच निघण्टु अथवा शब्दसंग्रह होते;[1] त्यांतील पहिल्या तिहींत समानार्थक शब्दांचा, चौथ्यांत विशेष कठीण शब्दांचा, व पांचव्यांत वेदांतील देवतांचा संग्रह केलेला होता. हे निघण्टु[2] इसवी सनापूर्वीं अजमासें आठशें–हजार वर्षांचे जुने आहेत. यानंतर संस्कृत कोशांचा दुसरा अवतार म्हणजे अमरादि कोश. मधल्या पंधराशें वर्षांच्या लांब काळांत बरेचसे कोश रचले गेले असावेत हें उघड आहे. कारण एक तर शब्दशास्त्राचा या मधल्या काळांत फार थोर विस्तार झाला होता व त्याला साजेशी कोशरचना अर्थात् झाली असलीच पाहिजे; व दुसरें असें कीं, अमरादि कोशकार व त्यांचे टीकाकार पूर्वींच्या कोशकारांचा उल्लेख करितात.[3] इतकेंच नव्हे, तर पतंजलीच्या वेळीं देखील एक मोठा शब्दसंग्रह अस्तित्वांत असावा, असें दिसतें. असो.

---

expressions in some particular subject or writing it is called a glossary." ( Encyclopaedia Britannica, 14th Ed. ).

१. History of Sanskrit Literature, Macdonell, p. 269. यास्कांनीं या निघण्टूवर जेव्हां भाष्य रचिलें त्या वेळीं वेदांतील ऋचा दुर्बोध झाल्यामुळें त्यांतील शब्दांची चर्चा करण्यांत कांहीं फायदा नाहीं, असें म्हणणारा कौत्सादि पंडितांचा एक पंथ होताच. Macdonell, p. 61.

२. शब्दकोशांस आरंभीं निघण्टु हें नांव दिलें जात असे. " एकार्थवाचिनां पर्यायशब्दानां संघो यत्र प्रायेणोपदिश्यते तत्र **निघण्टु**शब्दः प्रसिद्धः । तादृशेष्वमरसिंहवैजयन्तीहलायुधादिषु दश निघण्टवः इति व्यवहारात् " असें सायणाचार्यांनीं ऋग्वेदभाष्यांत म्हटलें आहे. वैजयन्तींत देखील " नामशास्त्रे निघण्टुर्ना " अशी व्याख्या दिली आहे. तसेंच दक्षिणेंत अजून कोशांस निघण्टु या नांवानें संबोधिण्याची चाल आहे. सध्यां हा शब्द विशेषेंकरून वैद्यकीय कोशांस लावितात. [ Die Indischen Wörterbücher, Theodor Zachariae, p. 2 ].

३. या कोशांच्या वर्णनासाठीं पहा--Zachariae, pp. 5 to 8.

४. " किं पुनर्नित्यः शब्दः आहोस्वित्कार्यः **संग्रहे** एतत्प्राधान्येन परीक्षितम् " ( पतंजलीचें महाभाष्य, निर्णयसागर, पा. ५४ ). कैयट हा संग्रह एक " ग्रंथविशेष " आहे एवढेंच म्हणतो. नागेशभट्ट मात्र " संग्रहो व्याडिकृतो लक्षश्लोकसंख्यो ग्रन्थः

पण हे सर्व कोश आज उपलब्ध नसल्यामुळें त्यांच्या स्वरूपाची यथार्थ कल्पना करतां येत नाहीं. तेव्हां जे अमरादि कोश आज उपलब्ध आहेत त्यांच्या रचनेंतील मुख्य मुख्य विशेषांचें येथें थोडक्यांत वर्णन करूं.

यांतील कोणत्याही कोशांत संस्कृत भाषेंतील एकोनएक शब्द दिलेले नाहींत. आधीं धातु किंवा क्रियापदें यांत दिलेलीं नसतात; नामें व अव्ययें यांचेच हे कोश होत. या उरलेल्या शब्दांपैकीं फक्त एकार्थ अथवा समानार्थ शब्दांचाच कांहींत भरणा केलेला असतो, तर कांहींत नानार्थ अथवा अनेकार्थ शब्दच सांपडतात; अमरासारख्या कांहीं कोशांत दोनही प्रकारच्या शब्दांचा समावेश केलेला आहे. त्यांतही साधारणतः लौकिक किंवा प्रचारांत असलेलेच शब्द कोशांत दाखल केले जात असत¹. आर्ष व अनार्ष, लौकिक व वैदिक, अशा सर्व प्रकारच्या शब्दांचा संग्रह कोणच्याच उपलब्ध कोशांत नाहीं. या नामकोशांत देवतांचीं नांवें, तसेंच वृक्ष, वनस्पति, मासे वगैरेंचीं व्यावहारिक नांवेंही दिलेलीं असतात. या कोशांची शब्दसंख्या सरासरी दहा हजारांपेक्षां जास्त भरेल असें वाटत नाहीं. यावरून विद्यमान कोश हे संस्कृत शब्दभाण्डारांतील केवळ प्रचलित नाण्यांचे लहानसे निधि होत हें उघड आहे. शब्दसंपत्तीची संपूर्ण सांठवण यांत केलेली नाहीं. जे शब्द कोशांत दिलेले असतात त्यांचें आधीं वर्गीकरण² करून मग ते पद्यांत गोंवलेले असतात. तोंडपाठ

इति प्रसिद्धिः" असें म्हणतो. पण तें बरोबर दिसत नाहीं. या व्याडीच्या नांवावर लिंगानुशासन व उत्पलिनी असे दोन कोश मोडतात. पण ते महाभाष्यानंतरचे असावेत. ( व्याडीविषयीं विशेष माहितीसाठीं पहा—Die Indischen Wörterbücher, p. 7 ).

१. *Cf*. "अलौकिकत्वादमरः स्वकोशे न यानि नामानि समुल्लिलेख । विलोक्य तैरप्यधुना प्रचारमयं प्रयत्नः पुरुषोत्तमस्य ॥" त्रिकाण्डशेष quoted by Zachariae, p. 24.

२. वर्गीकरणाच्या तत्त्वावर ग्रीक कोश Onomasticon हा रचिला आहे ( इ. स. १८०-१९२). इंग्रेजी भाषेंतील पहिले कोश याच प्रकारचे होते. "In English as we have seen, many of the vocabularies from the eleventh to the fifteenth century were arranged under class-

करावयाच्या या कोशांतील शब्द शोधून काढण्यास ही विषयवार रचना पुरेशी होती. तथापि वर्णानुक्रमपद्धतीचा देखील कांहीं कोशांत उपयोग केला आहे. प्रथम अन्त्यवर्णानुसार[1] शब्द एकत्र केले जात असत; पुढें पुढें प्रथमवर्णानुसार[2] रचना होऊं लागली; व कधीं कधीं एकाच वेळीं अंत्यव्यंजन व प्रथमवर्ण या दोहोंचाही अवलंब केलेला आढळतो. शब्दांतील अक्षरांची[3] संख्या, व्याख्येचा विस्तार इत्यादि संकीर्ण तत्त्वांनुसार देखील कांहीं कोशांतील शब्दांची मांडणी झाली आहे. शब्दांचें भाषेंतील स्थान कळण्यापुरतें व्याकरण कांहीं कोशांत दिलें जात असे; इतरांत फक्त शब्दार्थच दिलेले असत.[4] या कोशांत शब्दांच्या अर्थांचें स्पष्टीकरण व्याख्यांनीं केलेलें नसतें; पण संक्षिप्त, समर्पक व स्पष्ट असा प्रतिशब्द देऊन अर्थ विशद केलेला असतो. अर्थविकास दर्शविण्यासाठीं कोशांत व्युत्पत्ति अथवा ग्रंथांतील अवतरणें दिलेलीं नसतात. कवीस काव्यग्रंथ निर्माण करण्यांत मदत व्हावी,[5] हा

---

headings according to subject " ( Evolution of English Lexicography, p. 19 ).

१. उदाहरणार्थ, अमरकोशांतील नानार्थवर्ग पहा. इंग्रजींत Manipulus Vocabulorum ह्या १५७० मध्यें रचिलेल्या कोशांत अन्त्यवर्णानुसार शब्द दिलेले आहेत. ( Ibid. p. 23 ).

२. *Cf.* " इदानीं व्यंजनादय: संगृह्यन्ते, तेऽपि वर्गक्रमेणेति कवर्गादयो द्व्यक्षरादिक्रमेण स्वरक्रमेण च प्रस्तूयन्ते । " देशीनाममाला quoted by Zachariae, p. 15.

३. उदाहरणार्थ–एकाक्षरकोश. पहा—Zachariae, p. 38.

४. " त्रिकाण्ड-उत्पलिन्यादीनि नाममात्रप्रतिपादकानि वररुच्यादिकृतानि तु लिङ्गमात्रप्रतिपादकानि । " अमरकोशाचें मूळचें नांव " नामलिंगानुशासन " आहे.

५. " कविकण्ठविभूषणार्थम् " (हलायुध); " कवीनां हितकामाय " (धनंजय); " कवीनां सुखहेतवे" (धरणी); "कवे: शीघ्रकवित्वाय " (शीघ्रबोधिनी)–quoted by Zachariae, p. 3. कोशज्ञानाचा काव्यांगांत समावेश होत असे. पहा–काव्यालंकारवृत्ति, काव्यप्रकाश etc. quoted by Zachariae, p. 3.

या कोशांचा मुख्य उद्देश असे; शब्दार्थज्ञानामुळें लोकांस वाङ्मय समजण्यास सोपें जावें हाही गौण हेतु होताच.[1]

संस्कृत कोशांच्या वरील वर्णनावरून कोणी असा गैरसमज करून घेऊं नये कीं, संस्कृत कोशकारांस व पंडितांस शब्दशास्त्राच्या समग्र व्यापाचें आकलन झालेंच नव्हतें, अथवा शब्दशास्त्राच्या विचाराची त्यांना असलेली कल्पना अगदींच मर्यादित व आकुंचित होती. खरें पाहतां, "अनन्तपारं किल शब्दशास्त्रम्" हें आमच्यापेक्षां त्यांना जास्त चांगलें कळत होतें. उपलब्ध कोश जरी नामें व अव्ययें यांचेच असले, तरी धातुपाठ निराळे रचिलेले होते हें आपण विसरतां कामा नये. प्रत्यक्ष कोशांत दाखल केलेल्या शब्दांची संख्या जरी थोडी असली, तरी भाषेंतील शब्द असंख्य आहेत हें ते पूर्णपणें जाणत होते. पतंजलीच्या महाभाष्यांत शब्दसंख्येचें अगणितत्व सुचविणाऱ्या एका मार्मिक पुराणकथेचा उल्लेख केला आहे, तो असा—"एवं हि श्रूयते—बृहस्पतिरिन्द्राय दिव्यं वर्षसहस्रं प्रतिपदोक्तानां शब्दानां शब्दपारायणं प्रोवाच नान्तं जगाम बृहस्पतिश्च प्रवक्ता, इन्द्रश्चाध्येता, दिव्यं वर्षसहस्रमध्ययनकालो, न चान्तं जगाम किं पुनरद्यत्वे ?।" तसेंच, या असंख्य शब्दांचे लौकिक व वैदिक, प्रचलित व अप्रचलित, प्रयुक्त व अप्रयुक्त असे शास्त्रीय विभागही त्यांनीं कल्पिले होते; व या शब्दांचे अपभ्रंश, प्रांतिक विकल्प इत्यादींकडे त्यांचें लक्ष असे. एकाहून अधिक रूपें असलेल्या शब्दांचे स्वतंत्र वेगळे कोश रचिले गेले आहेत. शब्दाच्या यथार्थ ज्ञानाला ते फारच महत्त्व देत असत हें "एकः शब्दः सम्यग्ज्ञातः शास्त्रान्वितः सुप्रयुक्तः स्वर्गे लोके कामधुग्भवति।" इत्यादि प्रसिद्ध वचनांवरून उघड दिसतें. शब्दशक्तीचें यथार्थ ज्ञान होण्यास लौकिक प्रयोगाचा अगर व्यवहाराचा, शास्त्राच्या नियमांइतकाच किंबहुना त्याहूनही जास्त उपयोग होतो, हें त्यांस समजून

---

१. *Cf.* प्रसिद्धैरप्रसिद्धैश्च शब्दैरेष विनिर्मितः।
प्रसिद्धैर्ग्रथितुं ग्रन्थं **अप्रसिद्धैश्च वेदितुम्**॥

—शाश्वत quoted by Zachariae, p. 4.

चुकलें होतें;[1] व शब्दाचा प्रयोगविषय प्रचलित लोकसमूहाहूनही फार मोठा असतो, याची त्यांना खरीखुरी जाणीव होती. महाभाष्यांत शब्दाच्या प्रयोगविषयाचें जें वर्णन दिलें आहे तें अगदीं आधुनिक भासतें.[2] निरुक्त म्हणजे व्युत्पत्ति हें अपराविद्येचें एक अंग गणिलें जात असे, यावरून आपणांकडे व्युत्पत्तीची किती महती होती हें स्पष्ट दिसून येईल.[3] उपलब्ध कोशांत जरी शब्दांच्या व्युत्पत्त्या दिलेल्या नसल्या तरी कोशांच्या टीकेंत त्या नेहमीं दिलेल्या असतात. ग्रंथांतून उद्धृत केलेल्या अवतरणांच्या मदतीनें शब्दांच्या प्रत्यक्ष प्रयोगांचें ज्ञान लवकर होतें, ही आधुनिक कल्पनाही आमच्या कोशकारांच्या अगदींच परिचयाची नव्हती असें म्हणतां येणार नाहीं. वर्धमानानें आपल्या गणरत्नमहोदधीवर स्वतःच जी टीका रचिली आहे तींत अनेक अवतरणें देऊन शब्दार्थांचे प्रयोग स्पष्ट केले आहेत.[4] तात्पर्य, शब्दशास्त्राच्या प्रधान गणिल्या जाणाऱ्या अंगांची आमच्या पंडितांस पूर्ण जाणीव होती; मात्र ह्या सर्वांगांनीं परिपूर्ण असा कोश आज उपलब्ध नाहीं; व कदाचित् तो रचिला गेलाही नसावा.

---

१. *Cf.* "शक्तिग्रहं व्याकरणोपमानकोषाप्तवाक्याद्व्यवहारतश्च"; also लोकतोऽर्थप्रयुक्ते शब्दप्रयोगे शास्त्रेण धर्मनियमः ॥ etc.

२. *Cf.* "उपलब्धौ यत्नः क्रियताम्। महान् शब्दस्य प्रयोगविषयः सप्तद्वीपा वसुमती, त्रयो लोकाः, चत्वारो वेदाः, साङ्गाः सरहस्या बहुधा भिन्ना एकशतमध्वर्युशाखाः सहस्रवर्त्मा सामवेदः एकविंशतिधा बाह्वृच्यं, नवधाथर्वणो वेदः वाकोवाक्यमितिहासः वैद्यकमित्येतावाञ्छब्दस्य प्रयोगविषयः । एतावन्तं शब्दस्य प्रयोगविषयमननुनिशाम्य सत्यप्रयुक्ता इति वचनं केवलं साहसमात्रमेव।" महाभाष्य, निर्णयसागर ( १९०८ ), पान २६.

३. *Cf.* द्वे विद्ये वेदितव्ये इति ह स्म यद् ब्रह्मविदो वदन्ति परा चैवापरा च। तत्रापरा ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेदोऽथर्ववेदः शिक्षा कल्पो व्याकरणं **निरुक्तं** छन्दो ज्योतिषमिति ।

४. *Cf.* विदित्वा शब्दशास्त्राणि प्रयोगानुपलक्ष्य च ।
स्वशिष्यप्रार्थिताः कुर्मो गणरत्नमहोदधिम् ॥

प्रयोगान् महाकाव्योपनिबद्धानि लक्ष्याणि। लक्ष्यं लक्षणं च सम्यग् ज्ञात्वा...

असा कोश कां रचिला गेला नसावा हें सहज समजण्यासारखें आहे. कोशरचनेच्या मार्गांत त्या वेळीं अनेक दुस्तर अडचणी होत्या. छापण्याची कला त्या वेळीं माहीत नव्हती. ज्ञानार्जनासाठीं लेखापेक्षां गुरुमुखाकडेसच जास्त बघावें लागत असे; व संपादिलेल्या ज्ञानाची सांठवण पुस्तकांच्या कपाटाऐवजीं स्मृतिकपाटांत होत असे. अशा काळांत भाषेंतील एकोनएक शब्द गोळा करून शब्दशक्तीचें सांगोपांग ज्ञान देणारी सारी माहिती कोशांत एकत्रित करण्यांत कांहींच फायदा नव्हता. कारण, जरी असा एखादा विस्तृत कोश तयार झाला असता तरी तो समग्र तोंडपाठ करणें हें एकपाठी विद्वानांससुद्धां अशक्यप्राय होतें. बरें, त्याच्या अनेक प्रती करून संदर्भग्रंथ म्हणून विद्वानांना तो वापरतां येण्याची सोय नव्हती. म्हणूनच शब्दशास्त्राचे शक्य तेवढे आटोपशीर विभाग पडून त्यांची स्वतंत्र वाढ होत गेली. भाषेंतील सर्व शब्दांचा एकाच ठिकाणीं संग्रह न करितां ते निरनिराळ्या कोशांत देणें, त्यांचे अर्थ पाल्हाळ न लावतां संक्षिप्त रीतीनें दर्शविणें, त्यांचें वर्गीकरण करून वृत्तात्मक कोश रचणें—या साऱ्या युक्त्यांचा हेतु एवढाच कीं, शब्दशास्त्र मुखोद्गत करण्यास सोपें जावें. तथापि पुढें पुढें आपल्या पंडितांससुद्धां ही सारी उपयुक्त माहिती शक्य असेल तर एके जागीं मिळावी असें वाटूं लागलें व म्हणूनच कोशांवर टीका रचण्याची प्रथा पडली. लोकप्रिय झालेल्या अमरकोशावर किती तरी टीका झाल्या आहेत.[1] इतकेंच नव्हे तर बरेचसे कोशकार आपल्या कोशांवर स्वतःच टीका लिहूं लागले.[2] खुद्द अमरसिंहानेंही स्वतः टीका लिहिली असावी असें त्याजविषयीं प्रचलित असलेल्या एका सुभाषितावरून दिसतें.[3] सारांश, शब्दशास्त्राच्या सर्व अंगांची आमच्या पूर्वजांस माहिती असून व त्यांची त्यांनीं चांगलीच जोपासना केली असून देखील त्यांजकडून

१. टीकांच्या विस्तृत वर्णनासाठीं पहा—Die Indischen Wörterbücher pp. 20-23; also Aufrecht: Catalogus Catalogorum.

२. उदाहरणार्थ हेमचंद्राच्या, वर्धमानाच्या टीका पहा. पण Zachariae चें मत जरा निराळें दिसतें.

३. पहा—" प्रयोगव्युत्पत्तौ प्रतिपदविशेषार्थवचने...कविरमरसिंहो विजयते ॥" इत्यादि सुभाषित.

सर्वांगपरिपूर्ण कोश निर्माण झाला नाहीं, याचें खरें कारण तशा कोशरचनेस परिस्थिति सर्वथैव प्रतिकूल होती हेंच होय. हें जाणून केवळ उपलब्ध प्रत्यक्ष कृतींवरून आपण कोशाचा आदर्श ठरविणें सुज्ञपणाचें होणार नाहीं. आमच्या पूर्वजांस कोशरचनेच्या मार्गांत जाचत असणाऱ्या सर्व अडचणी मुद्रणकलेच्या प्रसारामुळें आज दूर झाल्या आहेत; व त्यांस अशक्य असलेलें ध्येय आज आपणांस अनायासें शक्य झालें आहे. तेव्हां शब्दज्ञानाच्या ज्या कल्पना त्यांस इष्ट होत्या, पण ज्या त्यांस साध्य करतां आल्या नाहींत, त्या कल्पनांवरूनच आपण आपल्या कोशाचा आदर्श मुक्रर केला पाहिजे. या कल्पनांचें वर्णन मागें आलेंच आहे. त्यांस अनुसरून रचिलेल्या कोशांत भाषेंतील यच्चयावत् शब्द, त्यांचे सर्व अर्थ, त्यांच्या व्युत्पत्त्या, त्यांचे प्रयोग, व ते दर्शविण्यासाठीं ग्रंथांतील अवतरणें, इत्यादि सर्व शब्दप्रपंच आला पाहिजे.

३

ही झाली आपल्या संस्कृत कोशांची परंपरा; आतां आपण पाश्चात्य कोशरचनेकडे वळूं. यूरोपांत कोशरचनाशास्त्राचा विकास धिमेधिमेच होत गेला. अगदीं आरंभींचे कोश फार साधे असत, व त्यांतील माहिती देखील तुटपुंजी असे.[1] हस्तलिखित लॅटिन पुस्तकांतील कठीण शब्दांवर प्रथम सोप्या लॅटिन भाषेंत व मग मग इंग्रजी भाषेंत ज्या टिप्पण्या दिल्या जात असत त्या एकत्र करून त्यांची आरंभीं Glossary बनली. इंग्रजींतील कोशाचें हें आद्य रूप होय. या टिप्पण्यांत पुढें इंग्रेजी-लॅटिन शब्दांच्या याद्यांची भर पडली. त्यानंतर इंग्रेजी-फ्रेंच, इंग्रेजी-स्पॅनिश इत्यादि द्वैभाषिक कोश अस्तित्वांत आले. आपल्या भाषेंतील शब्दार्थांचें चांगलें ज्ञान होण्याकरितां सोळाव्या शतकाच्या अंतापर्यंत इंग्रजांस कोशाची जरूरीच भासली नाहीं. १६०४ सालीं पहिला इंग्रजी कोश रचिला गेला; त्यांत फक्त तीन हजार कठीण शब्द दिले होते. भाषेंत सांपडतील तेवढ्या शब्दांचा कोशांत संग्रह करण्याचे प्रयत्न

---

१. New English Dictionary चे संपादक Dr. Murray यांच्या The Evolution of English Lexicography (1900) या निबंधावरून या परिच्छेदांतील माहिती घेतली आहे.

नगर वाचनालय, सातारा.



अठराव्या शतकाच्या अगदीं शेवटीं शेवटीं सुरू झाले. तरी पण अगदीं थेट विसाव्या शतकापर्यंत, भाषेंतील वापरण्यास योग्य अशा शब्दांच्या एकतृतीयांशाहून अधिक शब्द कोणत्याच विद्यमान कोशांत दिले नव्हते.[१] भाषेंतील सर्व शब्द कोशांत दिले पाहिजेत ही कल्पनाच Nathanael Bailey यास प्रथम सुचली. व्युत्पत्ति, उच्चार दर्शविण्यासाठीं आघात, तसेंच म्हणी, यांचा Baileyच्या कोशांत प्रथमच समावेश झाला ( १७२१ ). अठराव्या शतकाची बौद्धिक प्रवृत्ति नियमबद्धतेकडे व ठरीवपणाकडे जास्त होती. तीस अनुसरून इटली, फ्रान्स या देशांत विद्वानांचीं मंडळें स्थापण्यांत येऊन, भाषांचे प्रमाणभूत कोश तयार करण्यांत आले. भाषेंतील शब्दांचीं रूपें, त्यांचे अर्थ व त्यांचे प्रयोग हीं सारीं एकदाच कायमचीं ठरवून टाकावीं हा त्या कोशांचा हेतु होता; म्हणजे मग अज्ञ, अनभिज्ञ अगर अशिक्षित लोकांमुळें भाषा भ्रष्ट होऊन तिचा ऱ्हास होण्याची भीति नव्हती. या प्रमाणकोशाच्या कल्पनेनुसार इंग्रजींत डॉ. जॉन्सन यानें एकट्यानेंच आपला कोश रचिला ( १७५५ ). शब्दप्रयोग दर्शविण्यासाठीं या कोशांत अवतरणें प्रथमच देण्यांत आलीं, हा ह्या कोशाचा एक विशेष होय. या अवतरणांचा विस्तार पुढें Richardson यानें आपल्या कोशांत वाढविला ( १८३६-७ ). मध्यंतरीं कोशांत प्रचलित शब्दांचे उच्चार दिले पाहिजेत ही कल्पना प्रादुर्भूत झाली ( १७७३ ). तथापि, सुमारें शंभर वर्षेंपर्यंत पाणिनीच्या व्याकरणाप्रमाणें जॉन्सनचा कोश प्रमाणभूत मानण्यांत येत असे.

शब्दशास्त्राच्या अभावीं, युरोपांत कोशरचनेची व्यवस्थित वाढ होणें शक्य नव्हतें. संस्कृत भाषेच्या प्रसिद्धीमुळें व अभ्यासामुळें शब्द-

---

१. " Not until the third decade of the 18th century was any attempt made to include all the words of the English language. William Curtis Stiles said in 1903 that even fifteen years ago, no general dictionary existed that had more than one third of the words desirable for use in writing and speaking the English language."–American Dictionaries: a dissertation, by Stewart Archer Steger (1913).

शास्त्राची कल्पना युरोपियन लोकांस प्रथम आली; व मग मात्र त्याचा सर्वांगीण विकास होत गेला. शब्दशास्त्राच्या तत्त्वांनुसार भाषेचा कोश रचिला पाहिजे हें ध्येय आर्यभाषांचा आस्थापूर्वक अभ्यास करणाऱ्या जर्मन लोकांत साहाजिकपणें प्रथम उदयास आलें; व त्याप्रमाणें ग्रिमबंधूंच्या कोशाचा पहिला भाग १८५४ मध्यें प्रसिद्ध झाला. त्यानंतर १८५७ सालीं Arch-bishop (तेव्हांचे Dean) Trench यांनीं तत्कालीन इंग्रजी कोशांतील उणिवा दाखवून देणारे दोन निबंध शब्दशास्त्रमंडळापुढें वाचिले; व या प्रश्नास इंग्रजी भाषेंत चालना दिली. पुढें या प्रश्नाची विद्वानांत चर्चा होऊन सरतेशेवटीं New English Dictionary या सुविख्यात कोशाच्या रचनेस १८६० च्या सुमारास प्रारंभ झाला; व १९२८ सालीं ह्या कोशाचा शेवटचा भाग प्रसिद्ध होऊन त्या रचनेची परिसमाप्ति झाली. भाषेंतील चांगले अगर प्रचलित शब्द वेंचून काढणें व त्यांचे अभिजात प्रयोग ठरवून त्यांजवर विद्वन्मान्यतेचा शिक्का मारणें हें आदर्शकोशकारांचें ध्येय शब्दशास्त्रज्ञांस पसंत नाहीं. त्यांच्या मताप्रमाणें, बऱ्यावाइटाचा निवाडा करणें हें कोशकाराचें काम नव्हे; भाषेंतील शब्दांचा इतिहास देणें हेंच त्याचें खरें कार्य. कोशकार हा शब्दांचा चरित्रकार होय असें त्यांचें म्हणणें आहे. या विचारांचें परिणत रूप नुकत्याच पुऱ्या झालेल्या उपरिनिर्दिष्ट इंग्रजी कोशांत पहावयास सांपडतें. या कोशाच्या संपादकांनीं आपल्या ध्येयाचें खालील शब्दांत वर्णन केलें आहे.[1] "इंग्रजी

---

१. "The aim of this dictionary is to furnish an adequate account of the meaning, origin, and history of English words now in general use or known to have been in use at any time during the last seven hundred years. It endeavours (1) to show with regard to each individual word, when, how, in what shape and with what signification it became English, what development of form and meaning it has since received, which of its uses have in the course of time become obsolete, and which still survive, what new uses have since arisen, by what process and when; (2) to illustrate these facts by a series of quotations ranging from the first known occurrence of the word to the latest, or down to the present day; the word being

भाषेंत आज प्रचारांत असलेल्या तसेंच गेल्या सात शतकांत केव्हांही प्रचारांत असलेल्या साऱ्या शब्दांचे अर्थ व मूळापासून इतिहास यांची यथायोग्य माहिती देणें हें या कोशाचें ध्येय आहे. भाषेंत शब्द केव्हां, कसा, कोणत्या रूपानें व अर्थानें दाखल झाला, तदनंतर त्याच्या स्वरूपांत व अर्थांत फेरफार कसकसे होत गेले, त्याचे कोणते प्रयोग लुप्त झाले, कोणते अद्यापि अस्तित्वांत आहेत, कोणते नव्यानेंच प्रचलित होत आहेत, हे सर्व फेरफार केव्हां व कसे घडून आले, हें या कोशांत दाखविलें आहे; व तें दाखवितांना अगदीं पहिल्यापासून तों आजतागायतपर्यंतचीं त्याच्या विविध उपयोगाचीं उदाहरणें अवतरणांदाखल घेतलीं आहेत: जेणेंकरून त्या शब्दाचा इतिहास आपोआप कळून येतो. आधुनिक भाषाशास्त्राच्या तत्त्वांस व पद्धतीस अनुसरून ऐतिहासिक दृष्टीनें प्रत्येक शब्दाची व्युत्पत्ति या कोशांत दिली आहे." सारांश, हा कोश खरोखरच "शब्दलीलामृत" या नांवास पात्र आहे. शब्दशास्त्रज्ञांच्या या तत्त्वांप्रमाणें बहुतेक सर्व युरोपियन भाषांत कोश रचिले गेले आहेत.[1] ते जरी इंग्रजी भाषेच्या वरील कोशाइतके सर्वांगसुंदर उतरले नसले, तरी त्या सर्वांचा आदर्श एकच आहे.

अशा कोशरचनेबरोबर दुसऱ्या एका पद्धतीची कोशरचना, पाश्चात्य राष्ट्रांत — व विशेषतः अमेरिकेंत — होत गेली. ग्रिमनें आपल्या कोशांत म्हटल्याप्रमाणें सर्वसाधारण भाषाकोश जसजसे विस्तृत होत गेले, तसतसा त्यांचा व्याप वाढून त्यांजमध्यें नानाप्रकारच्या स्वतंत्र कोशांतील अनेक विशेषांचा समावेश होत गेला; व आतां असल्या कोशांस सर्वसंग्राहक भाषाकोश हें नांव यथार्थ शोभेल. ज्ञानकोश व शब्दकोश यांच्या संकरानें निर्माण झालेल्या या

---

thus made to exhibit its own history and meaning; (3) to treat the etymology of each word on the basis of historical fact, and in accordance with the methods and results of modern philological science." (Preface to the New English Dictionary).

१. जर्मन भाषेंतील Deutsches Wörterbüch of Jacob and William Grimm आणि फ्रेंच भाषेंतील E. Littré याचा Dictionaire de la langue Française हे कोश पहा.

सर्वसंग्राहक भाषाकोशांची सध्यांच्या ज्ञानप्रसाराच्या काळांत खरोखरच फार जरूर भासते. अशा कोशांत "ग्रंथनामें, थोर पुरुषांचीं नामें, प्रसिद्ध स्थलांचीं नामें, पौराणिक पुरुषांचीं व स्थलांचीं नामें, वनस्पतींचीं, धातूंचीं, द्रव्यांचीं, माशांचीं, दगडांचीं, वगैरे पारिभाषिक नांवें"[1] या सर्वांचा विवेकानें संग्रह केलेला असतो व यांजविषयीं दिलेली माहिती स्पष्ट होण्यासाठीं चित्रादि थाटमाटाची मदत घेण्यांत येते. फ्रेंच भाषेंतील Larousse या नांवाखालीं मोडणारे कोश, Century Dictionary हा अमेरिकन कोश, हे या सर्वसंग्राहक पद्धतीचे उत्कृष्ट नमुने होत. अशा सर्वसंग्राहक कोशाचे साहाजिकच अनेक खंड असतात. अर्थात् त्यांची किंमत सामान्य माणसाच्या ऐपतीबाहेर असते; तसेंच वापरण्याससुद्धां ते अवजड असतात. तेव्हां शक्य तर, एकखंडी, सुटसुटीत, सुवह पण सर्वसंग्राहक शब्दकोश निर्माण करून, थोडक्या खर्चांत व श्रमांत सर्वांस अधिक शब्दज्ञान मिळेल अशी सोय अमेरिकन लोकशाहींतील कोशकारांनीं अलीकडे केली आहे. असल्या एकखंडी कोशाचें वर्णन Steger यांनीं पुढील शब्दांत केलें आहे:[2] "असला कोश संदर्भग्रंथ म्हणून वापरतांना परिश्रम पडूं नयेत हा या कोशाचा एक मुख्य हेतु असतो; त्याच्या रचनेंत अभ्यासकाच्या सोईकडे जास्त लक्ष पुरविलेलें

१. राजवाडे.

२. "To sum up, the ideal popular dictionary for general use will have as its controlling principles ease of consultation and convenience of the student. It will give within the limits of a single volume a maximum of easily accessible information. Its vocabulary will include all words which are or have been since 1550 in general reputable use; its orthography and pronunciation will conform strictly to that of good current usage; its etymologies and definitions will be clear, concise and accurate; literary and pictorial illustrations will be included only when necessary to elucidate a definition; it will include as much encyclopaedic material as possible." —American Dictionaries: a dissertation, by Stewart Archer Steger ( 1913 ).

असतें. एकाच खंडांत जास्तींत जास्त माहिती दिलेली असते; व ती चटकन् सांपडेल अशा रीतीनें तिची मांडणी केलेली असते. आधुनिक काळांत प्रचलित असलेल्या शब्दांचाच त्यांत संग्रह केलेला असतो; व त्यांचे शिष्टसंमत उच्चार व शुद्धलेखन दर्शविलेलीं असतात. त्यांतील व्युत्पत्त्या व व्याख्या स्पष्ट, संक्षिप्त व समर्पक असतात. फक्त व्याख्या विशद करण्यासाठींच अवतरणांचा व चित्रांचा समावेश केलेला असतो, व हें सर्व साधून जितकी अवांतर माहिती देतां येईल तितकी त्यांत दिलेली असते." New International Dictionary व Standard Dictionary हे अशा प्रकारचे कोश आहेत.

४

येथवर आपण संस्कृत कोशांची परंपरा तपासली व पाश्चात्य कोशांचे आदर्श पाहिले. या सर्व कल्पनांतील उपयुक्त भाग निवडून आपणांस आपला आदर्श मुक्रर करावयाचा आहे. पण त्यापूर्वीं आजवर मराठी भाषेंत जे कोश झाले आहेत त्यांची रचना कोणत्या हेतूनें व पद्धतीनें झाली आहे तें पाहूं[1]. आज माहीत असलेल्या कोशांतील सर्वांत जुना कोश म्हटला म्हणजे "महानुभाव ग्रंथकारांनीं रचिलेला मध्यकालीन मराठी शब्दांचा कोश" होय. हा कोश व राजवाड्यांपाशीं असलेला ज्ञानेश्वरीचा कोश व त्यांनीं उल्लेखिलेले इतर जुने कोश, या सर्वांस Glossaries अथवा कठीण शब्दांच्या याद्या हेंच नांव साजेल. त्यानंतर मुसलमानांच्या अमलाखालीं त्यांना "जुन्या वसुलाच्या व हिशेबाच्या पद्धति" समजून देण्याकरितां ( इंग्रजींतील आरंभींच्या द्वैभाषिक कोशांप्रमाणें ) फारसी-मराठी शब्दांच्या याद्या निर्माण झाल्या. पुढें "मुसलमानांच्या प्राबल्यानें पुष्कळ फारशी, अरबी, उर्दू, वगैरे शब्द मराठी भाषेंत मिसळून गेले होते त्या यवनी शब्दांच्या स्थळीं संस्कृत पर्याय योजून, ते परिपाठांत आणण्याच्या"[2] हेतूनें, रघुनाथ पंडितांनीं, शिवाजीच्या आज्ञेनें 'राज्यव्यवहारकोश' रचिला. पेशव्यांच्या काळांत राजकीय पत्रव्यवहारास उपयोगी

१. या कोशांचें विस्तृत वर्णन राजवाड्यांनीं आपल्या लेखांत केलें आहे. शब्दरत्नाकराच्या प्रस्तावनेंत देखील तें पहावयास सांपडेल.

२. साने.

पडणाऱ्या द्वैभाषिक याद्या तयार केल्या होत्या. सारांश, इंग्रजी अमलापर्यंत मराठी भाषेचा कोश असा झालाच नाहीं. इंग्रजी राज्यांतील पहिला मराठी-इंग्रजी कोश केरी या मिशनऱ्यानें पवित्र शास्त्राच्या प्रसारार्थ रचिला. मराठी शब्दांची ही केवळ एक लहानशी यादी आहे. त्यानंतरच्या केनेडीच्या कोशास "कारकुनी" कोश हेंच विशेषण शोभतें. मराठी कोशाचा पद्धतशीर प्रयत्न मोल्स्वर्थ व कँडी यांनीं प्रथम केला. मोल्स्वर्थच्या कोशाचें मी येथें विस्तारानें वर्णन देत नाहीं; कारण पुढें सूचनांच्या अनुषंगानें त्या कोशाच्या गुणावगुणांची चर्चा होणारच आहे. या ठिकाणीं एवढेंच नमूद केलें पाहिजे कीं, मराठी भाषेंतील सर्व शब्द व त्यांचा इतिहास देणें हें त्या कोशाचें ध्येयच नव्हतें; केवळ भाषांतरकाराची सोय करावी याच उद्देशानें हा कोश रचिला आहे व म्हणून "संपूर्णतेच्या दृष्टीनें हा कोश अत्यंत व्यंग आहे." ही झाली द्वैभाषिक कोशांची कथा. शुद्ध मराठी कोशांत नांव घेण्यासारखा एकच कोश झाला; व तो १८२९ सालीं प्रसिद्ध झालेला शास्त्र्यांचा कोश होय[1]. त्या कोशाची रचना मोल्स्वर्थ-कँडींच्या देखरेखीखालींच व त्यांच्या मराठी-इंग्रजी कोशाच्या अनुसंधानानेंच झाली असल्यामुळें त्यांतील सर्व उणिवा व दोष यांत दिसून येतात. त्यानंतर प्रसिद्ध झालेले सर्व कोश कांहीं सुवह तर कांहीं शालोपयोगी असेच आहेत. त्यांतल्या त्यांत उल्लेखास पात्र असे दोनच कोश आहेत. एक आपट्यांचा शब्दरत्नाकर व दुसरा भिड्यांचा सरस्वतीकोश. एकंदरींत राजवाड्यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे "प्रत्येक पुस्तकाचा कोणाला कांहीं ना कांहीं तरी उपयोग होतो, ह्या सवलतीच्या नजरेनें पहातां आजपर्यंत झालेल्या मराठी याद्या, सूची व कोश यांचा भावी कोशकाराला कांहीं उपयोग होईल असें समाधान करून घेतां येण्याजोगें आहे; मात्र असल्या निर्जीव समाधानापासून व अवास्तव प्रशंसेपासून महाराष्ट्रभाषेच्या स्थैर्याला, प्रगतीला व गौरवाला फारसें साहाय्य होईल असें वाटत नाहीं. मिळून लिहिण्याचें एकंदर तात्पर्य काय कीं, सर्वांगांनीं संपूर्ण असा राष्ट्रीय मराठी कोश अजून महाराष्ट्रांत निर्माण झाला नाहीं. व्हावयाचा आहे."

---

१. या कोशाच्या रचनेसंबंधीं आपट्यांचा थोडासा गैरसमज झालेला दिसतो पहा–प्रस्तावना पान ६, ७.

 भा. ५५

हा जो कोश व्हावयाचा आहे, तो शब्दशास्त्रज्ञांच्या वर वर्णन केलेल्या तत्त्वांप्रमाणेंच झाला पाहिजे. असा कोश एकदा तयार झाला म्हणजे मग त्याजवरून पाहिजे असल्यास एकखंडी लहान कोश सहज रचितां येतील. तसेंच, अवांतर माहितीची भर घालून जरूरी भासल्यास, सर्वसंग्राहक कोश देखील बनवितां येतील. पण जर मूळांतच व्यवस्थित, शास्त्रशुद्ध व सर्वांगपरिपूर्ण कोश तयार झालेला नसेल, तर इतर प्रकारचे दुसरे कोश कधींच उपयोगी पडणार नाहींत. New English Dictionary सारखा कोश मराठींत तयार झाल्यास जुन्या वाङ्मयाचा पुनरुद्धार होईल, व भाषेच्या वाढीस पुढें फार मदत होईल; म्हणून माझ्या मतें New English Dictionary चें जें ध्येय होतें तेंच आमच्या महाराष्ट्र शब्दकोशाचें ध्येय असावें. हें ध्येय पुष्कळ अंशीं आपल्या जुन्या संस्कृत परंपरेशीं जुळतें असेंच आहे; व तें स्वीकारल्यास परकी परंपरा उचलून स्वाभिमानाची हानि झाली असें कांहीं आपणास वाटणार नाहीं. बाकी सरस्वतीच्या पवित्र मंदिरांत खोट्या राष्ट्राभिमानाचा विटाळ खपत नसतो !

कोशरचनेचा महाराष्ट्रांत ज्यांनीं शास्त्रीय दृष्टीनें विचार केला होता त्या राजवाड्यांचें मत मात्र अगदीं याविरुद्ध होतें. ते म्हणतात—“शास्त्रीय दृष्टीनें पहातां भाषेंतील एकोनएक जुन्या व नव्या शब्दांचा एके ठिकाणीं संग्रह करून त्यांचे विशद, संक्षिप्त व समर्पक अर्थ देण्याचें काम कोशाचें आहे. ह्यापलीकडे **शब्दांच्या प्रपंचाशीं कोशाचा संबंध नाहीं**. व्युत्पत्ति, सिद्धि, समास, वगैरे प्रकरणांचें विवेचन करण्याचा अधिकार व्याकरणाचा आहे. व्युत्पत्ति वगैरे **अप्रस्तुत** प्रकरणांचें निष्कारण प्रदर्शन करण्यांतच कोशांचें सर्वस्व आहे असें युरोपियन कोशकारांचें मत दिसतें, व तें अशास्त्र आहे.... लाक्षणिक अर्थांची माहिती अलंकारशास्त्रांत आणि त्यांचा संग्रह कोशांत द्यावयाचा, असा विभाग मान्य झाला असल्यामुळें, छंद, अलंकार, व्याकरण व कोश यांचा चिवडा हिंदुस्थानांत कधींही पसंत होणार नाहीं. सारांश, अशास्त्र व अव्यवस्थित सर्वसंग्रह हें नांव बहुतेक युरोपियन भाषाकोशांना यथास्थित शोभतें. राष्ट्रीय व संपूर्ण मराठी कोश रचणारांनीं हा अव्यवस्थितपणा टाळला पाहिजे. युरोपियन लोक राजकीय दृष्ट्या प्रस्तुत काळीं मोठे म्हणून

भासंपु २९
८७३०२

समजले जातात. परंतु कोशकरणांत किंवा व्याकरणरचनेंतही ते सर्वस्वीं मान्य आहेत असें समजणें खोटेपणाचें लक्षण आहे." राजवाड्यांनीं पुढें ज्या स्थूल सूचना दिल्या आहेत, त्यांतील कांहीं या मतास अनुसरूनच आहेत. ते म्हणतात—" संहित शब्द देऊं नयेत; तें काम व्याकरणाचें आहे. वाच्यार्था-व्यतिरिक्त लक्ष्यार्थ व व्यंग्यार्थ कोशांत देऊं नयेत. ...शब्दांचा उपयोग दाखविण्याकरितां ग्रंथांतील वाक्यांचा उद्धार कोशांत करूं नये; हें काम कोशाचें नाहीं; साहित्यशास्त्राचें आहे...संस्कृत कोशांत कोशकार ग्रंथोद्धाराचें काम करीत नाहीं; कोशाचा टीकाकार करतो.[1] टीकाकार व्युत्पत्ति, स्थिति, उपयोग, प्रतिशब्द, वगैरे सर्व प्रपंच करितो. हें टीकाकाराचें काम युरोपियन कोशकार टीपेंत न करतां शब्दाच्या पुढें बारीक ठशांत, कंसांत व उपकंसांत करितात व वचनोद्धाराचें काम शब्दाच्या अर्थापुढें करितात. सारांश, युरोपियन कोशकार आपल्या कोशाला टीपा देण्याचें काम आपणच करितात; कोश व टीपा यांत भेद करीत नाहींत. संस्कृत ग्रंथकार टीपा देण्याचें काम कोशांत करीत नाहींत; ह्याचीं चार कारणें आहेत–( १ ) व्याकरण, छंद, अलंकार, कोश ह्यांचे प्रांत भिन्न आहेत असें ते समजतात; ( २ ) सूत्रपद्धति त्यांच्या हाडींमासीं खिळली आहे, त्यामुळें वायफळ व विस्तृत लिहिण्यास अवकाश नसतो; ( ३ ) बहुतेक सर्व कोश वृत्तरूप आहेत; ( ४ ) कोश विद्यार्थ्यांकडून तोंडपाठ करून घ्यावयाचे असतात." राजवाड्यांच्या या मताप्रमाणें कोश म्हणजे केवळ शब्दार्थांची एक जंत्रीच होऊन बसेल. हें मत आज सुज्ञांस ग्राह्य होईल असें आम्हांस वाटत नाहीं. कोशरचनेचे वर उल्लेखिलेले विभाग आमच्या पूर्वजांनीं अलग कां राखिले याचीं कारणें मीं मागें दिलीं आहेतच. आजही हे सवतेसुभे कायम राखणें फायदेशीर कसें आहे हें मात्र राजवाड्यांनीं स्पष्ट करून सांगितलें नाहीं. काल बदलला, परिस्थिति बदलली, त्यांना अनुसरून या विभागांत थोडाबहुत फेरफार पडणें अगदीं साहाजिक आहे. छापण्याच्या कलेच्या प्रसारामुळें आज सूत्रांची व पद्यांची जरूरी राहिली नाहीं; उलट, एके ठिकाणीं संकलित रूपानें शब्दार्थांची सारी उपयुक्त माहिती मिळाल्यास भाषेच्या अभ्यासकाची फारच मोठी सोय होईल. व्युत्पत्ति,

१. या बाबतींत पान १७ पहा.

व्याकरण, अलंकार, इत्यादि शास्त्रांचें काशीस जाऊन बारा वर्षे सांगोपांग अध्ययन करण्याचे दिवस गेले. मूठभर पंडितांच्या हातीं विद्येचा मक्ता ज्या युगांत रहात असे, त्या मध्ययुगांतील ज्ञानार्जनाच्या दुष्कर पद्धतींचा आज पुरस्कार करणें समंजस होणार नाहीं. आज थोड्या श्रमानें अधिक ज्ञान मिळविण्याच्या उपयुक्त रीतीचेंच अवलंबन केलें पाहिजे. ज्ञानाचा प्रसार झपाट्यानें होण्यास ज्ञानदानाची पद्धति अगदीं सुलभ, सोइस्कर, व सर्वगामी असली पाहिजे. अशा पद्धतीस अनुरूप असाच आधुनिक कोश असला पाहिजे. राजवाड्यांच्या सूत्रनांस अनुसरून रचिलेला कोश वापरणाऱ्यास व्याकरण, अलंकार, व्युत्पत्ति यांचा समग्र व निराळा अभ्यास करावा लागेल. ज्यांनीं असा अभ्यास केला आहे असे महाराष्ट्रांत आज किती लोक निघतील बरें ? तशांत ज्यांना वैयाकरण अगर व्युत्पत्तिविशारद व्हावयाचें असेल त्यांनीं या शास्त्रांचा खुशाल स्वतंत्र अभ्यास करावा; पण भाषेच्या साध्या अभ्यासकाकडून या ज्ञानाची अपेक्षा करणें उचित होणार नाहीं; व म्हणूनच त्याजसाठीं रचिलेल्या आमच्या महाराष्ट्र शब्दकोशांत वर उल्लेखिलेली सारी उपयुक्त माहिती दिली पाहिजे, तरच त्या कोशास संपूर्ण हें विशेषण शोभेल. आर्यसंस्कृतीच्या पुनरुज्जीवनार्थ झटणाऱ्या गुजरात विद्यापीठासारख्या राष्ट्रीय संस्थेनेंही कोशरचनेच्या या आधुनिक पद्धतीचाच स्वीकार केला आहे. या विद्यापीठानें नुकताच एक गुजराती 'जोडणीकोश' प्रसिद्ध केला आहे. त्या कोशाच्या प्रस्तावनेंत ज्या पाश्चात्य कोशरचनेच्या तत्त्वांस राजवाड्यांनीं अशास्त्र व अव्यवस्थित म्हणून वर्णिलें आहे, त्याच तत्त्वांचा पुरस्कार केला आहे. सारांश, शब्दार्थांचें आमूलाग्र चरित्र देणें हेंच आमच्या कोशाचें ध्येय आम्हीं ठरविलें पाहिजे.

अशा सर्वांगपरिपूर्ण कोशांत तीनचार गुण प्राधान्येंकरून असले पाहिजेत. त्यांतील पहिला गुण अर्थात् संपूर्णता हा होय. कोशांत शक्य तितकी उणीव म्हणून रहातां कामा नये. "जुने व वर्तमान, लुप्त व प्रचलित, ग्राम्य व सभ्य, राष्ट्रीय व प्रांतिक" असे एकोनएक शब्द न देणें, विविध अर्थ न दर्शविणें, इत्यादि "नानाप्रकारांनीं नग्न" अशा कोशास संपूर्णतेचा अलंकार शोभणार नाहीं. जिवंत भाषेची वाढ सारखी चालूच असते. तींत बाहेरून नवे शब्द

दाखल होत असतात. जुने वतनदार शब्द मागें पडून नवे उपरी पुढें येत असतात. शब्दांचे जुने अर्थ पालटून नवेच प्रस्थापित होत असतात. कधीं कधीं मृत शब्दांचें व अर्थांचें पुनरुज्जीवन होत असतें. या साऱ्या फेरफारांस अनुसरून दर पिढींत कोशांत सुधारणा करावी लागेल. तथापि ज्या वेळीं कोश तयार करावयाचा त्या वेळेपुरता तरी तो परिपूर्ण असला पाहिजे. त्या काळापर्यंत उपलब्ध असलेले सारे शब्द, व माहीत असलेले सारे अर्थ, भाषाकोविदांनीं तपासून मान्य केलेल्या साऱ्या व्युत्पत्त्या, इत्यादि सारी माहिती कोशांत आली पाहिजे; तरच त्या कोशास संपूर्ण हें विशेषण लाभेल. सारांश, मानवी प्रयत्नांत एका विशिष्ट काळीं जितकी परिपूर्णता आणितां येईल तितकी या कोशांत आणिली पाहिजे.

अशा कोशांतील माहिती जर कां थोडीशी देखील चुकीची असेल तर त्याच्या संपूर्णतेवर पाणी पडेल. म्हणून कोशांत बिनचूकपणा हा दुसरा मोठा गुण असला पाहिजे. कोशाच्या कीर्तीची सारी मदार या एका गुणावर असते असें म्हटलें तरी चालेल. कोशांतील माहिती अगदीं लहानशा बाबतींतही चुकीची आहे, अशी जर का एखाद्या अभ्यासकाची खात्री होईल तर त्याचा सगळ्या कोशावरील विश्वास साफ उडेल. म्हणून कोशांतील सारी माहिती अगदीं कसून तपासली पाहिजे. अत्यंत दक्षता राखून किंबहुना डोळ्यांत तेल घालून चूक अशी मुळींच होऊं देतां कामा नये. छपाईच्या बाबतींतही बिनचूकपणा इतका असावा कीं, साधारणतः शुद्धिपत्र देण्याची जरूरी पडूं नये.[१] हें सारें काम खंतीचें आहे; पण अशा आस्थेनेंच रचिलेला कोश विद्वानांससुद्धां प्रमाणभूत होत असतो.

कोशांतील माहिती संपूर्ण व बिनचूक असूनही जर ती व्यवस्थेशीर मांडिली नसेल, तर मग त्या गबाळग्रंथी कोशाचा काय उपयोग ? म्हणून कोशांत स्पष्टपणा अथवा विशदत्व हा तिसरा मोठा गुण अवश्य असला पाहिजे. कोशाची मांडणी जितकी स्पष्ट व सुबोध असेल तितका त्याचा उपयोग अधिक. धनधाचें ऐश्वर्य प्रेक्षकांच्या डोळ्यांत चटकन् भरेल अशा रीतीनें भांडारांतील

१. **शुद्धिपत्र विनानो** शब्दकोश ए...भाषाने देह आपनारी वस्तु छे. **—गांधीजी.**

रत्नसंग्रहाची कुशल मांडणी करण्यांत ज्याप्रमाणें कोशाध्यक्षाची हुशारी दिसून येते, त्याचप्रमाणें भाषेंतील शब्दार्थांचीही शिस्तवार व सुव्यवस्थित मांडणी करण्यांतच कोशकाराची खरी कर्तबगारी दिसून येते; केवळ शब्दार्थ एकत्र करण्यांत नव्हे.[१] किंबहुना रचनेच्या या व्यवस्थेवरूनच कोशाचें विशिष्टत्व-अद्वितीयत्व-शाबीत होत असतें.

★

१. "The words and the meanings of the words of a Dictionary can scarcely be proved by its compilers to belong exclusively to themselves. It is not the mere aggregation of words and meanings, but the method of dealing with them and arranging them, which gives a Dictionary the best right to be called an original production." Monier-Williams, Sanskrit-English Dictionary, preface.

# ललितवाङ्मय, ध्येयवाद व नवमतवाद*

मी या भाषणाचा आरंभ अगदीं परंपरागत पुराणपद्धतीनेंच करणार आहें. आधीं वंदूं श्रोतेजन. "तुम्ही श्रोते जगदीशमूर्ति । तेथें माझी व्युत्पत्ति किती । बुद्धिहीन अल्पमति । सलगी करितों ॥" आणि खरोखरच ललित-वाङ्मय व त्याचें ध्येय, कला, नीति आणि नवमतवाद, यांसारख्या रसिक व व्यापक विषयांची चिकित्सा करण्याचा मान मीं मजवर कां ओढून घ्यावा ? मी कांहीं कुशल कादंबरीकार नाहीं. वाङ्मयाच्या त्या कथाविभागांत मजकडून अद्याप एखादा उल्कापात घडला नाहीं. कल्पक कवि म्हणून गाजण्याचें यश अजून मला लाभलें नाहीं. नवीन नाटकें निर्माण करून नवमतवादाची ज्योत जागत ठेवणारा मी 'नवरात्री' नाहीं. मग सीमोल्लंघन तर दूरच राहिलें! एका पक्षीं प्रतिभासाधनाचा ध्वजही फडकाविला नाहीं; तर दुसऱ्या पक्षीं वाङ्मयाच्या संसारांत पुरुषार्थाचें नांव घेण्यासारखें संपादनही केलें नाहीं. बरें, इतकी तीव्र जाणीव असून देखील जुन्या कवींप्रमाणें सद्गुरूला शरण जाऊन त्याच्या नांवाखालीं लिखाण करण्याचा सोइस्कर संप्रदाय मला अनुसरतां येत नाहीं; कारण मला अजून सद्गुरूची सोयच सांपडली नाहीं. मग हा खटाटोप करावा तरी कशाला ? याला उत्तर एकच. टीका करणें ही चिकित्सकाची खोडच आहे. टीकाकार म्हणजे सुज्ञांची चिकित्सा करणारा एक महामूर्ख असें कोणी एकानें त्याचें खुबीदार वर्णन केलें आहे. जेथें पदन्यास रंभा करीना । नाचेल कुब्जा तिला राहवेना !

एवढें मात्र खरें कीं, ही चिकित्सा करण्याला मला जो अनावर मोह झाला तो हा विषय केवळ प्रासंगिक किंवा तात्कालिक महत्त्वाचा म्हणून खास नव्हे. आज या भारती-युद्धांत मोठे-मोठे रणझुंझार धुरंधर वीर उतरले आहेत म्हणून ईर्ष्येनें चक्रव्यूहांत फसण्याची दुर्बुद्धि अभिमन्युबाळाला झालेली नाहीं. हा विषय समाजाच्या अत्यंत जिव्हाळ्याचा आहे; व एका अर्थी याचें महत्त्व

---

* हा एका व्याख्यानाचा सारांश 'प्रतिभे'च्या शके १८५७ च्या वर्षप्रतिपदेच्या विशेषांकांत प्रसिद्ध झाला. ता. ४ एप्रिल, १९३५.

नगर वाचनालय, सातारा.
नगर वाचनालय सातारा

संगणकीकृत

सनातनच आहे. समाजाच्या जीवनाचा व ललितवाङ्मयाचा इतका निकट संबंध आहे कीं, ललितवाङ्मयाचें कार्य काय या विषयाकडे केवळ कलावंतांचेंच नव्हे तर समाजांतील साऱ्या जाणत्यांचें लक्ष अवश्य वेधलें पाहिजे. ललित-वाङ्मय आणि नीति यांचा झगडासुद्धां जुनाच आहे; बदलणाऱ्या नीतीप्रमाणें त्याचें स्वरूप पालटतें एवढेंच काय तें. जोंपर्यंत समाजांत रूढ असलेल्या व मान पावलेल्या कल्पनांना धक्का लावल्याशिवाय ललितवाङ्मय मनोरंजन करितें तोंपर्यंत त्याच्या वाटेस कोणी जात नाहीं. गारोड्याच्या पुंगीबरोबर डोलणारा नाग जनांचें मनरंजन करितो व क्वचित् प्रसंगीं त्याला दुधाची वाटी देखील बहाल करितात. पण तोच जर अंगावर धांवून येऊन फूत्कार टाकूं लागला तर त्याला ठेंचून टाकण्याची एकच हाकाटी होईल. ललितवाङ्मयाची किंवा कलेची तीच गत होते. या नागांचा भरंवसा न वाटल्यामुळें कांहीं धर्मांनीं तर कलेचें पार उच्चाटन करण्याची जनमेजयी प्रतिज्ञा केलेली आढळते. ती विजयी होत नाहीं ही गोष्ट निराळी! आमच्या समाजाच्या कांहीं आवडत्या समजुतींना व भ्रमांना कलावंत आज दंश करावयाला सरसावले आहेत म्हणून या कलासत्राला जरासा जास्त ऊत आला आहे. तसेंच 'नवमतवाद' 'नवमतवाद' म्हणून जो अट्टाहासानें पुकारिला जातो त्यांत वास्तविक नवें असें कांहींच नाहीं. नवमतवाद हें काळाचें बालक आहे. प्रत्येक युगांत हें जन्माला येत असतें. अर्थात् याच्या अवताराच्या स्वरूपांत फरक हा असणारच. आणि प्रत्येक युगांत, आजोबाच्या मूळावर आलेलें म्हणून पांढऱ्या पायांचें, अवलक्षणी, अशी वृद्धांकडून त्याची संभावना ही व्हावयाचीच! दर पिढींत जुनें तेवढें सोनें म्हणून त्यालाच बिलगणारा एक वर्ग असतो; त्याचबरोबर नवें तेवढेंच हवें असा आग्रह धरणारा दुसरा उदयाभिमुख तरुण वर्गही असतो. असो. ललितवाङ्मय, नीति व नवमतवाद, ही सामाजिक जीवनाची प्रस्थानत्रयीच आहे. ललितवाङ्मयासारखी विचारप्रचारक आणि विचारप्रवर्तक अशी कार्यक्षम संस्था समाजांत दुसरी आढळणार नाहीं. या संस्थेचें धोरण जर भावी काळाकडे नजर ठेवून आधींपासूनच व्यवस्थित रीतीनें आंखिलें नाहीं तर अहित होण्याचा बराच संभव असतो. सारांश, या विषयाच्या आकलनावर व योग्य निर्णयावर पुढील पिढीचें कल्याण अवलंबून आहे या जाणिवेनेंच मी या चिकित्सेस उद्युक्त झालों आहें.

या भाषणांत मी केवळ अस्सल ललितवाङ्मयाविषयींच सांगणार आहें. खरें अस्सल ललितवाङ्मय अगर सारस्वत हें सृष्टींतील फुलांसारखें टवटवीत व आल्हाददायक असतें. त्यांचा सुगंध पिळून घेऊन तो सांठवून अत्तराच्या रूपानें वाचकांस फिरून अर्पण करणें हा सारस्वताचा दुसरा गौण प्रकार. अनुभवानें समृद्ध झालेलें सारस्वत श्रमानें निर्माण केलेल्या संपत्तीप्रमाणें आहे. तेंच खरें मूलधन. खऱ्या सारस्वताची चर्चा-चिकित्सा करून अनुभवापेक्षां शब्दाचेंच भांडार भरणें व आयत्या मूलधनाची व्याजानें वाढ करणें हे दोन्ही प्रकार सारखेच.

हें असलें अस्सल सारस्वत निर्माण करण्याचा अधिकार कोणाचा ? त्याचा स्रष्टा हा आधीं द्रष्टा असला पाहिजे. सभोंवतीं जड व मानवी विश्वाचा अखंड खेळ चाललाच आहे. लक्ष त्याकडे देतो कोण ? आला क्षण गेला क्षण, असेंच बहुजनसमाजाचें जीवित बघतां बघतां निघून जातें. या वर्णांधांच्या व नादबधिरांच्या समाजांत आधीं डोळस व स्वरज्ञ असल्याशिवाय अनुभव तरी कसले येणार ? ढगांचे नाना रंगढंग होतात. पण ते चितारावयास रस्किनच लागतो. सायंकाळीं सहल करितांना तारेच्या खांबांतून येणाऱ्या सूंकाराच्या तानेला "यः पूरयन्कीचकरंध्रभागान्दरीमुखोत्थेन समीरणेन" असें वर्णन करणारा कालिदासच साथ देतो. तसेंच, ज्याप्रमाणें जडसृष्टीचा अनुभव त्याप्रमाणेंच मानवी भावनांची प्रचीति देखील आली पाहिजे. मानवी जीवन हें विविध भावनांचें, रसांचें आगर आहे. या निरनिराळ्या भावनांचा भागीदार होण्याचें भाग्य फार थोड्यांस लाधलें आहे. सारस्वताच्या निर्मात्यानें परकायाप्रवेश करण्याची सिद्धि साधिली पाहिजे. संसारांत वावरणाऱ्या अनेक पात्रांचें रूप धारण करणारा बहुरूपी जादुगार बनलें पाहिजे. एका क्षणांत उमदा रंगेल चारुदत्त, तर दुसऱ्या क्षणांत मतिमंद, नीच, पण कावेबाज संस्थानक होण्याइतकें चपळ नटवें मन त्याचें असलें पाहिजे. शर्विलकाच्या धंद्याची गोम उमगली पाहिजे; धनाची अवगणना करणाऱ्या गणिकेचें प्रेमवेड, तसेंच धूतेची पवित्र पतिनिष्ठा यांची सारखीच जाणीव पाहिजे; व या मोठ्यांबरोबरच सोन्याची गाडी मागणाऱ्या लडिवाळ बाळाचाही हट्ट पुरवितां आला पाहिजे. नुसत्या साध्या भावनांची प्रचीति पुरेशी होत नाहीं; विकृत भावनांची

तितकीच जरूरी असते. नाहींतर रॅस्कोलिनीकॉफचें खुनी अभ्यंतर कोण उकलून दाखवील ? आपली अवलाद कमअस्सल आहे या केवळ संशयानें पछाडलेल्या माथेफिरू बापाचें वेड स्ट्रिन्डबर्गप्रमाणें कोण लावून घेईल ? अनुभवाचें-प्रचीतीचें क्षेत्र जितकें विस्तृत व व्यापक असेल तितकें थोडेंच. जॅक लन्डनच्या कुत्र्या-लांडग्याच्या समदर्शित्वापासून तों समाधिसुखाच्या दिव्य संदेशापर्यंत सर्व प्रकारच्या अनुभवांचा अधिकार असल्याखेरीज वाङ्मय संपन्न कसें होणार ? बरें, स्वतःला अनुभवाची खूण पटली–स्वतःला आत्मप्रचीति झाली–म्हणून कार्यभाग साधत नाहीं. ज्याचें सुख त्याला : काय असे परक्याला ? सारस्वताच्या निर्मात्याचा खरा विशेष तो हाच, कीं त्याला कोणाही परक्याला आत्मप्रचीतीचा वाटेल तेव्हां साक्षात्कार करून देतां येतो. त्याची तंद्री एखाद्या गांजेकसाच्या गुंगीप्रमाणें स्वतःपुरतीच नसते, तर त्यास खऱ्या परमहंसाप्रमाणें दुसऱ्याच्या मस्तकावर वरदहस्त ठेवून त्याची देखील आत्मस्थिति सांडवितां येते. आणि म्हणूनच सारस्वताच्या निर्मात्यांस बोलके चिंतामणी म्हणतात. शब्द त्यांच्या सेवेस सदा हात जोडून तयार असतात. त्यांच्या बोलांत प्रसाद असतो. त्यांच्या मांडणींत लालित्य असतें. या मांडणीच्या, रीतीच्याच जोरावर ते आपलें इंद्रजाल उभारतात. याच अर्थानें रीति हा काव्याचा, सारस्वताचा खरा आत्मा आहे. वाङ्मयांत काय सांगितलें आहे यापेक्षां तें कसें सांगितलें आहे हें बहुधा जास्त महत्त्वाचें असतें.

सारस्वत व त्याचा स्रष्टा यांच्या गुणविशेषांची ही उजळणी या ठिकाणीं हेतुपुरस्सर केली आहे. हेतु हा, कीं सारस्वताचें कार्य काय हें कळावें व त्याचा उद्देश उघड व्हावा. टॉल्स्टॉयनें हेंच अगदीं थोडक्या शब्दांत सांगितलें आहे. तो म्हणतो–" स्वतः एकदां अनुभविलेली भावना पुनः अनुभविणें, व शब्दांच्या द्वारा दुसऱ्यांस तिची संवेदना करून देणें, व त्यांसही ती अनुभवावयास लावणें हें कलेचें, ललितवाङ्मयाचें खरें कार्य आहे. " टॉल्स्टॉयचें नांव घेतल्यावर नवमतवादी कदाचित् नाकें मुरडतील, व म्हणतील, कीं या म्हातारचळांतील बरळण्याला विशेषशी किंमत नाहीं. टॉल्स्टॉयचीं कलेविषयीं कांहींही मतें असोत; व मी स्वतः तीं सर्वच बरोबर अगर सर्वच चुकीचीं आहेत असें म्हणावयास तयार नाहीं. तथापि कलेची वरील व्याख्या मात्र

अत्यंत समर्पक व सत्य आहे याविषयीं कोणाही सुज्ञ रसिकाचें भिन्न मत होईल असें मला वाटत नाहीं. नवमतवादी ज्या शॉचें सदा नामस्मरण करितात त्याला सुद्धां ही व्याख्या मान्य आहे एवढा निर्वाळा खास त्यांच्यासाठीं येथें दिला म्हणजे पुरे.[1]

स्वतः अनुभविलेल्या भावनांचा इतरांत प्रसार हें ललितवाङ्मयाचें खरें कार्य असें जर ठरलें तर मग समाजाच्या दृष्टीनें ही एक अत्यंत महत्त्वाची संस्था मानिली पाहिजे; व या संस्थेमार्फत कोणत्या भावनांची संभावना होऊं नये, कोणत्या कल्पनांचा फैलाव होऊं नये, हें सांगण्याचा समाजास हक्क प्राप्त होतो. कलावंतांनीं कलेच्या नांवानें कितीही हाकाटी केली तरी समाज तो हक्क गाजविल्याशिवाय राहणार नाहीं. समाजहितास विघातक अशा भावनांचें उद्दीपन अथवा समाजव्यवस्थेचा बिघाड करणाऱ्या कल्पनांचा प्रचार ललित-वाङ्मयानें करूं नये हें मूलभूत नियंत्रण समाजांत राहूं इच्छिणाऱ्या कलावंतांस पाळिलें पाहिजे. मात्र समाजाचें हित कशांत सांठविलें आहे व सुखाची समाजव्यवस्था कोणती या मुख्य तपशिलाविषयीं मतभेद हा राहणारच. नव्या-जुन्यांचा झगडा तो हाच. नवमतवाद्यांनीं अमुक एक भावना अथवा कल्पना वाङ्मयांत दाखल करूं नये हा जो जुन्या शिष्टांचा गहजब चालू असतो याविषयीं मला या भाषणांत कांहीं सांगावयाचें नाहीं. मी एवढेंच म्हणेन, कीं दोघांनीं थोडासा उदारपणा व थोडेंसें सौजन्य दाखवावें. सत्य ही जर खरोखर मानवास साध्य होण्यासारखी चीज असेल तर कदाचित् ती या मतामतांच्या गलबल्यांत गवसेल देखील ! हातघाईवर आल्यामुळें सत्य ताबडतोब हस्तगत होईल असा मात्र संभव दिसत नाहीं.

माझी खरी तक्रार वेगळीच आहे. अमुकच विशिष्ट मताचा प्रचार ज्यांत आहे तेंच ललितवाङ्मय या पदवीस पात्र आहे व इतर सर्व लिखाण टाकाऊ, हा जो नवमतवादाचा सिद्धान्त अलीकडे प्रस्थापित होऊं पहात आहे त्याचा मी प्रतिकार करूं इच्छितों. 'इंदु काळे व सरला भोळे' या कादंबरीचा ध्येयवाद म्हणे काय तर वांझोटा ! 'जयमंगला' काव्यांत[2] गरिबांच्या

१. 'Pen Portraits and Reviews' pp. 257-258.

२. हें काव्य उदाहरणार्थ घेतलें आहे, उत्कृष्ट नमुना म्हणून नव्हे.

किंचाळया नाहींत, सारेच प्रेमपाठ, म्हणून तें हीन. नाटकें लिहावींत तर मतप्रचारासाठीं. आणि हा व्यावहारिक ध्येयवाद आमच्या मराठी वाङ्मयांत कधीं सुरू होणार याची हे तृषित चातक आ वासून वाट बघत आहेत.

ललितवाङ्मय कसें निर्माण होतें, त्याचा हेतु कोणता, त्याचें खरें कार्य काय हें वर कां समजून सांगावें लागलें तें आतां सहज कळेल. सारस्वताचें क्षेत्र जर विश्वव्यापी आहे तर त्याला कांहीं थोड्या तत्त्वांच्याच कोंडवाड्यांत बांधून टाकणें कितीसें समंजस होईल ? लेखकाच्या अप्रतिहत संचारास पायबंद कां घालावा ? या प्रश्नाचा पक्षाभिनिवेश सोडून शांतपणें विचार अवश्य केला पाहिजे. ध्येयवादी लोकांचे दोन वर्ग कल्पितां येतील. त्यांतील एक वर्ग स्वतः कोणत्याही विशिष्ट मतांना बिलगून राहत नसून सुद्धां 'वाङ्मय बोधासाठीं, मोदासाठीं नव्हे' असें कंठरवानें सांगत असतो. मीं स्वतः 'कलेसाठीं कला' या महामंत्राचा गुरूपदेश घेतला नाहीं. माझें आपलें असें एक मत बनलें आहे, कीं या महामंत्राचा जप करणाऱ्या शंभर लेखकांपैकीं नव्वदांची कला 'कलेसाठीं' नसून 'पैशासाठीं' असते. उरलेल्या दहांपैकीं नवांना पूर्ण जाणीव असते, कीं आपलें नाणेंच खोटें व म्हणूनच तें चालत नाहीं; यास्तव ते जनतेवर उलटून म्हणतात, कीं तुम्हीच अनभिज्ञ, आमच्या कलोपासनेचें कर्मकांड इतरेजनांस काय समजणार ? 'कश्चित् यतति सिद्धये' या कोटींतील कलोपासक एखादाच असतो; व तो बिचारा आपल्या कलेची व कलाकृतीची मुळींच वाच्यता करीत नाहीं. असें जरी असलें तरी 'वाङ्मयांत बोध असलाच पाहिजे, कांहींतरी तत्त्व ग्रथित केलेंच पाहिजे' हा आग्रह अगदींच कोता होय. झाडावरील अगर वेलीवरील फुलांत काय काव्य नाहीं ? देवाला घालण्याकरितां त्यांची माळ करणें हाच का त्यांचा मोठा उपयोग ? बोधगर्भ तेवढेंच वाङ्मय असें ठरविलें म्हणजे 'धम्मपद', 'मनाचे श्लोक', 'ख्रिस्ताच्या दहा आज्ञा' यांनींच वाङ्मयाचा संसार थाटला पाहिजे.[1] व ललितवाङ्मय म्हणजे एक भली थोरली 'इसापनीति' अथवा हितकारी ( – रुचकर नव्हे – ) 'बालबोध मेवा' होईल. 'बरें सत्य बोला यथातथ्य चाला' हा उत्कृष्ट उपदेश झाला; सत्याचा जय व असत्याचा विनाश ही मोठी समाधानकारक सदिच्छा आहे. पण

१. यांतील काव्य मला प्रिय आहे हें सांगणें नलगे.

सरस्वतीचें मयूरसिंहासन म्हणजे व्यासपीठ नव्हे असें जे प्रो. फडके सांगतात त्यांत वास्तविक तथ्य आहे. सिंहासन जरी मोराच्या भडक पिसाऱ्यानें नटलेलें असलें तरी देवीची मूर्ति मात्र नटवी नाहीं.[१] ती शुभ्र वस्त्र परिधान केलेली पावित्र्याची देवी आहे हें कलावंतांनीं ध्यानांत ठेविलें म्हणजे पुरे.

वाङ्मय बोधगर्भ असलें पाहिजे हा आग्रह धरणारा वर्ग इतका डोईजड झाला नाहीं व होणारही नाहीं. परंतु दुसरा जो नवा उदयाभिमुख ध्येयवादी वर्ग बळावूं पहात आहे त्याची खरी ओळख पटून आपण त्याच्या तत्त्वांची पुरी पारख केली पाहिजे. आरंभीं मला हें सांगितलें पाहिजे, कीं ध्येयवादी वाङ्मय मला स्वतःला प्रिय आहे. तें केवळ या लेखापुरतें नव्हे, हें खालील उताऱ्यावरून दिसून येईल. "सभोंवतालच्या जगाच्या सुख-दुःखाचे भागीदार होणें हेंच संस्कृतीचें खरें लक्षण. दुसऱ्यांच्या वेदना कळावयास लागल्या म्हणजे साहजिकच चौकस मनाची प्रवृत्ति त्याच्या कारणमीमांसेकडे वळते व मग असें आढळून येतें, कीं आज जीवित जें दुःखमय झालें आहे त्याचें बऱ्याचशा अंशीं सामाजिक अन्याय हें खरें कारण होय. हे अन्याय चव्हाट्यावर मांडण्याचें, हीं पापें वेशीवर टांगण्याचें काम कलेनें केल्यास श्रेय व प्रेय हीं दोन्ही एकदम साधितां येतात...शोकांतून श्लोक निर्माण करणाऱ्या पुण्यश्लोक कवींची आपल्या देशांत प्राचीन परंपरा आहेच."[२] पण व्यक्तिगत आवडीच्या आधारेंच वाङ्मयांत बऱ्या-वाइटाचा निवाडा करतां येत नाहीं. मतप्रचारार्थ लिहिलेलें वाङ्मय मर्यादित स्वरूपाचें व दुय्यम दर्जाचें असतें. चरखा, ग्रामोद्धार यांसारख्या तात्कालिक विषयांचें योग्य स्थान म्हणजे वर्तमानपत्रांचे रकाने. असलीं 'ध्येयें' जरी वगळलीं तरी एवढी गोष्ट स्पष्ट आहे, कीं काव्य व कादंबरी यांत नाटकाप्रमाणें मतप्रचार करणें व तो सिद्धीस जाणें फार कठीण. नाटक हें ध्येयप्रसाराचें उत्कृष्ट साधन आहे याचीं दोन मुख्य कारणें आहेत. तें दृश्यकाव्य असल्यामुळें मनावर चटकन् परिणाम होतो.

१. 'What is Art?' या पुस्तकाच्या १८ व्या प्रकरणांत टॉलस्टॉयनें नटवी बाजारबसवी कला व साधी खरी कला यांची तुलना केली आहे.

२. वरेरकरांचा 'स्वैरसंचार'-'रत्नाकर', फेब्रुवारी, १९३३.

व्यासपीठाचा व नाटकाचा संदेश त्या स्थळीं जमलेल्या मंडळींसाठीं असतो; व जमावांत प्रचाराचें कार्य केव्हांही यशस्वी होतें. काव्यगायनानेंही असाच परिणाम घडवून आणतां येईल. शाहीरांची व त्यांची परंपरा चालविणाऱ्या आजकालच्या कवींच्या कीर्तीची समूहांतच विशेष खूण पटेल. पण सुदैवानें कादंबरीवाचन अजून सुरू झालें नाहीं. महाभारतांतील सूतासारखे पुरुष या धांवपळीच्या युगांत अवतरतील असें वाटत नाहीं. आणि कवितांच्या जरी कितीही तबकड्या झाल्या तरी काव्याची माधुरी व त्याचा संदेश व्यक्तिप्रधानच राहणार. तेव्हां मतप्रचारासाठीं काव्य व कादंबरी यांचा विशेषसा उपयोग होत नाहीं. तीन-चार अंकांच्या आटोपशीर रचनेंत एकाद्या शिष्टसंमत भ्रमाचा अथवा रूढ अन्यायाचा विरोधात्मक उठाव करणें नाटककारास सोपें जातें. छाया-प्रकाशांच्या या योजनेमुळें प्रेक्षकाचें चित्त साहजिकच वेधतें; व त्याच्या विचारांस न कळत चालना मिळते. गॉल्सवर्दी व इब्सेन यांचीं नाटकें य विधानांची साक्ष पटवितील. जीवनांतील द्वंद्वांवरच अशा नाटकांची खरी मदार; मतप्रचाराचा आधार खरोखर गौण. कादंबऱ्यांच्या अनेकप्रकरणी पाल्हाळांत असल्या कला-लाघवास फारसा वाव मिळत नाहीं. व म्हणून पुष्कळ वेळां कलेची हानि तर होतेच, पण प्रचारही लुळा पडतो. याचें अगदीं ताजें उदाहरण म्हणजे A. P. Herbert यांची 'Holy Deadlock' ही बंधमोक्ष[1] (Divorce) या विषयावर लिहिलेली कादंबरी होय. कला व प्रचार या दोन्ही डगरींवर हात ठेवूं पाहणारा कलावंत बहुशः तोंडघशीं पडतो असाच अनुभव आहे. उत्कृष्ट कला व निकृष्ट प्रचार, अथवा उलट पक्षीं जोरदार प्रचार व निःसत्त्व कला, अशा तऱ्हेची भेसळच फार आढळते. कला व मतप्रचार या दोन्ही बाबतींत नांवाजलेल्या चार-दोन पुस्तकांचा इतिहास मोठा उद्बोधक आहे. गुलामगिरीबरोबर 'टॉमकाकाची झोंपडी' ही गेली. दोन खंडांत विलक्षण खळबळ उडवून देणारें हें पुस्तक आज किती लोक वाचतात? 'गलिव्हरचा वृत्तान्त' तर लहान मुलांचें खेळणें झालें आहे! आपल्याकडील 'पण लक्षांत कोण घेतो?' या कादंबरीची आज काय

१. काडीमोड, घटस्फोट, लग्नविच्छेद यांसारख्या फोडतोडीच्या निकराच्या शब्दांपेक्षां कौटिल्याचा हा शब्द रूढ झाल्यास बरें.

गोडी ? आज, 'पण लक्षांत घ्यावयाचें तरी काय ?' असा उलट सवाल टाकावा लागेल ! 'शारदा' नाटक समाजानें पचविलें तें इतकें, कीं आपण 'सारडा कायद्या'चा 'शारदा कायदा' केला. पण तें नाटक कोणी रंगभूमीवर आणीत नाहीं ! त्याच देवलांचें 'संशयकल्लोळ' मात्र आज देखील आनंद देतें. याचें कारण उघड आहे. विशिष्ट मताच्या, तत्त्वाच्या, अथवा व्यावहारिक ध्येयाच्या प्रचारासाठीं निर्माण झालेली कला-कृति एका विवक्षित काळांत व समाजांत शोभते व खपते. तो काळ निघून गेला व ती परिस्थिति नाहींशी झाली म्हणजे अर्थात्‌च तिचें स्वारस्य नाहींसें होतें. ग्रीष्मांतील शीतळ उपचार शिशिरांत पीडा देतात व शिशिरांतील प्रिय ऊब ग्रीष्मांत तापदायी होते. काळ कलेची खरी पारख करितो ती अशी. आपलें बंधन न जुमानणाऱ्या कलेपुढेंच तो मान वांकवितो. दिक्-कालाचीं बंधनें उल्लंघून कोठेंही व केव्हांही वाचकाच्या मनांत स्वतः अनुभविलेल्या भावनांचें प्रतिबिंब उमटविणें हेंच जर कलावंताचें खरें यश, तर तें मतप्रचारक अगर ध्येयवादी लेखकांच्या वांट्यास एका ठराविक मर्यादेपलीकडे येणार नाहीं. सारांश, असलें वाङ्मय साधन व सिद्धि या दोनही बाबतींत मर्यादित स्वरूपाचें आहे.

आणि या वाङ्मयाची अक्षय्य आनंद देणाऱ्या सार्वत्रिक वाङ्मयाशीं तुलना करा म्हणजे मग मी त्याला दुय्यम दर्जाचें कां म्हणतों तें कळेल. 'मेघदूतां'त कसल्या मतांचा गडगडाट आहे ? 'शाकुंतला'चें ध्येय काय ? ज़यदेवानें कोणत्या तत्त्वांचा जयजयकार केला ? मानवी हृदयाचे सनातन स्थायी भाव हेच त्यांचे विषय. शांत आनंद हाच त्यांचा प्रतिपाद्य हेतु. सौंदर्य हेंच त्यांचें ध्येय. म्हणूनच त्यांची मोहिनी कोठेंही व कोणावरही पडते. जीवनाचें समग्र संगीत त्यांत ऐकावयास मिळतें. त्यांत तार व मंद्र सप्तकें दोन्ही अवश्य यावयाचींच. अजाचा विलाप व अग्निवर्णाचा विलास संसाराप्रमाणें काव्यांतही पाहिजेच. या समग्र संगीताचे पडसाद वाचकाच्या चित्तांत घुमविणें हें कालिदास, जयदेव, शेक्स्पिअर यांसारख्या वागीश्वरांसच साधतें. बदसूर कोणीही नवशिका सहज छेडील.

१. अलीकडील ( १९४४ सालच्या ) नाट्यमहोत्सवांत जुन्या कलेचा हा नमुना ऐतिहासिक कारणांसाठीं दाखविला गेला.

आणि दुर्दैव हें, कीं जीवनांतल्या अन्यायांचा–बदसूरांचा–उपयोग करितांना त्यांना असें वाटतें, कीं आपलीच कला काय ती श्रेष्ठ. जणूं काय कलेचें निधान आतांपर्यंत कोणास सांपडलें नव्हतें व तें यांच्याच हातीं आलें! वास्तविक आपण कलेची उणीव इतर साधनांनीं भरून काढितों याची जाणीव त्यांस पाहिजे. माणसाला आधींच आपद्ग्रस्ताविषयीं सहानुभूति वाटते; मग तो भांडवलशाहीनें चिरडला जाणारा मजूर असो, अगर निश्वास टाकणारी प्रौढ कुमारिका असो. त्यांत अगदीं गरमागरम ताजे विचार व लोकविलक्षण रीति असली म्हणजे वाचकांचें चित्त हटकून आकर्षिलें जाणार. नवे प्रयोग करावयाचा–नवे विचार प्रवर्तिण्याचा–नव्या पिढीचा जन्मसिद्ध हक्क आहेच. माझें म्हणणें एवढेंच, कीं हें कार्य करितांना खऱ्या कलाकृतींची उपेक्षा होऊं नये. विशेषतः असूयेची सूक्ष्म छटा सुद्धां दिसूं नये. आपल्या ध्येयवादी कलेच्या मर्यादा जाणाव्यात. आपली खरी पात्रता ओळखावी. हें आत्मज्ञान झालें तरच "पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि काव्यं नवमित्यवद्यम्" असे उदार उद्गार निघतील. हे उद्गार काढणारा कालिदास त्यावेळीं नवमतवादी होता ह्याची आठवण करून दिली पाहिजे.

वाङ्मयांतील या नव्या प्रवृत्तीचें गमक म्हणून वामनराव जोशी यांच्या 'इंदु काळे व सरला भोळे' या कादंबरीवरील टीका पहा. इतकें उत्कृष्ट पुस्तक गेल्या एकदोन वर्षांत माझ्या वाचनांत आलें नाहीं. सतारीच्या नुसत्या तारांवर मींड व खेंचकाम करून वस्तादास रागाचा समग्र आविर्भाव लीलेनें करून दाखवितां येतो. त्याचप्रमाणें या कादंबरींत थोडकींच पात्रें, ठराविक थोड्याच भावना योजून देखील अगदीं थोड्या मजकुरांत सगळें जीवन वठविलें आहे. गेल्या दहाबारा वर्षांतील राजकीय व बौद्धिक मंथनाचें हें एक रत्न आहे. पण हें नवमतवाद्यांस कसें पटणार? त्यांनीं त्याला 'वांझोटा ध्येयवाद' म्हणून एक चिठ्ठी चिकटविली व झाले मोकळे. नव्या दमाचा शिकंदर सुद्धां जग जिंकावयास बाकी उरलें नाहीं म्हणून रडला असें सांगतात. काय या अश्रूंस वाङ्मयांत स्थान मिळूं नये? आणि जग जिंकून सुद्धां विशेष कांहीं सुख होत नाहीं ही भावना काय पुष्कळांच्या चित्तांत वावरत नाहीं? "प्राप्त सर्व विभवें तरि काय। तोषिले स्वजनही तरि काय। कल्प आयुहि घडे तरि काय। भोगिलें सुख बहू

तरि काय ॥ "[1] हे प्रश्न मानवी जीवनांत नेहमींच उपस्थित होतात. आणि विनायकराव भोळयांचा वृत्तान्त वाचून "ध्येय देव समजा – तरि काय ?" असा प्रश्न वामनराव जोशी स्वतःलाच विचारीत आहेत कीं काय असा भास होतो. ह्या कादंबरींतील पात्रांच्या हालचाली, मनोवृत्ति व त्यांचे शेवट पाहिले म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें भर्तृहरीच्या मार्मिक व उदासीन उपहासाची आठवण होते. त्याच्या दुसऱ्या एका प्रख्यात प्रश्नाचा प्रतिध्वनीही ऐकूं येतो. "नदीतटाकीं तप आचरावें । कीं सद्वधूभोगभरीं भरावें । कीं काव्यशास्त्रामृतसार पीजे । आयुष्य थोडें बहु काय कीजे ? ।"[1] व हें सर्व करण्याची धडपड केली तरी सारेंच असार असें कां वाटतें ? असले सवाल मनांत सरळ खडे करणारी आणि देहबुद्धींचे धोके व संसाराचे उद्वेग बिंबविणारी कला जीवनाचा साक्षात्कार करून देत नाहीं काय ? तेथें सुद्धां व्यावहारिक ध्येयवाद पाहिजे असला आंबटशोकी आग्रह काय कामाचा ?

काव्याच्या आनंदांत सुद्धां यांना हा ध्येयाच्या मिठाचा खडा पाहिजे. "नक्षत्रांचीं फुलाफळांचीं । कृष्णसख्याच्या व्यभिचारांचीं । आणिक झुरल्या युव-युवतींचीं । खूप जाहलीं हीं रडगाणीं ।" हा उद्वेग काणेकरांना शोभेल. स्वतः त्याच प्रकारचीं गाणीं गाऊन कधींतरी त्यांना कंटाळयाची लहर येणें साहजिक आहे. पण असला बंदीचा वटहुकूम काढण्यास ते देखील तयार होणार नाहींत अशी माझी खात्री आहे. आणि हीं रडगाणीं कां वाटतात याचा आपण विचार केला आहे काय ? शहरांतल्या सूर्यवंशी कवींनीं अरुणावर कवनें रचण्याचा सपाटा चालविला तर कोणाला वीट येणार नाहीं ? चाळींत राहून ज्यांना रात्रीच्या आकाशाचें दर्शन सुद्धां घडत नाहीं त्यांना ताऱ्यांचें काव्य काय कळणार ? आणि कृष्णसख्याचें प्रेम नुसती बांसरी अगर मुरली वाजवीत फिरलें म्हणून अंगीं मुरत नाहीं. अरुणाचें खरें दर्शन उषेच्या सूक्तांत होईल. कृष्णसख्याचें प्रेम हवें – नुसता व्यभिचार नव्हे – तर नरसी मेहेता, 'दयाप्रीतम', सूरदास, किंवा आपला वामन तें गाऊन दाखवील. आधुनिक कवींच्या राधा-कृष्णकाव्यांपेक्षां मला अजून एकनाथाचें "वाऱ्यानें कुंडल

१. भर्तृहरि ( वामनाचें भाषांतर, वैराग्यशतक ८७, ६५ ).

...र वाचनालय, सातारा



हाले । डोळे मोडित राधा चाले ।" हेंच पद गुणगुणावेंसें वाटतें. अंतस्तुषार कुंदापासून तों शशांकलेखेला अनुसरणाऱ्या विशाखांपर्यंत सृष्टीचें बारकाईनें निरीक्षण करणारा कालिदासच तिच्या काव्याचा खरा अधिकारी. असलीं जातिवंत काव्यें कोणी गाईल तर आजही तीं आम्हांस हवींत. पण आपणांस तीं गातां येत नाहींत म्हणून त्यांस नांवें ठेवूं नका; व कलेला नसते निर्बंध घालूं नका एवढीच माझी विनंति आहे.

यावर काय उत्तर येईल तें मला ठाऊक आहे. "अहो! आपण फारच मागासलेले दिसतां. हीं जुनीं बाबावाक्यें नकोत. हा जुनाट जरीपुराणा माल आतां बाजारांत मांडणें शोभणार नाहीं. रूसदेशाचें तुम्हीं नांवही ऐकिलेलें दिसत नाहीं. झोपीं गेलेले तुम्ही नुकतेच जागे झालेले दिसतां. जरा डोळे उघडून सभोंवतालचें जग पहा." मी त्या जगाविषयीं-त्या नव्या सृष्टीविषयीं-उदासीन नाहीं. रशियांत जो राजकीय प्रयोग चालू आहे त्याच्याबद्दल मला कांहींएक विधान या लेखांत करावयाचें नाहीं. तें सर्वथैव अप्रस्तुत होईल. पण स्वर्गाचें राज्य प्रस्थापित करूं पाहणाऱ्या या नव्या पवित्र शास्त्राच्या प्रेषितांनीं वाङ्मयांत काय काय प्रयोग केले, व शेवटीं अगदीं थोडक्याच अवधीच्या अनुभवानें ते कसे शहाणे झाले हें समजून घेणें खात्रीनें मनोरंजक व बोधप्रद होईल.

रशियन राज्यक्रांतीच्या पूर्वीं जुन्या पिढीच्या प्रतीकात्मक ( Symbolical ) आणि वास्तववादी ( Realistic ) वाङ्मयाचा बराच पगडा होता. प्रतीकात्मक वाङ्मयांत रीतीकडे जास्त लक्ष पुरविलें जात असे; आणि असामान्य व विलक्षण अनुभव चितारिले जात असत. डॉस्टॉव्हेस्की, टॉलस्टॉय, यांजसारख्या सत्य-सृष्टीच्या निर्मात्यांचा वारसाही मागें राहिला होताच. त्या काळच्या वाङ्मयांत या दोन प्रवृत्तींचें मिश्रण आढळतें. या प्रवृत्तींविरुद्ध जोरानें पुकार करणाऱ्यां-मध्यें मयकाव्होस्की हा अग्रगण्य होय. आगामी वाङ्मयाच्या या अग्रेसराची सही समाजाच्या अभिरुचीच्या श्रीमुखांत भडकावणाऱ्या १९१२ सालच्या पत्रकावर आहे ("A clap on the Face to Public Taste"). त्याची व त्याच्या पंथाची नवी द्वाही फिरली ती येणेंप्रमाणें[1] —

१. मयकाव्होस्कीचीं दोन-चार निरनिराळीं वचनें यांत मीं संकलित केलीं आहेत.

"यमकें गीतें फुलें आदि हा तुमचा जुना पसारा
थुंका त्यावर; नव्या युगाची नौबत झडते द्वारां.
रस्ते तुमचे खऱ्या कुंचल्या, वर्णफलक हे चौक
क्रांतीचे कीं नगारजी हे म्हणोत सारे लोक."

क्रांतीनंतरच्या सोव्हिअट सरकारला श्रमजीवी जनतेचें (proletariat) नवें वाङ्मय निर्माण करावयाचें होतें. त्यासाठीं कंकण बांधून अध्वर्यू तयार होतेच. प्रोलेटकल्टची स्थापना १९२० सालीं झाली होती. मयकाव्होस्कीनें नवीन दिशा दाखविली. त्याची वाणी दणदणीत असून बहुजनसमाजाच्या क्रांतीला ती वाहिली होती. वाङ्मय समाजहिताकरितां; तत्त्वप्रवृत्तींत काव्याचा खरा उगम; कलाविकास, भावना, गूढगुंजन यांस वाङ्मयांत स्थान मिळूं नये हीं त्याचीं महातत्त्वें. आपल्या लिखाणांत त्यानें त्यांचें आचरण केलें. पण अखेरीस वाङ्मयांतून हद्दपार केलेल्या साऱ्या भावना त्याच्या प्रत्यक्ष जीवनांत उच्छृंखल होऊन त्यानें आत्महत्या केली ! कोमल भावनांनीं सूड घेतला ! असो. इकडे भाकीत केल्याप्रमाणें श्रमजीवी कलेची विलक्षण क्रांति कांहीं केल्या जवळ येईना. एकाच ध्येयाचें तुणतुणें सारखें भोंवतीं वाजत राहिल्यानें सुज्ञ रसिकांचें डोकें पिकलें. १९२२ मध्यें निघालेल्या 'Serapion Brothers' च्या पत्रकांत या एकमार्गी कलेचा मॅक्झीम गॉर्कीसारख्या कसलेल्या लेखकांनीं प्रतिकार केला. "आजचें आमचें वाङ्मय विलक्षण शिष्ट, उद्दाम व कंटाळवाणें झालें आहे. नव्या-जुन्या रीतीचें सक्तीचें वाङ्मय निर्माण करण्यास सरकारची हरकत नाहीं. पण तें सामाजिक आणि आजकालच्या विषयांवरच असलें पाहिजे. आमची एकच मागणी आहे: कलाकृति स्व-तंत्री व जातिवंत असावी व तिला आपल्या स्वतःच्या तंत्रानें चालूं द्यावें." सरकारी धोरण हातांत असलेल्या वरिष्ठांस हें पटलें. श्रमजीवी वर्गाची नवी संस्कृति चुटकीसरशीं निर्माण होणार नाहीं हें त्यांना उमगून आलें. वाङ्मयाचें आधिपत्य केवळ प्रचारपत्रकांनीं मिळत नसतें; तें प्राप्त होण्याकरितां श्रेष्ठ प्रतीची कला साधावी लागते; हें ट्रॉट्स्कीनें आपल्या प्रख्यात 'वाङ्मय व क्रांति' या पुस्तकांत समजावून सांगितलें. तरी पण मयकाव्होस्की वगैरे लोकांचा कट्टर पंथ आपला ध्येयवाद सोडण्यास तयार नव्हता. पण या जहाल (LEF) व जागरूक

नगर वाचनालय, सातारा.



( On Guard ) पंथाची सत्ता तात्पुरती तरी कमी झाली. १९२५ सालचा ठराव पास झाला. या ठरावांत अशी स्पष्ट कानउघाडणी आहे, कीं आधीं उत्कृष्ट कला निर्माण करा व मग सत्ता आपोआप प्राप्त होईल. ट्रॉट्स्की व गॉर्की यांचेंच शहाणपण विजयी झालें. समतावादी तत्त्वज्ञानाविरुद्ध मात्र कोणास प्रचार करूं द्यावयाचा नाहीं. बाकी त्या तत्त्वांच्या पुरस्कारासच वाङ्मय वाहिलें पाहिजे असा आग्रह नाहीं. सर्व तऱ्हेच्या कलेचा संग्रह केला पाहिजे. असा 'शांतिरस्तु पुष्टिरस्तु'चा शांतिपाठ या ठरावांत गायिला गेला. याच सुमारास नवीन आर्थिक धोरण ( NEP ) अस्तित्वांत येत होतें. १९२२ ते १९२८ या सालांत रशियन वाङ्मयांतील उत्कृष्ट पुस्तकें निर्माण झालीं. कारण बंदी उठली होती व कलेचा मक्ता एकाच वर्गास दिला नव्हता. समतावाद्यांच्या तांड्यांत मिसळल्याशिवाय त्याच वाटेनें जाणारे वाटसरू ( Poputchiki = Fellow-Travellers ) सेरापिअनभाई यांच्या लिखाणास ऊर्जितावस्था आली. पॅस्टर नॅकसारखा कवि व बाबेलसारखा गद्यलेखक यांच्या लिखाणांत व्यक्तीच्या चिंतनाचें व काव्यमय शैलीचें फिरून पुनरुज्जीवन झालें. पण दुर्दैवानें 'पंचवार्षिक योजने' बरोबर १९२८ सालांत पुनः एकदां ध्येयवादानें उचल खाल्ली. हीच योजना व या योजनेंतील अंतर्गत असलेला श्रमजीवी व पांढरपेशे यांचा लढा याशिवाय वाङ्मयास दुसरा हेतु असूंच नये असें धोरण पुनः अमलांत आलें. लेखकांस ठराविक कामें ठराविक मुदतींत पार पाडण्याची आह्वानें देण्यांत येऊं लागलीं. रॅप् ( Russian Association of Proletarian Writers ) या संस्थेची व तिचा अधिपति ॲव्हरबाख यांची अस्मानी सुलतानी जीं फर्मानें काढील त्याच दिशेनें वाङ्मयाची पैदास होऊं लागली. पण सांगकाम्यांच्या पलटणीकडून कसलें वाङ्मय निर्माण होणार ? सोव्हिअट वाङ्मयाचा सत्यानाश व्हावयाची जवळ जवळ वेळ आली. तेव्हां मॅक्झिम गॉर्कींनीं फिरून मध्यें पडून उपदेशाचे चार शब्द सांगितले. सर्वाधिकारी स्टालिनला ते पटले. रॅप् ही संस्था निकालांत काढिली. ॲव्हरबाखला हद्दपार करण्यांत आलें व ज्यांची सोव्हिअट तत्त्वांना सहानुभूति होती त्या सर्वांचें एक मंडळ स्थापिलें गेलें. स्लोनिमच्या मताप्रमाणें हें नवें धोरण १९२५ सालच्या तडजोडीच्या स्वरूपाचें नसून जातिवंत क्रांतीच्या

स्वरूपाचें आहे. १९३२ सालचा हा ठराव केवळ स्टालिनची धरसोडीची कारवाई आहे असें म्हणवत नाहीं.[1] सारांश, रशियांतल्या प्रयोगानें वाङ्मयाच्या वाढीसाठीं केवळ ध्येयवाद अगर नवमतवाद पुरत नाहीं, तर उदारमतवाद पाहिजे हेंच शिकविलें. हेंच जरा अलंकारिक भाषेंत सांगावयाचें म्हणजे, कला ही जीवनाच्या पंचप्राणांची पांचाली आहे; आधीं तिला अज्ञातवासांत पाठवा व मगच तिला सैरंध्रीवेश शोभेल,–हा जुनाच अनुभव पुनः आला.

नव्या रशियन वाङ्मयाच्या या वृत्तान्ताची वार्ता इकडे अजून आलेली दिसत नाहीं.[2] आमचा हा शिरस्ताच आहे, कीं विलायती चीज तिकडे टाकाऊ झाली म्हणजे मग आम्हीं तिचा स्वीकार मोठ्या आदरानें करावयाचा. वर्डस्वर्थ-शेले यांचा पंथ ४०-५० वर्षांनंतर आमच्याकडे सुरू झाला. १८८० सालीं लिहिलेल्या इब्सेनच्या ‘ घरकुला ’ची आम्हांस नुकती कोठें आठवण होत आहे. रशियन ध्येयवादाची तीच गत होणार हें उघड दिसतें. डोळ्यांपुढें प्रत्यक्ष क्रांति झाल्यामुळें तिचा आवेश रशियन लेखकांत संचरणें साहजिक आहे. व्यक्ति व समाज यांचा झगडा त्यांनीं रंगविला तर तो त्यांना शोभेल. पण त्यांच्या नाचणीं नाचणाऱ्यांना माझा आपला एक साधा सरळ सवाल आहे, कीं “देवाला स्मरून ( चुकलों, मार्क्स-लेनिनला स्मरून ) सांगा, तुमच्या कामगार-शेतकरी वर्गांविषयींच्या भावना जातिवंत आहेत काय ? त्यांचें जीवन तुम्ही समजावून घेतलें आहे काय ? त्यांच्या भाषेंत तुम्हीं बोलतां काय ? ” मी जरा स्पष्ट बोलतों. ध्येयवादी वाङ्मयाचे संस्थापक म्हणून उजळ माथ्यानें वावरण्यास चौपाटीवर उघड्या माथ्यानें फिरणें एवढीच तयारी पुरे आहे काय ? राजकारण व वाङ्मय यांत नुसती बोलाचीच कढी व बोलाचाच भात असा प्रकार दिसतो. तुमचें अनियामित जग, तुमचें विश्व, पांढरपेशा निरुद्योगी वर्गाचेंच आहे ना ? भगवान् सहस्ररश्मि अस्तास जात असतां दौडत येणारा घोडेस्वार आतां दिसत

१. या परिच्छेदांतील माहिती ‘Soviet Literature: an Anthology’ या पुस्तकांतील मूळ उताऱ्यांवरून व प्रास्ताविक निबंधावरून घेतली आहे.

२. मॅक्स इस्टमनच्या ‘Artists in Uniform’ या पुस्तकाच्या आधारें प्रसिद्ध झालेला “ आजच्या रशियांतील साहित्याची व साहित्यिकांची स्थिति ” हा श्री. प्रभाकर पाध्ये यांचा ‘ प्रतिभे ’तील लेख या विधानास एकच अपवाद दिसतो.

नाहीं. पण त्याऐवजीं भगवान् कामदेवाचे उपासक तो व ती बहुधा – कोठल्यातरी कॉलेजांतील विश्वांत – दिसतात. निरुद्योगी पांढरपेशांच्या फुरसदीची कटकट चुकविण्यासाठीं निर्माण झालेल्या वाङ्मयांत ध्येयाचा निजबोध बळेंच कोंबून काय फायदा ? अशानें का दोन ध्रुव एकत्र येणार ? किंवा आर्थिक उद्धाराचा ध्रुवतारा दाखवितां येणार ? शेतकरी व मजूर यांच्या जीवनाशीं समरस झालेले कोण कोण लेखक आहेत ? त्यांचीं सुख-दुःखें आशा-निराशा चितारणारें कोणतें पुस्तक निर्माण झालें आहे ? तुकारामबोवा आज हयात असते तर "मोलें घातलें रडाया" या शब्दांनींच त्यांनीं उपहास केला असता. त्या संतकवींनीं आमच्यापेक्षां जास्त मार्मिक शहाणपणा दाखविला. त्यांचीं ध्येयें कांहींही असोत; त्यांची प्रचाराची पद्धत अगदीं आधुनिक होती. बहुजनसमाजांत नांदणाऱ्या धार्मिक भावनांचा त्यांनीं शक्य तोंवर त्यांच्याच शब्दांनीं घोष केला. रशियांतला Populist पंथ, तुर्कस्तानांतला केमाल 'आतातुर्का' चा प्रयत्न हेंच शिकवितो. याच्या उलट आमच्याकडे परिस्थिति आहे. गिरीशांनीं 'भलरी' हें गीत गातांच शेतकऱ्यांचा आवेश अंगांत संचरण्याऐवजीं आमच्या पांढरपेशा श्रोतृवृंदास हसूं येतें ! नाटकांतही त्यांची भाषा याच हेतूनें योजतात ! कला बहुजनसमाजासाठीं आहे, हें मुख्य तत्त्व अजून आमच्या गळीं उतरावयाचें आहे; पचनीं पडणें दूरच. लोकवाङ्मयाचें युग अजून यावयाचें आहे, सासूबाईच्या सुनेवरील प्रेमाचा पोकळ, दांभिक व लटिका आव घालून तें जवळ आणितां येणार नाहीं. या बाबतींत मी एवढेंच म्हणेन कीं, "दरिद्रनारायणाच्या सुदामदेवा ! सोडा आपली पोह्यांची पुरचुंडी. ते बुरसलेले असले तरी आम्हांस प्रिय आहेत. पण ते घरीं स्वतः कांडलेले पाहिजेत. परदेशी नकोत."

आर्थिक विषमता व आर्थिक स्वातंत्र्य या ध्येयांच्या कृत्रिमतेविषयीं जी शंका येते ती कामस्वातंत्र्यवादी लिखाणाविषयीं तर जास्तच बळावते. हा विषय जरासा नाजूक आहे; व या लांबलेल्या भाषणांत मी त्याची अधिक विस्तारानें चर्चा करणार नाहीं. केवळ कांहीं स्फुट विचारच मांडणार आहें. या वाङ्मयाची पैदास झपाट्यानें होत आहे. आज कोणी बंधनांच्या पलीकडे गेला, तर उद्यां दुसऱ्यानें सीमोल्लंघन केलें. ज्या कुमारिकांचे कौमार्याचे बंध तुटले नाहींत त्यांचा इतका कोंडमारा होत आहे, कीं त्या सारखे उच्छ्वास

टाकीत आहेत. आणि हे उच्छ्वास-निश्वास इतके जोरानें चालू आहेत, कीं जणूं काय सरस्वती शेवटच्याच धांपा टाकीत असावी. कर्तृत्वाची धडाडी नसलेल्या निष्क्रिय पांढरपेशा हॅम्लेट-ऑफेलियांच्या या मनोविश्लेषणांत कसलें ध्येय सांठविलें आहे बरें ? हीं तरुण वेर्टरचीं जुनींच दुःखें नव्या रूपानें अवतरलीं आहेत, हें कालच्या 'पेरीन-चमन'[1] प्रकरणानें चांगलेंच निदर्शनास आणिलें. आणि असल्या प्रणयासाठीं आपल्या वाङ्मयांत डी. एच्. लॉरेन्सची प्राणप्रतिष्ठा करण्याचें औचित्य तरी काय ? कोठें Lady Chatterley ची आणि तिच्या आशक बागवानाची मर्दानी कामाची धुंदी आणि कोठें रिकाम्या शृंगारचेष्टा ? लॉरेन्सच्या लिखाणांत केवळ लोलंगता नाहीं. त्याच्या वाङ्मयांत पराशर-मत्स्यगंधेच्या, विश्वामित्र-मेनकेच्या अनिवार पुराण कामस्फूर्तीचें काव्य आहे. म्हणून त्याला बुद्धिप्रधान पाश्चात्य संस्कृतीवर कंबरेखालीं आघात करणारें अधर्मयुद्ध शोभलें. त्याचें लिखाण म्हणजे भावना उचंबळून आणणारी चंद्रिका. आम्हांस तीही हवी व संसाराचें नीरस रहस्य दाखविणारी बुद्धि देणारा सविताही हवा ![2] सूर्य-चंद्राची भेट करूं पाहणाऱ्यांच्या वांट्यास शेवटीं अमावास्येचा काळोख यावयाचा ! नवी पिढी कामास लोधली आहे म्हणून शुचिर्भूतांनीं तिचा तिरस्कार हवा तर करावा. पण कामाचें साम्राज्य अबाधितच राहणार. या मदनदेवाचे उन्मादी दूत पाहिजेत तर ते विलायतेहून आणावयास नकोत. लॉरेन्स व जयदेव या बाबतींत सारखेच; किंबहुना जयदेवाची माधुरी लॉरेन्सच्या लिखाणांत नाहीं. उघड स्पष्ट बोलण्याचाच अट्टाहास असेल तर लावणीची रांगडी वाणी आहेच. कामविषयक वाङ्मयाला त्रिवर्गांतील कामाचें ध्येय असावें. तो खरा काम. कॉलेजांतून आतां शाळेमध्यें येऊं पाहणारा 'लैंगिक' पोरखेळ नको. विकृत मनोविश्लेषणाच्या नांवाखालीं लिंगपूजेची पूजा नको; त्यापेक्षां उघड लिंगपूजा पत्करली. व ती करणाऱ्यांनीं लॉरेन्सच्या धैर्यास व तत्त्वनिष्ठेस जागावें. "पुस्तकाचें चोरून प्रकाशन करून प्रकाशकांनीं फायदा मिळविला व स्वतःला एक कपर्दिकही दिली नाहीं तरी चालेल. पण

१. आत्महत्येच्या.

२. Ivor Broun नें 'I Commit to the Flames' या पुस्तकांत हा विरोध स्पष्ट दाखविला आहे.

पुस्तकावरची बंदी उठविण्याकरितां त्यांतला आक्षेपार्ह भाग मी गाळणार नाहीं व तसलें शुद्ध केलेलें पुस्तक विक्रीस ठेवणार नाहीं. तसें करणें म्हणजे माझें नाक कापून घेणें आहे." ही त्याची प्रतिज्ञा पाळण्यास आमचे लेखक तयार आहेत काय? आमच्याकडे मागणीसारखा पुरवठा करणारे व त्याप्रीत्यर्थ नाक कापून अपशकुन करणारे अर्थकृतच फार!

सारांश, उच्च ललितवाङ्मयांत जातिवंत भावना पाहिजेत; नुसतीं पोकळ ध्येयें नकोत. त्या भावना बहुजन समाजाच्या असाव्यात, एका लहान वर्गाच्या नकोत. व त्यांचा संदेश त्या समाजाच्या भाषेंत सांगितला पाहिजे. कमींतकमी एक लक्ष वाचक मिळतील तरच लिहावें, असें जें गटेनें एके ठिकाणीं म्हटलें आहे त्याचें मर्म हेंच. असलें प्रभावी व सार्वभौम वाङ्मय निर्माण करणाऱ्यांस आजचे वाद केव्हांही शुष्कच वाटणार. त्या युगप्रवर्तक वाङ्मयाचे खरे अधिकारी, जीवन विस्तृत, व्यापक व समृद्ध करणारे शब्दसृष्टीचे ईश्वर, आपल्या वाङ्मयांत अवतरावेत हीच या भाषणाची खरी प्रेरणा.

★

# भारतीय कलेचा पुनर्जन्म*

कलावंत मित्रहो ! तुमच्या या दसरा संमेलनाच्या आनंदसोहळ्यांत भाग घेण्यासाठीं मला तुम्हीं खास निमंत्रण दिलेंत याबद्दल मी तुमचा खरोखर ऋणाईत आहें. तुम्हांस आनंद मुक्तहस्तानें उधळण्याची संवयच आहे. ती तुमच्या खासगी जीवनांत सुद्धां किती अंगवळणीं पडली आहे हें मला आज येथें बोलावून तुम्हीं जाहीर केलेंत. आपल्या आनंदांत मला समभागी करावें या उदार हेतूशिवाय तुमचा मला निमंत्रण देण्यांत दुसरा कोणता हेतु असूं शकेल ? मी कांहीं तुमच्यासारखा कलावंत खास नाहीं. एकेकाळीं पलीकडेच आंग्रेवाडींत असलेल्या आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेंत मला चित्राबद्दल व अक्षराबद्दल शून्य मार्क मिळत असत. आमचे ड्रॉइंग-मास्तर नांवानेंही डोळस होते. पुढें त्यांच्या शिकवणीमुळें अक्षराचे मार्क शंभर टक्के मिळूं लागले. मात्र रेखा-रूपाच्या कलेंत रेखामात्र सुद्धां प्रगति झाली नाहीं. अक्षरवाङ्मयांत थोडी-बहुत प्रगति झाली खरी. असें समजलें जातें, कीं कोणत्या तरी एका कलेचें हृद्गत कळलें म्हणजे इतर कला सहज येतात, पण लेखनकलेचें रहस्य उमजेपर्यंत कदाचित् माझा ग्रंथ आटपेल! अशा कच्चा दिलाच्या व्यक्तीनें तुमच्यासारख्या सच्चा कलावंतांसमोर बोलण्याचें धाडस करावयास नको होतें. या दसऱ्याला सीमोल्लंघन करावयाचें नाहीं; शक्य तोंवर ठाण्यांतच ठाणें मांडून बसावयाचें हा इतरांस आगाऊ जाहीर केलेला निर्धार शेवटपर्यंत पाळला पाहिजे होता. पण तुमचे अध्यक्ष श्री. करमरकर यांच्या प्रेमळ निमंत्रणामुळें मर्यादा ओलांडण्याचा मोह झाला. मोहामागें पश्चात्ताप हा ठेवलेलाच. त्या मधां वर्णन केलेल्या पलीकडच्या शाळेंत दुसऱ्या एका ड्रॉइंग-मास्तरानें मला बांकावर उभें केलें होतें त्या प्रसंगाची आतां येथें उभें राहतांना स्पष्ट आठवण जागृत झाली आहे.

पण आतां बोलावयाला उभें राहिल्यानंतर आणखी यापुढील तरी मर्यादातिक्रमण करावयाचें नाहीं असें मीं ठरविलें आहे. म्हणूनच मी कलेची

---

* 'आर्ट सोसायटी ऑफ इंडिया'च्या दसरा संमेलनप्रसंगीं आनंदभुवन मुंबई येथें दिलेलें व्याख्यान ( 'समीक्षका'च्या ऑक्टोबर, १९४१ च्या अंकांत प्रसिद्ध झालें ).

व्याख्या करण्याच्या किंवा आजच्या कलावंतांच्या कृतींची निंदा-स्तुतीची वर्गवारी लावण्याच्या फंदांत पडणार नाहीं. कलाकमलाची गोडी मधुकरालाच कळते. तें उलगडून पिसडून दाखविण्याचा उद्योग करणाऱ्याच्या हातीं चुरगळलेल्या पाकळ्या व कुस्करलेले परागच यावयाचे. कला, सौंदर्य व प्रेम–हीं सख्यानें समजतात, व्याख्येनें नव्हे. प्रचीती हेंच त्यांचें ज्ञान. आणि ती प्रचीति–कला–कोणती नव्हे हें नेति नेति म्हणून सांगून, कदाचित् लवकर येईल. पण तें प्रवचनाचें काम नव्हे. "यमेवैषा वृणुते तेन लभ्या" हेंच खरें. तेव्हां कोणती कला चांगली, कोणती वाईट, कोणती सुंदर, कोणती विकृत, हें ठरविण्याचा असमंजसपणा मी करणार नाहीं.

सुप्रसिद्ध इंग्रजी शिल्पकार एप्स्टाइन् यानें या बाबतींत एका अमेरिकन न्यायाधीशाची कशी फजिती झाली याची मार्मिक गोष्ट सांगितली आहे. ब्रान्कुशी नांवाच्या मूर्तिकाराची "पक्षी" असें नांव दिलेली एक गूढ कला-कृती अमेरिकेच्या कस्टम खात्यानें अडवून धरली. त्यांच्या मताप्रमाणें ती कलाकृती नसून केवळ धातूची घडविलेली एक चीज होती व तीवर चाळीस टक्के कर त्यांना आकारावयाचा होता. प्रकरण कोर्टापुढें गेलें; व एप्स्टाइनची कोर्टांत खालीलप्रमाणें जबानी झाली:—

सरकारी वकील—तुम्ही याला पक्षी म्हणाल का ?

एप्स्टाइन्—शिल्पकार म्हणत असेल तर माझें समाधान होईल.

न्यायाधीश—जंगलांत तुम्हांला ही चीज दिसली तर पक्षी म्हणून तुम्ही तिची शिकार कराल काय ?

ए.—पक्षी ओळखण्याचा तो कांहीं एकमेव मार्ग नव्हे.

न्या.—ही कलाकृती आहे असें तुम्ही कां म्हणतां ?

ए.—कारण तिच्यामुळें माझी सौंदर्य-पिपासा शांत होते. मला ती सुंदर दिसते.

न्या.—तर मग घासून पुसून चकचकीत केलेला, लयबद्ध वांक दिलेला पितळेचा एकादा दांडासुद्धां कलाकृती होईल ?

ए.—शक्य आहे.

कस्टमचा अधिकारी—तर मग ही कुणाही यांत्रिकाला (Mechanic) करतां आली असती ?

ए.—नाहीं, त्याला ती घासतां पुसतां आली असती. निर्माण करतां आली नसती.

सरते शेवटीं एपस्टाइननें दावा जिंकला !

या एका संवादांत कलेच्या आजच्या सर्व बहुरंगी वादांचें यथार्थ चित्रण झालें आहे. कला वास्तववादी असावी काय ? सौंदर्य म्हणजे काय ? सौंदर्याच्या आत्म्याचा साक्षात्कार कसा होतो ? कला व कौशल्य (Art and craft) यांतील फरक काय ? आधुनिक कलेचें ध्येय काय ?—या सर्व प्रश्नांचा समावेश या संवादांत झाला आहे. शेवटीं जय कलावंताचाच व्हावयाचा. सारांश, आधींच आंधळ्या असलेल्या न्यायदेवतेनें या रूपरंगांच्या वादांचे निर्णय देण्याचें धाडस करूं नये हेंच बरें !

या मूलभूत वादांची चर्चा करण्याचें आज प्रयोजनही नाहीं. मला जरी तुमचे तंत्र-मंत्र अवगत नसले, तरी आज समोर वावरत असलेल्या नाना कलापंथांचीं नांवें घेऊन आचमन करून मला संध्या पुरी करतां आली असती. पण संस्कार-वादी (Impressionist) परासंस्कारवादी (Post-Impressionist) घनाकारी (Cubist) भविष्यी (Futurist) हे व इतर सारे कलापंथ माझ्या मतें एकाच महायानाला मिळतात. तें महायान आनंदाकडे नेतें. त्या महा-यानानें जाणाऱ्या आजच्या भारतवर्षांतील कलाकारांची यात्रा कशी होत आहे हें आपण पाहूं.

हें आपणांस सांगावयास नको कीं कला हा शब्द मीं दृश्य-कला या अर्थी योजिला आहे. आकार-रूप-रंग-रेखा यांचें दृश्य काव्य रचणाऱ्या कलावंतां-विषयींच मला बोलावयाचें आहे. संस्कृतांत कला हा शब्द याच समर्पक अर्थानें योजितात. साहित्य, संगीत व कला यांनीं विहीन असलेल्या माणसाला पुच्छविषाणहीन पशु ही पदवी बहाल करणाऱ्या भर्तृहरीच्या श्लोकांत तो अर्थ आपणांस सांपडेल.

अशा कलाकारांकडून आजचें भारतवर्ष मुख्यत्वें एक अपेक्षा करीत आहे. नव्या राष्ट्रीय संस्कृतीला अनुकूल अशी कला त्यांनीं निर्माण करावी असें सर्वांना

नगर वाचनालय, सातारा.


वाटतें. ही अपेक्षा अवास्तव आहे असें खुद्द कलावंत सुद्धां म्हणत नाहींत, किंबहुना त्यांचीही तीच आकांक्षा दिसते. त्यांचेही याच दिशेनें प्रयत्न चालू आहेत.

आज वाढत्या राष्ट्रीयत्वाची द्योतक अशी कला निर्माण करण्याचें प्रधान साधन म्हणजे जुन्या हिंदी कलेचें पुनरुज्जीवन असें समजलें जातें. पण तें पुनरुज्जीवन सर्वस्वीं यशस्वी होत नसावें याची जाणीव कलावंतांना नसेल असें मी म्हणणार नाहीं. आमचे पाश्चात्य कलाशिक्षक देखील या पुनरुज्जीवनाचे पाठ देत असतात. शुक्रनीतींतले उतारे ठिकठिकाणीं तुम्हांला त्यांच्या ग्रंथांत सांपडतील. पण शुक्राची संजीवनी हस्तगत करून घ्यावयाची असेल तर आधीं उन्मादांत विरून मग त्याच्या पोटांत शिरणें हा एकच उपाय आहे हें आपण जाणतां ना ? अजंठा–वेरूळचें अनुकरण म्हणजे कला नव्हे हें अट्टाहासानें सांगण्याची पाळी तुम्हीं येऊं देणारच नाहीं याची मला पुरी खात्री आहे. अनुकरण म्हणजे कलेचें मरण असें काकासाहेब कालेलकरांनीं अलीकडेच गुजराथी कलाकारांना सांगितलें होतें, तें आपण सहज मान्य कराल. मग तें अनुकरण एका काळाचें असो अगर देशाचें असो. कलेचें सत्य त्रिकालाबाधित आहे हें खरें. पण तें सत्य प्रत्येक कालाला, प्रत्येक युगाला नवनवोन्मषानें दिसतें. आपल्या कालांत साक्षात्कार झाल्याविना त्या सत्याची प्रचीती कलावंत पटवूं शकणार नाहीं. तसा साक्षात्कार झाला नसेल तर ती तुमची कला उसनी वाटेल. तुमच्या कृती कला न राहातां कलेच्या नकला होतील. पाश्चात्यांना, अमेरिकन लोकांना अजब वाटते, ते भाळतात, म्हणून अजंठा–वेरूळ छापाचीं "लेबलें" लावून खरा कलावंत खात्रीनें मोकळा होणार नाहीं. पुढें मार्गी जाणाऱ्या राष्ट्राची मागें वक्री दृष्टी वळली आहे म्हणून तुम्ही तसल्या नकली मालाची पैदास खात्रीनें करणार नाहीं. शिक्षण पाश्चात्य, विचार पाश्चात्य, कारागिरी पाश्चात्य व दिखाव मात्र पौर्वात्य असली सरभेसळ कलेला खपेल का ? अशा कलेला उपमाच द्यावयाची तर मोटार गार्डीत गांधीटोपी अथवा "हॅट" घालून बसलेली किंवा अशाच आधुनिक प्रकारची जी कधीं गणपतीची मूर्ति घडवितात तिचीच शोभेल अशा मूर्तींत जुनी कला कालाबरोबर जातांना दिसेल. पण आपण हें विसरतां कामा नये कीं खरी कला शब्दशः कालाला एका कान्यानें पुढें नेते !

आ. ४।१५
८७३०२

तेव्हां जुन्या कलेवरांना नव्या शृंगारानें नटविणें हें खास पुनरुज्जीवन नव्हे. मग त्याचा बाजारभाव कांहींही असो. माझ्या मतें आम्हांस जुन्या भारतीय कलेचें पुनरुज्जीवन नको, पुनर्जन्म पाहिजे. समजा, अजंठा-वेरूळचा कलाकार आज मुंबईंत अवतरला, पुन्हा जिवंत झाला, तर त्याची मनःस्थिती काय होईल याची चर्चा न केलेलीच बरी ! त्यापेक्षां त्याची आपण एक मूर्ति घडवावी, अगर त्याचें एक यथार्थ चित्र काढावें ही आपणांस रिकाम-पणाची कामगिरी म्हणून मी सुचवितों. त्याचें पुनरुत्थान व्हावें याहून त्याचा पुनर्जन्म व्हावा अशी आपण प्रार्थना करूं. जुन्या संस्कारांचें संचित घेऊन नवा कलाकार जन्मास येवो. मग त्याचें क्रियमाण, त्याची आजची कला, त्याला व राष्ट्राला खचित मुक्ति देईल.

असा कलाकार जर आज निर्माण व्हावयाचा असेल तर त्यानें कोणते संस्कार आत्मसात् करून घेतले पाहिजेत ? त्या जुन्या हिंदी कलेची प्रतिभा कोणती ? याचा आपण थोडासा विचार केला पाहिजे. आमचे पूर्वींचे कलाकार म्हणजे रूपलोकांत वास करणारे योगी होते. जसा एकादा गवई नादब्रह्मांत, किंवा कवी शब्द-ब्रह्मांत अखंड ध्यानानें विलीन होतो तद्वत् ते बाह्य मायेपलीकडील रूप-ब्रह्मांत विलीन होत असत असा त्यांचा लौकिक आहे. आकाररूपांतील जो " ध्येय " भाग आहे त्याचें ते चिंतन करीत असत. म्हणूनच जुन्या हिंदी कलेला ध्येयवादी म्हणतात. ती नुसती छबी पाडणारी वास्तववादी कला नव्हती. आमच्या चित्रकारांना मानसपूजा करण्याची दीक्षा दिली होती. इष्ट-देवतेचें मानस-ध्यान करणें हीच खरी मानसपूजा. शुद्ध सौंदर्याचा हा त्यांचा शोध कधींच पुरा होणार नव्हता. पार्थिव सौंदर्याचा आत्मा हुडकतां हुडकतां शेवटीं त्यांनीं संगीताची अशरीरिणी माया सुद्धां आकार-रूपाला आणिली. राग-रागिणींची चित्रें काढण्यांत ध्येयवादी कला-कल्पनेची परमावधि झाली असें मी समजतों.

विश्व हेंच त्यांचें " ध्येय " असल्यामुळें सभोवतालच्या सृष्टीशीं तन्मय होणें हा त्यांचा दुसरा प्रधान संस्कार. आमचीं जुनीं कलामंदिरें—म्हणजे बुद्ध-विहार आणि देवळें—अशा ठिकाणीं स्थापिलीं आहेत कीं आंतलें मानव-निर्मित सौंदर्य बघून मुग्ध होतां होतांच बाहेरील सृष्टिसौंदर्यानें तल्लीन करून टाकावें.

अजंठ्याच्या गुंफांतील चित्रांपेक्षां भोवतालच्या निसर्गाचें चित्र अधिक मनोहारि आहे. त्या विहाराच्या पायथ्याशीं उभें राहिलें असतां समोर जें गिरि-शिखर दिसतें, तेथें जाऊन पायानें खालीं नदींत उतरून बघा. तेथें जाण्यास आधीं कांहीं मैलांचा मोटारचा प्रवास करावा लागतो. पण मग खालीं उतरतांना जल-प्रपाताचें जें अद्भुत दर्शन होतें तें विहारांतील भिंतीवरील चित्रांपेक्षां वारंवार माझ्या मनश्चक्षूंपुढें येतें. मानव-निर्मित व नैसर्गिक सौंदर्य यांचें हें साहचर्य जें सर्व ठिकाणीं आमच्या कलेंत दिसतें तें केवळ काकतालीय न्यायानें घडून आलें नसेल. निसर्ग हा आमच्या कलेचा बहिश्चर प्राण आहे.

कारण चराचराशीं समरस होणें हीच आमची "शिवा"ची कल्पना होती. त्या शिवाचा साक्षात्कार इंद्रियांच्या द्वारें होतो हें कलेनें सिद्ध करून दिलें. धर्म आणि काम यांचें अद्वैत आमच्याकडे कलेनें करून दाखविलें. आमच्या संस्कृतींत कला ही कामांत जमा होते. वात्स्यायनाच्या कामसूत्रांतील चौसष्ट कलांच्या यादीच्या शेवटीं त्यांना कामसूत्राचे अवयव असें विशेषण लावलें आहे. ख्रिस्ती वातावरणांत वाढलेल्या पाश्चात्यांना ती कला कामोद्दीपक (Erotic) वाटते. नुकत्याच दिवंगत झालेल्या Roger Fry या इंग्रजी कलाकाराला व टीकाकाराला हिंदु कला अशी कामोद्दीपक वाटली. आमच्याकडे सुद्धां कामाचें जीवनांत स्थान न जाणणारा हठयोगी पंथ रूढ होऊं पाहात आहे. पण हिंदु संस्कृतींत काम हा त्रि-वर्गांतला एक होता. कलेचा अर्थाशीं अर्थाअर्थी कांहीं संबंध नसतो. म्हणून उरलेला पुरुषार्थ जो धर्म त्याच्याशीं तिची सांगड घालून दिली गेली. मी म्हणेन कीं आमची कला कामुक होती, कामोद्दीपक नव्हती; कामरूपी होती, कामोपासक नव्हती. शृंगारशतक रचणारा भर्तृहरि काम-फलाचा अधिकारी होता, कामाला लालचावलेला नव्हता. धर्म आणि काम यांचें साध्य एकच. कलावंत आणि अद्वैती हे दोघे सारखेच मुक्त होतात. कलेची व धर्माची परमावधि एकच; आणि म्हणूनच कलानंदाला ब्रह्मानंदाचा सहोदर म्हणतात. कारण त्यांचा उगम एकच असतो. मात्र माझ्या मतें कलावंताची मुक्ति अधिक आनंददायी असावी. कारण इंद्रियें, बुद्धि आणि मन या तिघांचे व्यापार कलेंत स्थिरावतात. आमच्या पूर्वजांनीं

कलेला धर्माशीं एकजीव करून टाकली. शिवाकडून उद्दीपक काम जाळून शुद्ध कामाचा शिवाशीं संयोग केला. कला म्हणजे काय ? या टॉलस्टॉयच्या प्रख्यात प्रश्नाचें त्यांनीं असें उत्तर देऊन ठेविलें होतें.

चराचरांतील सौंदर्याचें ध्यान करून त्याचें रहस्य समजून सांगतांना पार्थिव साधनें पुरीं पडेनात म्हणून शेवटीं हिंदी चित्रकारांना संकेत कल्पावे लागले. त्या संकेतांच्या, चिह्नांच्या (Symbols) पोटीं कल्पनेचें अखिल विश्व त्यांनीं सांठविलें. अगम्याची सिद्धी त्यांच्यामार्फत करून घेतली.

जर हिंदी कलेचा आज पुनर्जन्म व्हावयाचा असेल तर तिनें हे सारे संस्कार आत्मसात् केले पाहिजेत. ध्येयवाद हा आजच्या पाश्चात्य कलावंतांनीं आपलासा करून घेतलेला दिसतो. याचीं मी आपणांस दोनच सूचक उदाहरणें देतों. अर्थात् तीं मजपेक्षां आपल्या अधिक ओळखीचीं असतील. मानवी देहावर घातलेल्या अवगुंठनाच्या पलीकडे जाऊन त्याचें शुद्ध सौंदर्य समजून घेण्यासाठीं Rodin हा प्रख्यात फ्रेंच शिल्पकार नग्न स्त्रीपुरुषांस आपल्या शिल्पशाळेंत नित्याच्या शारीरिक हालचाली करावयास लावी. व मग ह्या परिचयानें सौंदर्याची ओळख पटली कीं तो कधींतरी मूर्ति घडवी. Balzac या ग्रंथकाराचा पुतळा करण्याकरितां, त्याचे ग्रंथ त्यानें पठण केले; त्याच्या गांवीं जाऊन राहिला; त्याच्या शिंप्याकडून त्याच्या नाना कपड्यांचीं मापें जमा केलीं; सारांश Balzac च्या कायेंत त्याच्या मनानें प्रवेश केला; आणि मग त्यानें त्याची मूर्ति घडविली. Balzac चा आत्मा त्यानें आकार-रूपाला आणला. लोकांना त्याचें पार्थिव कलेवर हवें होतें. म्हणून ज्यांनीं तो पुतळा करावयास सांगितला होता त्यांनीं तो घेण्याचें नाकारलें! ध्येयवादी कलेचा दुसरा मासला म्हणून फ्रेंच चित्रकार Cezanne याचें उदाहरण घेतां येईल. तोच तोच देखावा (Landscape) तो वर्षानुवर्षें पाहून मग कधींतरी चित्र काढण्यास बसत असे. म्हणूनच त्यानें काढलेल्या वृक्ष–वल्ली आम्हांला सोयरीं-सहचरें वाटतात, आमच्याशीं संवाद करतात. ब्रान्कुशीच्या पक्ष्याची गोष्ट मीं आरंभींच सांगितली. जुन्या हिंदी चित्रकारांनीं काढलेल्या पशु-पक्ष्यांविषयीं आनंदकुमारस्वामीनें जें म्हटलें होतें तसलेंच उत्तर एपस्टाइननें त्या अमेरिकन

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



न्यायाधीशाला दिलें. एकंदरींत आधुनिक पाश्चात्य कलावंतांनीं ही हिंदी सिद्धी साध्य करून घेतलेली दिसते.

हिंदी कलेचा पुनर्जन्म व्हावयाचा असेल तर आधीं ही सिद्धी मिळविली पाहिजे. मग इतर संस्कार. ते संस्कार देखील मिळविणें कलावंतांना दिवसेंदिवस दुरापास्त होत चाललें आहे. आपण त्यांतील एकच संस्कार उदाहरणादाखल घेऊं. संकेतांचीच गोष्ट घ्या ना ? संकेतांची परंपरा जर कायम राखावयाची असेल तर आपल्या संस्कृतीचें सारें काव्य समजून घ्यावयास नको काय ? त्याचें शिक्षण कुठें मिळेल ? घरांत तें पूर्वी मिळत असे. पण पोथ्या पुराणें आतां घरीं कोण वाचतो ? तुमच्या आर्ट स्कुलांत जुन्या पौराणिक काव्याचें मर्म समजून सांगणारा एकादा शिक्षक ठेवलात तर ? मग तो तुम्हांला कितीतरी सांकेतिक कला-विषय सांगेल. आज अनेक उदात्त मनांना मानवाच्या रानटीपणामुळें आपलें सारें सांस्कृतिक जीवितकार्य व्यर्थ गेलें अशी जी निराशा वाटते त्या भावनेचें मूर्त रूप घडवावयाचें असेल तर आपलें सारें जीवितकार्य विफल झालेलें पाहून शांत चित्तानें, समाधानानें हरिणासन घालून बसलेल्या व व्याधाचा बाण लागून प्राण जाणाऱ्या भगवान् श्रीकृष्णाची मूर्ती घडवा असा मोह तो उत्पन्न करील. भांडवलशाही समतेचें नवीन तत्त्वज्ञान चिरडून टाकण्याचा वृथा प्रयत्न करीत आहे हें दाखविण्यासाठीं आंधळा धृतराष्ट्र सारें बळ खर्चून भीमाची लोहमूर्ति कवेंत धरून कशी मोडण्याचा प्रयत्न करीत आहे हें शिल्पांत दाखविण्याची कल्पना देईल. जुन्या संकेतांचा असा नवा उपयोग करून घेतला तरच त्यांचा पुनर्जन्म होईल. नुसतें सढळ हातानें कलेंत जुने संकेत ठेऊन देण्यानें कार्यभाग होणार नाहीं.

---

१. "It is certain that we find very good and vital drawings of animals in the quite purely Hindu art of Tanjore; and also that whereas in Persian painting wild animals are regarded as creatures to be hunted rather than understood, in Indian work their own specific and even individual character is delineated as affectionately as in the case of portraits of human beings." Indian Drawings, by Anand Coomaraswamy, First series, p. 8.

या दिशेनें तुमच्याशीं कितीतरी सहविचार करावयाचा होता. पण माझी कर्कश बडबड केव्हां संपेल व ज्योत्स्नाबाईंचें गाणें केव्हां ऐकावयाला मिळेल याची आपण वाट पाहात असणार. तेव्हां मी आटपतें घेतों. पण माझें भाषण संपविण्यापूर्वी आपल्या संस्थेचें कौतुक केल्यावाचून मला आपला उतराई होतां येणार नाहीं. आपली संस्था वाडींतून बागेंत व आतां आनंद-भुवनांत आली असें आपले अध्यक्ष श्री. करमरकर यांनीं सांगितलें. सृष्टीमार्फत कलावंतानें आनंदाकडे जाणें ही आमची जुनी परंपरा तुम्हीं कायम ठेविलीत याबद्दल तुमचें अभिनंदन केलें पाहिजे. आतां तुम्ही जेव्हां तुमची स्वतःची इमारत बांधाल तेव्हां तिला " आनंदवनभुवन " हें यथार्थ नांव द्या.

मुंबईच्या आर्ट स्कूलच्या हिंदीकरणाविषयीं तुमच्या अध्यक्षांनीं कळकळीचे उद्गार काढले. तुम्हांस बराच विषाद होत असावा असें वाटतें. मी एवढेंच म्हणेन कीं सरकारी मान्यतेची कलावंतांनीं वाट कां पाहावी ? " अर्थकृते " ज्यांची कला असेल त्यांचा तो प्रश्न आहे. सरकारापाशीं पैशाची टांकसाळ आहे. सौंदर्याची नव्हे. पैशावर शिक्का कोणता असावा हें सरकार ठरवील. कलेवर शिक्का कोणता असावा हें ठरविणार कलावंत. " राजा करी तेचि दाम। तेही चाम चालती।" ही तुकोबाची वाणी सत्य खरी. पण मी त्याच धोरणानें म्हणेन, "तुम्ही कराल ती कला। तेचि सकळां मानेल।"

★

# वाङ्मय आणि टीका *

तुमच्या स्नेहसंमेलनाचा आज आनंदाचा दिवस आहे. या प्रसंगीं संग्रहालयाच्या कार्याची मीं जर विशेष स्तुति केली तर निमंत्रित पाहुण्यानें यजमानाचे उतराई होण्यासाठीं औपचारिक कृतज्ञता दाखविली अशी मजवर टीका होण्याचा संभव आहे. पण तुमच्या कृतीचें यथार्थ ज्ञान मुंबईतील मराठी भाषेच्या सर्व अभिमान्यांना केव्हांच होऊन चुकलें आहे. तुमचें कार्य किती आवश्यक आहे हें तुमच्या वाढत्या व्यापानेंच स्पष्ट शाबीत होतें. दादरास तुमची शाखा पसरली. कबरस्थानापाशीं मूळचीं पाळेंमुळें असलीं तरी या तुम्ही लावलेल्या व वाढविलेल्या वृक्षाची सावली जनस्थानावर नांदते व आतां ती पसरत चालली आहे. वास्तविक बहुगुणी ग्रंथ, नाना विषयांवरील पुस्तकें प्रत्येक नागरिकाला उपलब्ध करून देणें हें खरोखर नगरसंस्थेचें काम होय. लंडनसारख्या विस्तीर्ण शहरांत तेथील नगरसंस्था एक मध्यवर्ति संग्रहालय ठेवून व वॉर्डागणिक त्याच्या शाखा वाढवून तें कार्य करीत असते. मुंबईच्या म्युनिसिपालिटीनें हें कार्य अंगिकारावें अशी नागरिकांची अर्थात् अपेक्षा असणारच. यंदाच्या बजेटांत या कार्यासाठीं पैशाची कांहीं तरतूद झाली आहे असें कळतें. तें केव्हां पुरें होईल तें होवो. दरम्यान तुमची शाखा मुंबईच्या प्रत्येक भागावर पसरो; व तुमच्या या अव्यय अश्वत्थाविषयीं आम्हांस असें म्हणण्याचें भाग्य लाभो कीं—

अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखाः<br>
गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः<br>
अधश्च मूलान्यनुसंततानि.

स्नेहसंमेलनांतील भाषणाचा विषय वाद उकरून काढणारा असूं नये असें मला वाटलें. म्हणूनच तुमच्या चिटणीसांचा आग्रह असतांना सुद्धां

---

* मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सभासदांच्या चवथ्या स्नेहसंमेलनाच्या प्रसंगीं ता. २०-१२-१९४१ रोजीं केलेलें भाषण ( 'समीक्षका' च्या जानेवारी १९४२ च्या अंकांत प्रसिद्ध झालें ).

पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेंत सुचविलेली वाङ्मयीन असंतोषाची मीमांसा मागील अंकावरून येथें पुढें चालू ठेवण्याचें मी नाकारिलें. वसंताची चेतना आतांपर्यंत हेमंतांत ताजी ठेवणें हें माझ्या वृत्तीला जुळलेंही नसतें. त्यापेक्षां मी असें ठरविलें कीं जो तुम्हांस जिव्हाळ्याचा वाटत असेल असा एखादा विषय घ्यावा, व त्या विषयासंबंधीं खेळीमेळीचे कांहीं विचार बोलून दाखवावे. तुम्हांस ग्रंथांच्या संग्रहाची आस्था आहे. ग्रंथांवरील टीका वाचून त्यांची योग्य निवड कशी होईल या महत्त्वाच्या गोष्टीकडे तुमचें लक्ष असणारच. पुस्तकांवर तुमचें प्रेम असल्यामुळें त्यांवर होणाऱ्या टीका तुम्ही वाचल्याशिवाय राहाणार नाहीं. तुम्ही स्वतः ग्रंथ पारखून घेत असाल; व वर्तमानपत्रांनीं व मासिकांनीं केलेली निंदास्तुति नित्य अजमावित असाल. तेव्हां वाङ्मय आणि टीका या विषयावरील माझे चार विचार तुम्हांपुढें मांडणें हें अनुचित होईल असें मला वाटत नाहीं. गेल्या एकदोन वर्षांत मी टीकेस पात्र झाल्यामुळें या विषयावर बोलण्याची थोडीबहुत पात्रता माझ्या ठायीं टीकाकारांनींच निर्माण केली आहे ! लोकांवर केलेली टीका वाचून सर्वांस टाळ्या वाजवितां येतात. पण स्वतःवर केलेल्या कुत्सित टीकेचा सुद्धां कंटाळा न मानणें सगळ्यांसच जुळत नाहीं. त्या अग्निदिव्यांतून पार पडल्याशिवाय टीका या विषयावर बोलण्याची योग्यताच प्राप्त होत नाहीं. गेल्या वर्षांतील टीकापात्र मंडळीची जर एक शर्यत लावली असती तर मला फुकटची फुशारकी मारतां आली असती कीं त्या शर्यतींत माझेंही तट्टू थोडेंसें दौडलें होतें. त्याचप्रमाणें परीक्षणें लिहून ललित व ललितेतर वाङ्मयाची थोडीबहुत चिकित्सा मीं स्वतः केली आहे. इतकें सांगितलें म्हणजे माझे विचार प्रचीतीशिवाय केवळ कोरड्या ब्रह्मज्ञानाचे नाहींत याची निराळी ग्वाही द्यावयास नको.

वाङ्मयावरील टीका हा सार्वजनिक टीकेचा एक विशिष्ट प्रकार आहे. सार्वजनिक जविनांत वावरणाऱ्या व्यक्तींवर उगाच टीका करण्याची खोड महाराष्ट्रांतील लोकांना जडली आहे असा एक कांगावखोर प्रवाद अलीकडे रूढ होऊं पाहात आहे. महाराष्ट्राच्या निर्भीड बुद्धीचा व विचारस्वातंत्र्याचा असा डांगोरा पिटला जावा ही माझ्या मतें आनंदाची गोष्ट होय. ज्या काळांत राजकारणी लोकांवर टीका करणें धोक्याचें होतें त्या काळीं बेकनची

ही एक आवडती उपमा असे कीं राजद्रोह आणि सार्वजनिक व्यक्तींची बदनामी हीं दोन भाऊबहिणीसारखीं आहेत. "सार्वजनिक जीवनांत वावरणाऱ्या व्यक्तींच्या कृती व हेतु यांजवर टीका करण्याचें पूर्ण स्वातंत्र्य अलीकडेच मान्य करण्यांत आलें आहे; पूर्वीं अशा टीकेमुळें दंड व तुरुंग या शिक्षा भोगाव्या लागत असत"[१] असें इंग्लंडचे एक प्रख्यात सर-न्यायाधीश कोबर्न यांनीं १८६८ मधें एका निवाड्यांत नमूद केलें आहे. युरोपांतील सगळ्याच देशांतील प्रजाजनांना हें स्वातंत्र्य अद्यापि मिळालें नाहीं हें आपण जाणतांच. सारांश, ज्यांना स्वातंत्र्याची खरी प्रीति आहे ते सार्वजनिक टीकेच्या हक्काची जोपासनाच करितील. त्यांना एकवेळ अशा टीकेचा अतिरेक पत्करेल; पण मुस्कटदाबी ते खचित सहन करणार नाहींत !

कडक टीकेमुळें सार्वजनिक व विशेषतः राजकारणी व्यक्ती चिडाव्यात हें अगदीं साहजिकच आहे. बाणांनीं विद्ध झाल्यानंतर शांतिपर्व एकट्या भीष्मालाच सांगतां आलें ! टीकाकारांविरुद्ध हाकाटी करणाऱ्या माणसास लोक असें विचारतील कीं अवास्तव स्तुतीच्या अतिरेकानें कुणाचे कान किटले आहेत काय ? एवढा मोठा वेदांती महादेव, पण तो सुद्धां स्तुतीला विटत नाहीं म्हणतात ! सन्मानानें कुणाची मान वांकली आहे काय ? गळ्यांत हार घालण्याचा जितका लोकांना अधिकार तितकाच क्वचित्प्रसंगीं शिरावर टीकेचा भार ठेवण्याचा कां नसावा ? माझ्या मतें निंदकाचें घर केवळ शेजारींच नव्हे तर बाजारींही असावें. त्याशिवाय सार्वजनिक व्यक्तींचा योग्य बाजारभाव ठरणार नाहीं. प्रसिद्धीनें ग्रासलेल्या अशा व्यक्तींस मधून मधून टीकेच्या मात्रेचे वळसे दिलेच पाहिजेत; नाहींतर त्यांना उन्मादवायु व्हावयाचा ! कोणी असें म्हणेल कीं व्यक्तींवर टीका करण्याची काय जरूरी ? त्यांच्या सार्वजनिक कृतींवर टीका करून कार्यभाग साध्य होणार नाहीं काय ? या साळसूद सवालास अठराव्या शतकांतील प्रसिद्ध उपहास-कवि पोप यानें मार्मिक उत्तर देऊन ठेवलें आहे तें असें—

१. L. R. 4 ( 1868 ) Wason V. Walter Q. B. 73, at pp. 93, 94.

प्रश्न—"निंदा कृतिला, व्यक्ती होते पात्र कशी उपहासा ?
उत्तर—खाशी क्लृप्ति ! सोडूनि शकुनी निंदूं त्याचा फांसा ?"[1]

दुसऱ्या एका प्रसंगीं त्याच कवीनें असें म्हटलें आहे कीं व्यक्तींचा संबंध आणल्याशिवाय निराकार दुर्गुणावर हल्ला चढविणें म्हणजे माणसाच्या सावलीबरोबर युद्ध खेळण्यासारखें आहे. आणि टीकेच्या कक्षेंत एकदां कां व्यक्ती आली म्हणजे हेत्वारोपादि अमोघ अस्त्रें वापरण्याचा मोह आवरतां येत नाहीं. कायदा व सदभिरुचि कांहींही म्हणोत, आम्हांला स्वराज्यापलीकडे जाऊन रामराज्यही स्थापावयाचें आहे ना ? मग तर सर्व प्रकारच्या सार्वजनिक टीकांना आम्ही मान दिला पाहिजे. खुद्द रामानें एका रजकाच्या खोडसाळ टीकेला महत्त्व देऊन सीतेला दूर लोटलेंच. त्या रजकाच्या टीकेला रजःकणासारखें कांहीं झटकून टाकलें नाहीं ! असो. लोकमत व लोकाचार शुद्ध राखण्यास सार्वजनिक टीकेची खळबळ पाहिजेच. महाराष्ट्रांतील लोकमताची गंगा ही आमच्या नद्यांप्रमाणेंच असणार. डोंगरांतून, दऱ्याखोऱ्यांतून खळखळत निनाद घुमवीत ती वाहात असते. आणि म्हणूनच तिचा प्रवाह जरी संथ नसला तरी तिचें जीवन शुद्ध, सहज पचनीं पडणारें व अतएव हितकारी असतें.

वर चर्चिलेली सार्वजनिक टीका ही जरी आमच्याकडे लोकशाहीच्या युगांतली नवी चीज असली, तरी आपल्या देशांत ग्रंथांवरील टीकेची परंपरा मात्र पुरातन आहे. व आज वाङ्मयावरील टीकेंत जे दोष म्हणून समजले जातात ते देखील अनादिसिद्धच दिसतात. तसें नसतें तर आपल्या जुन्या संस्कृत व प्राकृत कवींनीं प्रत्येक ग्रंथारंभीं खलांची संभावना व सज्जनांची खुशामत केली नसती. दुष्ट टीकाकारांना त्यांनीं किती नामी उपमा दिल्या आहेत ! कोणी म्हणतो कीं हा उंटासारखा—त्या काळीं सुद्धां टीकाकारांच्या माना लांब होत्या कीं काय कुणास ठाऊक !—केळींच्या वनांत गेला तरी कांटेच शोधीत राहाणार. दुसरा म्हणतो कीं हा माशीसारखा घाणीभोंवतींच घोंघावत राहील. यावरून टीकाकार म्हणजे दोषैकदृक् हा सिद्धांत सर्वमान्य झाला होता

१. Spare, then, the person and expose the vice.
How, sir ? not damn the sharper, but the dice ?

हें उघड आहे. ग्रंथ सोडून ग्रंथकाराच्या खाजगी जीवनावर विषारी टीका करण्याची प्रथाही प्राचीन दिसते.[१] खुद्द कविकुलगुरु कालिदास अशा टीकेंतून सुटला नाहीं, तेथें इतरजनांची काय कथा. भोजप्रबंधांतलें वर्णन काल्पनिक मानिलें तरी ह्या महाकवीची वेश्यालंपट म्हणून लोकांनीं बिनदिक्कत बदनामी केलेली दिसते. कवींना टीकाकारांचा जाच किती असह्य होत असला पाहिजे, हें बाणभट्टानें कादंबरीच्या आरंभीं काढलेल्या उद्गारांवरून सहज कळण्यासारखें आहे—

“ अकारणाविष्कृतवैरदारुणात्
असज्जनात्कस्य भयं न जायते
विषं महाहेरिव यस्य दुर्वचः
सुदुःसहं संनिहितं सदा मुखे ”
“ कटु क्वणन्तो मलदायकाः खलाः
तुदन्त्यलं बन्धनश्रृंखला इव ”
“ सुभाषितं हारि विशत्यधो गलात्
न दुर्जनस्यार्करिपोरिवामृतम् ”

आणि हीच शेवटची उपमा घेऊन याहीपेक्षां टीकाकारांची सडेतोड संभावना रामदासस्वामींनीं दासबोधाच्या आरंभीं केली आहे. त्या वर्णनांत वाङ्मयावरील टीकेचे सर्व दोष एकत्र आणिले असल्यामुळें तें वाचून दाखवण्याचा मला फार मोह होतो—

पूर्ण ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवी जो दूषण ।
तो दुरात्मा दुरभिमान । मत्सरें करी ॥
अभिमानें उठे मत्सर । मत्सरें ये तिरस्कार ।
पुढें क्रोधाचा विकार । प्रबळे बळें ॥
ऐसा अंतरीं नासला । कामक्रोधें खवळला ।
अहंभावें पालटला । प्रत्यक्ष दिसे ॥

---

१. पाश्चात्य उदाहरणाकरितां पहा–Spencer Bower on Actionable Defamation, p. 364.

कामक्रोधें लिथाडिला । तो कैसा म्हणावा भला ।
अमृत सेवितांच पावला । मृत्य राहो ॥

जुन्या युगांतील टीकाकारांची वृत्ति जरी आजच्यासारखीच होती, तरी त्यांच्या कृतीचें, पराक्रमाचें क्षेत्र मात्र इतकें विस्तृत व व्यापक नव्हतें. टीकेचें हत्यार त्यांना कांहीं विशिष्ट स्थळीं व तेंही गुणज्ञ मध्यस्थासमोर पाजळतां येत असे. कधीं भोज अगर हर्ष यांसारख्या राजांच्या दरबारांत, कधीं काशीसारख्या विद्येच्या माहेरघरीं भरलेल्या पंडितांच्या सभेंत, कधीं वसंतोत्सवासारख्या रसिकांच्या संमेलनांत, त्यांची व ग्रंथकाराची गांठ पडावयाची. त्यामुळें बहुजन-समाजांतील वाचकवर्गाशीं त्यांचा इतका प्रत्यक्ष निकट संबंध येत नसावा. व टीकाकार जरी वाटेल तें तरकट भकला तरी त्याची किंमत तात्काळ ठरत असे; कारण ज्यांच्यापुढें तो आपली टीका मांडी ते स्वतः रसज्ञ असून गुणांचे चहाते होते. म्हणूनच तर एकनाथ आपलें भागवत काशीस घेऊन गेले; धावकादींना हर्षापासून धनप्राप्ति झाली; आणि शाकुंतलाचें अभिरूपभूयिष्ठ अशा परिषदेनें स्वागत केलें. ग्रंथ संग्रहीं ठेवण्यासारखा आहे अशी स्वतःची पुरी खातरजमा करून घेतल्याशिवाय साधा वाचक सुद्धां त्याची नक्कल करून घेण्याचे सायास करता ना.

छापखान्यांचें युग चालू झाल्यानंतर नवाच जमाना सुरू झाला. खुद्द ग्रंथकार राजेरजवाड्यांच्या अगर केवळ पंडितांच्या आश्रयावर अवलंबून न राहातां लोकाश्रयावर अधिक मदार ठेऊं लागले. वाटेल त्या माणसास अगदीं भिकार पुस्तकें देखील लोकांवर लादावयाचा अधिकार प्राप्त झाला. सामान्य वाचकास ग्रंथाचें गुणदोषविवेचन करण्याची अर्थात् लायकी नव्हती आणि पैसे खर्च करण्यापूर्वी माल तर पारखून घेणें अवश्य होतें. म्हणून लोकांस टीकाकारांवर विसंबून राहाणें प्राप्त झालें. लोकांपुढें चांगल्या शिफारसी मांडल्या तर खप वाढेल या हेतूनें प्रकाशक सुद्धां टीकाकारांच्या मताला किंमत देऊं लागले, आणि प्रतिकूल टीका झाली तर कीर्तीला ग्रहण लागून वर आणखी पैशाची हानि होते म्हणून ग्रंथकार अधिक चिडखोर बनले. ग्रंथलेखन व प्रकाशन हा धंदा झाल्यामुळें सरस्वतीच्या मंदिरास थोडेंबहुत बाजाराचें स्वरूप आलें. आणि इंग्लंडांत अठराव्या शतकांत या बाजारांतली

खेंचाखेंच, गिल्ला यांचा गोंगाट ऐकूं येऊं लागला. मधून मधून डॉ. जान्सन-सारखा पंडित अधिकारवाणीनें शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत होताच. हळूहळू परीक्षक व खरे टीकाकार यांचे पंथ भिन्न होऊं लागले. तरीपण आजपावेतों या दोघांतील फरक सांगणें जरासें कठीणच जातें. एकुणिसाव्या शतकांत ऐसपैस आणि पल्लेदार परीक्षणें लिहावयाची प्रथा सुरू झाली. पण हीं भारदस्त परीक्षणें रामदासस्वामींनीं वर्णिलेल्या दोषांपासून अलिप्त नव्हतीं. त्यांचा एक उत्कृष्ट मासला म्हणून गिफर्ड (Gifford) नांवाच्या क्षुद्र माणसानें कीट्स् (Keats) वर क्वार्टर्ली (Quarterly) मासिकांतून केलेल्या मारेकरी हल्ल्याचा उल्लेख करतां येईल. ह्या टीकाकारानें काव्य समग्र वाचलें नाहीं अशी स्वतःच कबुली दिली आहे. ग्रंथ सोडून ग्रंथकारावर व विशेषतः त्याच्या मित्रांवर तो तुटून पडला. आणि जहर तर त्यांत इतकें भरलें होतें कीं त्यामुळें हळव्या कीट्स्चा मृत्युच ओढवला असें शेलीचें ठाम मत होतें. Blackwood मासिकांत सुद्धां कीट्स्वर असाच हल्ला झाला होता. आज कीट्स्ची कीर्ती अमर आहे याहून टीकाकारांच्या नादानपणाचें दुसरें प्रत्यंतर कशास हवें ! पाश्चात्य टीकाकारांच्या खरमरीत टीकेचे विपरीत ग्रहाचे मासले आपणांस वाचावयाचे असतील तर १९३६ सालीं प्रसिद्ध झालेलें Hold Your Tongue हें पुस्तक पाहा. त्यांच्यांत आणि आमच्यांत "उडदांमाजी काळेंगोरें काय निवडणार निवडणारे" या न्यायानें विशेषसा फरक करतां येणार नाहीं. "गटारांतील घाण," "सडलेल्या कुत्र्याच्या मांसाचें पक्कान्न" (हे शब्द तत्त्वज्ञानी कार्लाइल याचे आहेत), "गाढव" (त्याचाच हर्बर्ट स्पेन्सरला उद्देशून शब्द-), "ग्रंथकार जन्माला आला नसता तर जगावर उपकार झाले असते" (झोलाला उद्देशून आनातोल फ्रान्सचे शब्द-),—इत्यादि शेलक्या शिव्यांचा आहेर विद्वानांनीं एकमेकांना सढळ हातानें केलेला दिसतो ! असो.

आमच्याकडे छापखान्यांचा हा नवा जमाना सुरू झाला तेव्हां ग्रंथांची व टीकेची परिस्थिति फार निराळी होती. "ग्रंथांवर टीका" या साठ वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलेल्या आपल्या निबंधांत आमचे आद्य टीकाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं वर्णिल्याप्रमाणें त्या काळीं पांचपंचवीस मराठी पुस्तकें

वर्षाकाठीं प्रसिद्ध झालीं म्हणजे पराकाष्ठा होत असे. त्या काळीं आधीं मासिकें व वर्तमानपत्रेंच मुळीं थोडीं असत. व प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत "जमाखर्चाची पद्धति" "विद्यार्थिबुद्धिवर्धिनी" यांसारख्या ग्रंथांचा थोडाथोडका भरणा होता असें नाहीं. त्यामुळें स्वभाषेविषयीं आधींच उदासीन असणारा नव्या विद्वानांचा वर्ग वर्तमानपत्रांतून अगर मासिकांतून पुस्तकांची चर्चा करण्यास मोठासा उत्सुक नव्हता. विष्णुशास्त्र्यांनीं ही परिस्थिति बदलून टाकली. त्यांच्यावर तात्कालीन इंग्रेजी पल्लेदार परीक्षणांचा प्रभाव विशेष पडलेला दिसतो. मेकॉलेसारखीं डौलदार परीक्षणें लिहावयाची त्यांची मनीषा अगदीं उघड दिसते. ही भारदस्त परीक्षणांची परंपरा कांहीं काळ टिकली. तात्यासाहेब केळकर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, व आजचे माडखोलकर यांनीं ती पुढें चालविली.

पण आज ऐसपैस परीक्षणास पुरेसा वाव राहिला नाहीं. त्याचीं अनेक कारणें आहेत. काळच मुळीं धांवपळीचा झाला. सामान्य वाचकास लांबलचक विद्वत्ताप्रचुर प्रबंध वाचावयास फुरसद हवी ना ? बरें, ग्रंथकार इतक्या झपाट्यानें अनंत हस्तांनीं पुस्तकें द्यावयास लागले कीं परीक्षकास एका हातानें त्यांची वासलात लावणें दुरापास्त झालें. आणि परीक्षण तर ताबडतोब सादर केलेंच पाहिजे. प्रकाशकांस जाहिरातीसाठीं त्याचा उपयोग करून घ्यावयाचा असतो. ग्रंथकाराची वरात काढावयाची तर प्रशंसेचा नगारा सर्वांपुढें पाहिजे. अर्थात् प्रकाशकांचा तगादा निकडीचा असणारच. वर्तमानपत्रें व साप्ताहिकें यांची संख्या सारखी वाढूं लागली. व त्या प्रत्येकांत पुस्तक-परीक्षणाचें एक सदर—केवळ शोभेखातर कां असेना !—राखून हें ठेवण्यांत येतेंच. आणि या राखीव कुरणाच्या लहानशा टापूंतच काय तें टीकाकारानें मनमुराद चरावयाचें ! संपादक त्याला म्हणणार कीं ग्रंथकाराला जर वधस्तंभा-कडेच न्यावयाचा असेल तर त्याला वर्तमानपत्राचे दोनतीन स्तंभ कशाला ? एकादा किंवा अर्धासुद्धां पुरेल ! या सर्व रचनेचा परिणाम असा झाला आहे कीं परीक्षणें आटोपशीर, चटकदार व तींही चुटकीसरशीं लिहून देण्याचें दुमणें टीकाकाराच्या मागें दर आठवड्यास लागतें. इंग्लंडमध्यें असाही अनुभव येऊं लागला कीं असला गरमागरम ताजा मसालेदार माल साप्ताहिकें

व वर्तमानपत्रें स्वस्त देऊं लागल्यामुळें केवळ वाङ्मयावरील टीकेस खास वाहिलेलें भारदस्त आणि अर्थात् महाग मासिक चालूंच शकत नाहीं.

ग्रंथांवरील टीकेस लागलेलें हें वळण इष्ट आहे कीं कसें याविषयीं इंग्लंडांत १९३९ सालीं बरीच चर्चा झाली. नुकतीच दिवंगत झालेली विख्यात ग्रंथकर्त्री व्हर्जिनिआ वुल्फ इनें "परीक्षण" (Reviewing) या नांवाचा एक छोटेखानी निबंध त्या वर्षी लिहिला. नंतर फ्रँक् स्विनर्टन् या टीकाकारानें डेन्ट मेमोरिअल लेक्चरसाठीं "ग्रंथांचीं परीक्षणें आणि टीका" (The Reviewing and Criticism of Books) हा विषय निवडला. दर आठवड्यास झटपट रंगविलेलीं, परस्परविरोधी, शेंकडोंगणिक परीक्षणें छापलीं जातात हें दोघांसही सांगावयाचें होतें. एकाच पुस्तकावर दोन अगदीं विरुद्ध टोंकांला गेलेले अभिप्राय कसे दिले जातात, व तरी सुद्धां धूर्त प्रकाशक त्यांचा जाहिरातीच्या कामीं कसा उपयोग करून घेतात, याचें एक मासलेवाईक उदाहरण वुल्फबाईनें दिलें आहे. एका कवितांच्या पुस्तकावर एका परीक्षकानें असा अभिप्राय छापला कीं या कविता शतकानुशतकें लोक वाचतील. दुसऱ्या परीक्षकानें असें प्रसिद्ध केलें कीं मला यांतल्या कांहीं कविता वाचून ओकारीच आली! चाणाक्ष प्रकाशकानें आपली संधि ओळखली. त्यानें हे दोन उतारे समोरा-समोर छापून आपली पुस्ती जोडली कीं, "वाचकहो! स्वतःच कां वाचून पाहात नाहीं?" वुल्फचें म्हणणें असें होतें कीं असल्या धंदेवाईक परीक्षणांचा कोणासच फायदा होत नाहीं. ग्रंथकारास सांगण्यासारखें टीकाकारापाशीं कांहींच नसतें. व या अर्थहीन अभिप्रायांतून सत्य शोधून काढावयाचें तरी कसें? वाचक या मतामतांच्या गलबल्यामुळें आणखी बुचकळ्यांत पडतो. आणि प्रकाशकाचें कामही सुकर होत नाहीं. म्हणून तिनें दोन तऱ्हेवाईक उपाय सुचविले. एक धंदेवाईक परीक्षणासाठीं व एक खऱ्या टीकेसाठीं. वृत्तपत्रांतील धंदेवाईक परीक्षणाचें काम दोन संस्थांकडून केलें जावें. एकीचें नांव "गटर" ऊर्फ अंतरंग मांडणारी; व दुसरीचें नांव "स्टँप" ऊर्फ शिक्का मारणारी. पुस्तकांतील संविधानक, उतारे इत्यादि वाचकांपुढें ठेवणें हें पहिल्या संस्थेचें काम; व पसंतीचें अगर नापसंतीचें शिक्कामोर्तब करणें हें दुसरीचें. या कार्यासाठीं चर्चा वगैरे मुळींच न करतां केवळ पसंतीसाठीं फुली

व नापसंतीसाठीं कत्यार अशीं नुसती चिन्हेंच योजावयाचीं. व त्यांच्या संख्येच्या बेरीज वजाबाकी वरून पुस्तकाची किंमत ठरवावयाची. म्हणजे प्रकाशकाचें जाहिरात देण्याचें काम सोपें होईल; व वाचकालाही संदेह उरणार नाहीं. खऱ्या वाङ्मयचिकित्सेसाठीं ग्रंथकारानें खासगीरीत्या रास्त फी भरून तज्ज्ञांकडे जावें. मग स्वस्थ चित्तानें ते त्याचें निदान ठरवितील. जेणेंकरून ग्रंथकाराचें पूर्ण समाधान होईल.

ही आपली टीका व हे उपाय ललितवाङ्मयालाच उद्देशून व्हर्जिनिआ वुल्फनें मांडले होते हें सांगणें आवश्यक आहे. ललितेतर वाङ्मयाच्या प्रचलित परीक्षणांची योग्यता व उपयुक्तता तिनें स्वतःच मान्य केली आहे. वरील उपाय सुद्धां वैतागाच्या भरांत सुचविलेले दिसतात; व या त्राग्यांत भागीदार होण्याची इतरांची इच्छा दिसली नाहीं. खुद्द तिचे यजमान लेनर्ड वुल्फ—कीं ज्यांचा वृत्तपत्रकार व प्रकाशक म्हणून परीक्षणांशीं निकट संबंध आला होता—तेच तिच्याशीं सहमत नव्हते. परीक्षणें व टीका यांस खास वाहिलेल्या टाइम्स लिटररी सप्लिमेंटमध्यें सुद्धां या विषयावर जी चर्चा झाली तींत असा निष्कर्ष निघाला कीं, परीक्षकाच्या धंद्यास सहानुभूति व कौशल्य या गुणांची विशेष जोड पाहिजे; व जोंवर ग्रंथकारास आपलें पुस्तक खपवावयाचें असतें तोंवर त्याला परीक्षकाचा आश्रय हा घ्यावा लागणारच. कारण परीक्षकाचें मुख्य कार्य काय, तर वाचकांस पुस्तकाची अशी ओळख करून द्यावयाची कीं त्याला त्याच्या अंतरंगाची माहिती व्हावी व त्याच्या योग्यतेचा अजमास यावा.

विलायतेप्रमाणें महाराष्ट्रांत परीक्षणें सर्वस्वीं निरुपयोगी ठरण्याइतक्या थरावर गोष्टी गेल्या आहेत असें मला म्हणवत नाहीं. अजून आमची ग्रंथगंगा दुथडी भरून वाहूं लागली आहे असा देखावा दिसत नाहीं. आजसुद्धां आमच्याकडे प्रकाशनाचे समारंभ होत असतात. यावरून ग्रंथप्रकाशनाचा आम्हांस अतिपरिचय झाला आहे असें कसें म्हणावें ? अद्यापि ती एक कौतुकाची, आनंदाची व अभिनंदनाची घटना समजली जाते. वाचकांस देखील वृत्तपत्रें, साप्ताहिकें व मासिकें यांतील चर्चा त्रोटक व अपुरी वाटत असावी. तसें नसतें तर ग्रंथांवर आणखी सामुदायिक चर्चा झाल्या नसत्या. उदाहरणार्थ गेल्या सालीं भग्नमूर्ति, रणांगण, वाङ्मयीन महात्मता, या पुस्तकांवर

ठिकठिकाणीं अशा चर्चा झाल्या. यावरून वाङ्मयावरील टीका सांगोपांग व्हावी अशी रसज्ञ वाचकांची अपेक्षा दिसते. परीक्षणें तडकाफडकीच पाहिजेत असा प्रकाशकांचा अजून आग्रह सुरू झाला नसावा. परीक्षणांतील किंवा इतर सन्मान्य विद्वानांच्या प्रशंसेचा उपयोग जाहिरातींच्या कामीं प्रकाशक नुकते कोठें करूं लागले आहेत. केसरीच्या गेल्याच अंकांत "उपेक्षितांचें अंतरंग" या पुस्तकाच्या जाहिरातींत वुल्फबाईच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे "फुल्या" गोळा केल्या आहेत. आणि इतक्या नामांकित व रसिक विद्वानांच्या पूर्ण पसंतीस उतरलेलें तें पुस्तक खात्रीनें वाचनीय असणारच. परंतु बऱ्याचशा पुस्तकांच्या परीक्षणांत प्रकाशकांस थोडासा उशीर चालतो. कदाचित् पुस्तकांचा खपच झपाटाबंध होत नसल्यामुळें त्यांस तांतडीची घाई नसावी. नुकतेंच एका साप्ताहिकांतील परीक्षण माझ्या वाचनांत आलें. पुस्तक प्रसिद्ध होऊन एक वर्ष लोटल्यावर तें छापलें होतें. व तेंही त्या ग्रंथकाराचें दुसरें पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर ! जाहिराती बंद करण्याची धमकी देऊन अनुकूळ परीक्षणें लिहून घेण्याची निंद्य गुंडगिरी प्रकाशक करतात अशी माहिती मला तरी मिळाली नाहीं. सिनेमाच्या जाहिरातीचें दडपण वर्तमानपत्रांवर येतें अशी नुकती कोठें कुणकुण ऐकूं येऊं लागली आहे. जाहिरातीच्या मार्गानें वृत्तपत्रांवर व त्यांच्या मार्फत परीक्षकांवर दडपण आणण्याइतकें प्रकाशकांचें कदाचित् बळ नसावें. फ्रान्स देशाप्रमाणें आमचे परीक्षक प्रकाशकांचे बंदे झाले आहेत असें म्हणण्यास अद्याप तरी जागा नाहीं. आमच्याकडे आज परीक्षकांस स्वस्थ विचार करून स्वतंत्र परीक्षण व टीका छापण्यास पूर्ण मुभा आहे असा माझा समज आहे. खुद्द ग्रंथकारास तर परीक्षण केव्हांही हवेंच. ज्याप्रमाणें कोणाही पतिव्रतेस नवरा दिवसांतून दोनदां भांडला तरी चालेल पण तो सर्वस्वी उदासीन असावा हें सहन होणार नाहीं, त्याचप्रमाणें ग्रंथकारास प्रतिकूळ परीक्षणें चालतील पण उपेक्षा मात्र आवडणार नाहीं. अनुल्लेखानें पोटावर मारूं नका, हवेतर पाठीवर टीकेचे आघात करा असेंच तो म्हणेल. सारांश, महाराष्ट्रांत स्वतंत्र, सावकाश व विस्तृत लिहिलेल्या टीकेस व परीक्षणास मोठाच वाव आहे. वुल्फबाईनें सुचविल्याप्रमाणें तज्ज्ञांकडून चिकित्सा करून घ्यावयाची असेल तर त्या कामीं आपल्या साहित्य परिषदेनें चालविलेल्या

पत्रिकेची योजना करतां येईल. म्हणूनच मी रत्नागिरीच्या साहित्यसंमेलनांत असें सुचविलें होतें कीं तज्ज्ञांची एक यादी करून त्यांच्याकडून अगर त्यांच्या मार्फत पुस्तकांचीं परीक्षणें पत्रिकेंत द्यावींत.

या तज्ज्ञांची गोष्ट जर वगळली तर साप्ताहिकांदींतून प्रसिद्ध होणारीं इतर सामान्य परीक्षणें माहितीपूर्ण, निर्मत्सर, निःपक्षपाती, स्वतंत्र, व सहृदय अशीं असावींत ही आमची अपेक्षा थोडीशी अवास्तव नाहीं काय ? एकवर्णी, आखुडशिंगी, बहुदुधी व थोडें खाणारी अशी कामधेनु आम्हांस मिळणार तरी कशी ? वरील गुण परीक्षणांत अवश्य हवेत या बाबतींत सर्व टीकाकारांचें एकमत आहे. त्या गुणांचें रसभरित वर्णन करणें फार सोपें; पण ते अंगीं बाणणें मात्र कठीण. हा गुणसमुच्चय किती दुर्मिळ आहे हें थोड्याशा विचारानें सहज कळण्यासारखें आहे. माझ्या मतें हे सगळे गुण परीक्षणांत असलेच पाहिजेत असली फाजिल अपेक्षा करण्यापेक्षां, कायदा म्हणतो त्याप्रमाणें कांहीं विशिष्ट दुर्गुण नसावेत असली सहज फलद्रूप होणारी साधीच अपेक्षा बरी. कायदा हा गाढव आहे असें म्हणतात. पण त्याच्या पाठीवर अकलेच्या गोणी आहेत, व ती अक्कल बहुजन समाजाचीच आहे. तेव्हां कायद्यानें या बाबतींत घालून दिलेले निर्बंध हीच आमच्या अपेक्षांची पराकाष्ठा असें समंजस माणसानें समजावें. परीक्षण माहितीपूर्ण असावें असें सर्वांस वाटतें. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं वर उल्लेखिलेल्या आपल्या निबंधांत ग्रंथाचें ज्ञान या गुणास अग्रपूजेचा मान दिला आहे. शास्त्रीबुवा म्हणतातः—" ग्रंथाचें ज्ञान असल्याशिवाय टीकाकार एरवीं केवढाही विद्वान् असला तरी तें व्यर्थ होय, हें उघड आहे. ही गोष्ट वास्तविक पाहतां अगदीं स्पष्ट होय. कारण ज्या मनुष्यास एकाद्या वस्तूचें पूर्ण ज्ञान नाहीं, किंबहुना मुळींच नाहीं, त्यानें त्याविषयीं आपलें मत सांगणें मुळींच शोभत नाहीं हें अगदीं उघड आहे...आपण ज्याचे गुणदोष लोकांस दाखविणार तो ग्रंथ खरोखर आपणास पुरतेपणीं समजला आहे असा निश्चय झाल्यावरच टीका करणारानें त्या कामास हात घालावा. नाहीं तर तो अर्धामुर्धा समजून तितक्यावरूनच जर गुणदोषविवेचनास आरंभ केला तर तें त्या कर्त्याच्या उपहासास मात्र कारण होईल; व लोकांत सत्याचा प्रसार होणें एकीकडेच राहून मूर्खपणाचीं

मतें मात्र चोहोंकडे माजतील." या विवेचनावरून निर्धास्तपणें असा विश्वास बाळगावा कीं शास्त्रीबुवांनीं स्वतः लिहिलेलीं परीक्षणें पूर्ण ज्ञान झाल्याविणें लिहिलींच नसतील. आतां मजपाशीं असलेल्या निबंधमालेच्या कुळकर्ण्यांच्या आवृत्तींत 'ग्रंथांवर टीका' या निबंधानंतर लगेच टेंपेस्ट नाटकाच्या भाषांतरावरील शास्त्रीबुवांचा अभिप्राय छापला आहे. मूळ मालेंत मध्यंतरीं सहा अंक निघालेले दिसतात. कदाचित् त्यामुळें शास्त्रीबुवांना वरील विवेचनाचा विसर पडला असावा. कारण या अभिप्रायांत त्यांनीं खालील मजेदार कबुली दिली आहे:—"प्रस्तुत नाटक मूळ इंग्रजींतून आम्हीं अद्याप समग्र वाचलें नाहीं. अलीकडील प्रसिद्ध ग्रंथकार चार्लस ल्यांब् यानें शेक्सपियरच्या ऐतिहासिक खेरीज करून बाकीच्या बहुतेक नाटकांचीं संविधानकें कथारूपानें जीं रचिलीं आहेत त्यांवरून वरील नाटकांतील कथासूत्र मात्र आम्हांस माहीत होतें." या कबुलीजबाबानंतर लगेच, "मूळच्यांतील रस मराठींत उतरतांना भाषांतरकर्त्यानें यत्किंचितही कसर केली नाहीं असें आम्हांस वाटतें," व "एकंदरींत इंग्रेजीचें मराठींत रूपांतर कसें करावें हें ज्यास शिकणें असेल त्यास सांप्रत टेंपेस्ट नाटक चांगला नमुना होय" असें मत अधिकारवाणीनें जाहीर केलें आहे. या एकाच उदाहरणावरून समग्र ग्रंथ वाचल्याशिवाय अभिप्राय देण्याचा मोह जाणत्यांस सुद्धां कसा आवरत नाहीं हें स्पष्ट होईल. बाकी सर्वच ग्रंथ कांहीं श्रीपासून ज्ञपर्यंत वाचण्याजोगे नसतात. अशा परिस्थितींत कायद्याचाच निर्बंध सर्वांस पटेल. तो हा कीं, एकवेळ समग्र ग्रंथ न वाचला तरी चालेल, पण कृपा करून ग्रंथकारानें जें म्हटलेंच नाहीं तें मात्र केवळ कल्पनेनें त्याचे अंगीं चिकटवूं नका. हा दंडक पाळणें सुद्धां टीकाकारांस पुष्कळदां साधत नाहीं.

टीका अगदीं निःपक्षपाती, शांत, गंभीर, व सभ्य असावी ही अपेक्षा देखील व्यवहारांत सफल होणें कठीण. टीकाकारास न्यायाधीशाची वृत्ति साधेल तरी कशी ? बहुधा तो स्वतःच ग्रंथकार म्हणून प्रसिद्धीकरितां धडपडत असतो. मग दुसरा प्रसिद्धीचा प्रतिस्पर्धी याचक बघून तो गुरगुरला तर नवल तें काय ? असा एक समज आहे कीं टीकाकार म्हणजे स्वतः यश न पावलेला ग्रंथकार. त्या कोल्ह्याला द्राक्षें हीं आंबट असावयाचींच. तो मत्सर दूर कसा सारूं शकेल ?

तशांत त्याचा कंपू, त्याचें मंडळ हें ठरलेलेंच. त्या बैठकांनीं निर्लेप मन ठेवणें योग्याला सुद्धां जड जाईल. कांहींची मनोरचना पूर्वग्रहांनीं किंवा मूळच्या संस्कारांनीं दूषित झालेली असते. ज्यांस प्रत्येक कोनांत अश्लीलतेचा वास येतो, किंवा ज्यांस सर्व ठिकाणीं सरंजामशाहीचा भास होतो अशा टीकाकारांकडून कोणता ग्रंथकार न्यायाची अपेक्षा करील? या सर्व अडचणींचा विचार करूनच कायद्यानें दोन साधीं मूलभूत तत्त्वें ठरवून टाकिलीं आहेत. पहिलें असें कीं टीकाकाराचा ग्रंथकाराशीं खासगी द्वेष शाबीत झाला तर त्याची टीका युक्त किंवा शुद्ध होती असें म्हणतांच येणार नाहीं; कारण ती निष्कपट नसल्यामुळें शुचिर्भूत कशी असणार? दुसरें हें कीं ग्रंथ सोडून ग्रंथकाराच्या खासगी चारित्र्यावर हल्ला करणारी टीका केव्हांही गर्ह्यच. एखाद्या सार्वजनिक व्यक्तीचें आचरण व धोरण यांतील श्लेष काढणें कदाचित् कठीण असेल; पण ग्रंथ व ग्रंथकार यांतील फरक कायद्यास तरी उघड दिसतो. ग्रंथांत ज्या रूपानें ग्रंथकार अवतरला असेल त्या रूपावर यथेच्छ टीका करावी, खासगी जीवनावरून ग्रंथाची बदनामी करूं नये, हा कायद्याचा निर्बंध अगदीं साधा दिसतो. पण फलाशीं संबंध न ठेवतां कर्म करीत राहावें या उपदेशाइतकाच तो व्यवहार्य आहे असें अनेकांस वाटतें. तें कसेंही असो, हे दोन नियम पाळून मग टीका वाटेल तितकी कठोर व भडक केली तरी कायद्यास चालते. लसणीच्या फोडणीचा उग्र दर्प कायद्यास आवडत नसला तरी सहन खास होतो.

या दोन अपेक्षांचा कायद्याच्या धोरणानें मीं विचार केला. माझ्या मतें टीकाकाराचें मुख्य कार्य म्हणजे मतस्वातंत्र्याचा झेंडा उंच फडकत ठेवणें हेंच होय. न्यायाधीशांनीं सुद्धां हें पूर्वीपासून गृहीत धरलें आहे.[१] पण टीकाकार अनेक कारणांस्तव आपलें मतस्वातंत्र्य गमावून बसतो असा दुःखद अनुभव व्यवहारांत वारंवार येतो. कोणी उगवत्या भास्कराला अर्घ्यें वाहात असतात.

---

१. " Liberty of criticism must be allowed, or we should neither have purity of taste nor of morals. Fair discussion is essentially necessary of the truth of history and the advancement of science." Lord Ellenborough in Tabart v. Tipper 1808 K. B. I Comp. 350.

नगर वाचनालय, सातारा.



कोणी आपल्याच कंपूचा सारखा उदो उदो करीत असतात, व दुसऱ्यांचें यश हिरावून घेण्याची डाकूगिरी करतात. स्विनर्टनच्या मतें या विशिष्ट दुर्गुणा-मुळेंच सांप्रत टीकेचा मान कमी होऊन तिला कोणी प्रमाण मानीत नाहीं. कोणी स्वार्थाप्रीत्यर्थ किंवा केवळ पैशासाठीं भाडोत्री खोटें लिखाण छापतात, तर कोणी शुद्ध आळसानें कामचुकारूपणा करतात. आजच्या जाहिरातबाजीच्या युगांत स्वतःच्या तोंडाभोंवतीं आरती ओंवाळून घेण्याचे अनेक नवेनवे प्रकार आहेत. त्या आत्मश्लाघेच्या फसवेगिरीच्या आहारीं न जातां भीडमुर्वत मुळीं न राखतां सत्यास स्मरून टीकाकारानें आपलें मत लोकांपुढें स्पष्ट मांडलें तरच तो खरा टीकाकार. टीका हें सत्य व परिश्रम यांचें अपत्य आहे हें डॉ. जॉन्सनचें वर्णन सर्व टीकाकारांनीं ध्यानांत ठेवलें पाहिजे.

पण कठोर सत्याबरोबरच मनाचा थोडासा कोमलपणाही पाहिजे. त्यावांचून टीका सहृदय कशी होईल ! इतरांसारखा टीकाकारासही भावार्थाप्रमाणें लाभ होतो. म्हणून टीका करण्यापूर्वी ग्रंथकाराचें मनोगत ओळखलें पाहिजे. त्याची विशिष्ट मनोरचना समजून घेतली पाहिजे. शास्त्रीबुवांनीं सहृदयता म्हणजे ‘ ज्यावर टीका करावयाची त्यांत हृदयाचा पूर्ण अभिनिवेश होण्याची योग्यता ’ अशी व्याख्या केली आहे. असा अभिनिवेश झाल्यावर मग लेखनशैली, नावीन्य इत्यादि गुणांचें विवेचन शोभेल. अभिनिवेश होण्यास विशाल कल्पना लागते. पुस्तक वाचून संपेपर्यंत निर्णय तहकूब ठेवावा लागतो. लोकहितवादीं-वरील शास्त्रीबुवांनीं केलेली टीका वाचली म्हणजे विशाल हृदय किती विरळा आढळतें याची कल्पना येईल. टीकाकारास मी पांङूची उपमा देतों. स्वतः ग्रंथ निर्माण करणें त्याला शक्य नसलें तरी दुसऱ्यांचीं बाळें त्याला प्रेमानें खेळवतां आलीं पाहिजेत.

अशा निरपेक्ष व सहृदय परीक्षणांतूनच खऱ्या टीकेचा जन्म होतो. साधें परीक्षण व खरी टीका यांतील फरक उघड आहे. इमारत नुसती पास करणारा इंजिनिअर आणि स्थापत्याची कलातत्त्वें सांगणारा विशारद यांतील जो फरक, किंवा समोर आलेल्या खटल्याचा निकाल सांगणारा न्यायाधीश आणि व्यवहारधर्माचीं तत्त्वें शोधून काढणारा स्मृतिकार यांतील जो भेद, तोच केवळ

परीक्षक व खरा टीकाकार यांतील होय. अशा टीकेस साहित्यशास्त्र म्हणतात. क्वचित्प्रसंगीं असला टीकाकार दण्डीसारखा स्वतःच मोठा सौंदर्यनिर्माता असतो. पण तो कितीही मोठा असला तरी सौंदर्याचीं, रसाचीं सनातन तत्त्वें त्यानें शोधून काढावींत हें संभवतच नाहीं. फार झालें तर रीति, अलंकार इत्यादि अंगांची तो चर्चा करील. पण मोहून टाकणारें जें कांहीं "तत्" ( It ) द्रव्य असतें त्याचे सिद्धांत सांगतां येत नाहींत. तें रुचीवर, देशकालवर्तमानाप्रमाणें औचित्याच्या कल्पनांवर अवलंबून असणार. असा कोणी साहित्यदर्पण किंवा साहित्यादर्श निर्माण केला नाहीं कीं ज्यांत बघतां क्षणींच ग्रंथकारास आपल्या सौंदर्याची यथार्थ कल्पना यावी. रसाची परीक्षा तराजूंत ज़ोखून होत नसते. ती चाखून करावी लागते. व चाखून चाखून नीरक्षीरविवेक करणें हें काम हंसाचें असल्यामुळें आपल्या पूर्वजांनीं हंस हें सरस्वतीचें वाहन ठरवून टाकलें. व "सारासार निवडिती जनीं । त्या हंसावरी हंसवाहिनी ।" हें सरस्वतीचें वर्णन जर खरें करावयाचें असेल तर टीकाकारांनीं हंसाप्रमाणें क्षीरग्रहण करण्यास शिकलें पाहिजे.

★

# कवीचें कार्य*

शारदोपासकांच्या या संमेलनाचा अध्यक्ष म्हणून कोणीही अभिमानाच्या आनंदभरांत आपल्या भाषणास आरंभ केला असता. मला मात्र अभिमानानें मस्तक उंच करण्याऐवजीं लाजेनें मान खालीं घालावी लागणार. शारदेच्या मंदिराचें अंगण झाडण्याची सुद्धां माझी पात्रता नसतांना मला तिच्या उपासकांनीं पुजारी म्हणून निवडला तरी कसा, याचें कोडें प्रथम मला उलगडलें नाहीं. माझी मिराशीची पायरी ओलांडून गाभाऱ्यांत प्रवेश करतांना पावित्र्यविडंबनाचा प्रमाद तर मी करीत नाहींना, अशी मला राहून राहून भीती वाटते. आपण जेव्हां सरस्वतीची प्राणप्रतिष्ठा केली तेव्हां आपले 'पुरोहित' राजवाडे होते. "चोदयित्री सूनृतानाम् । चेतन्ती सुमतीनाम् । यज्ञं दधे सरस्वती ॥" हा मंत्र म्हणण्याचा त्यांचा खरा अधिकार; व त्या अधिकारानुसार त्यांनीं आपणास 'सूनृतें' सुनाविलीं व सुमतीची चेतना देखील दिली! त्यानंतरच्या सत्रांत आपण त्याच पट्टीचे पुरोहित योजिले. असें असतां ज्यानें अद्यापि एकही ग्रंथ प्रसिद्ध केला नाहीं, ज्याचें प्रकाशन अजून अंधारांतच आहे, ज्याची आराधना केवळ 'वाङ्मय' च, अशा एका अप्रबुद्ध युवकास यंदां आपण पूजेची पाळी नेमून दिली, या आपल्या लोकोत्तर औदार्याचें रहस्य विचारांतीं थोडेंबहुत मला उमगलें. आपण असा निश्चय केलेला दिसतो कीं, दशग्रंथी विद्वानाकरवीं सरस्वती-सत्र चालविण्याच्या या वेदोक्त प्रथेला आतां यापुढें साधें मराठी वळण लावावें. महाराष्ट्राचें हृदय सदैव भक्तीलाच भुकेलें असतें; म्हणून या मराठी शारदेच्या मूर्तीवर पाणी घालण्यास व गंधफूल वाहण्यास कोणीतरी भाविक वृत्तीचा गुरव आणावा. आपली आज्ञा शिरसावंद्य मानणें हें माझें कर्तव्य आहे. तीर्थ आणि अंगारा देतांना म्हणजे दुसऱ्यांच्या अभिषेकाचे व धुपाचे अवशेष वाटतांना तात्त्विक

---

* श्रीमहाराष्ट्र-शारदामंदिर, पुणें, या संस्थेमार्फत भरविलेल्या अकराव्या शारदोपासक-संमेलनांतील अध्यक्षीय भाषण ( तारीख २३-५-४२). 'सह्याद्री'च्या जून १९४२ च्या अंकांत प्रसिद्ध झालें.

निरूपणाची मजकडून आपण खात्रीनें अपेक्षा करणार नाहीं. संतांचे उच्छिष्ट बोल असंबद्ध रीतीनें गुणगुणण्यापलीकडे मला काय करतां येणार ?

निरूपण तर राहोच, पण शारदेचें 'नवरसरुचिर' भजन कसें करावें हें देखील मी शिकलों नाहीं. कवींच्या मुखानें महाराष्ट्र-शारदेचा महिमा कसा वाढवावा हें जाणण्याची मात्र मला तळमळ लागून राहिली आहे. मी स्वतःस कवी म्हणवितों असा आपण गैरसमज करून घेऊं नका. सुप्रसिद्ध रशियन कम्युनिस्ट कवी मयकोव्हस्की यानें कवितेची एक ओळ देखील लिहिण्यापूर्वी त्याच्या प्रतिभेचा परिमल त्याच्या 'फ्यूचुरिस्ट' बांधवांनीं चौफेर फैलावून टाकला होता असें माझ्या वाचनांत आलें आहे. मी लिहिलेल्या कवितांत अशींच कांहीं प्रसादचिन्हें माझ्या भविष्यवादी मित्रांना दिसल्याचें माझ्या ऐकिवांत नाहीं. मी कविता लिहिल्या आहेत व लिहीत असतों, हें नाकबूल कां करूं ? वास्तविक घरींच जुनाट होत असलेल्या माझ्या स्फुट कवितांचा 'मधुपर्क' हा स्वल्प संग्रह आपणांस येथेंच सादर करण्याची माझी प्रबळ इच्छा होती. पण उदास आळस सारखा आड येतो त्याला काय करावें ! मुहूर्तच लागत नाहीं. काव्याचे आणि माझे संबंध जन्मापासूनच थोडेसे अभागी आहेत. मी काव्याच्या मुळावरच जन्माला आलों आहें; कारण माझ्या जन्मानंतर थोडक्याच अवधींत केशवसुत निवर्तले! माझे एक ज्योतिषी मित्र माझ्या कष्टप्रसव कवितेची टवाळी करतात. पंचमस्थ शनीचा तो गुणधर्म आहे, असें त्यांचें म्हणणें. पण तो शनि कुंभेचा आहे. घट सावकाश कधीं तरी पण शिगोशीग भरील, अशी मी वेडी आशा बाळगतों. दरम्यान 'शनैश्चरगति हेंच सौंदर्य' ( Slowness is Beauty ) हें फ्रेंच शिल्पकार रोदां ( Rodin ) याचें सूत्र कंठीं धारण करून या तत्त्वानुसार एकेका कवितेवर शिल्पकाराप्रमाणें वर्षानुवर्ष खपत राहणारे पॉल व्हॅलेरी ( Paul Valery ) सारखे कवि आहेत, असें मी मनाचें समाधान करून घेत असतों. काव्यावर मी थोडेसे परिश्रम केले आहेत इतका अधिकार "कवीचें कार्य" काय या बाबतींत निश्चित मत प्रतिपादन करण्यास पुरेसा नाहीं, हें मी जाणतों. पण आपल्या सहवासांत या विषयावरील गप्पागोष्टींत दोन घटका

घालविण्याचा मोह आवरेना. ‘काव्यादर्श’कार दण्डीनेंच नाहीं का दंडक घालून दिला कीं–

> “कृशे कवित्वेऽपि जनाः कृतश्रमाः ।
> विदग्धगोष्ठीषु विहर्तुमीशते ॥”

वास्तविक शारदोपासक-संमेलनांत अध्यक्षानें एखादें सुंदर नवें काव्यच वाचून दाखविलें पाहिजे. पण ग्रीष्म हा पिकाच्या कापणीचा काळ नसून जमीन तयार करण्याचा आहे. तेव्हां मशागतीचीच गोष्ट काढणें मला उचित वाटलें.

‘कवीचें कार्य’ हा विषय शारदोपासकांस वास्तविक अत्यंत जिव्हाळ्याचा वाटला पाहिजे. पण महाराष्ट्रांत आज जेथें कवींनाच विशेष मान मिळत नाहीं, तेथें त्यांच्या कार्याची चिकित्सा तरी कोण करणार ? महाराष्ट्रशारदेच्या दरबारांत कवीचा दर्जा अलीकडे खालचा लेखला जातो असें उघड दिसतें. अवरंगजेबाच्या दरबारांतील शिवाजीप्रमाणें त्याला खालच्याच मनसबदारांत उभा करतात. या अपमानामुळें तो उसळून बेभान होत नाहीं, हें त्याचें सौजन्य समजलें पाहिजे. बहुधा त्याला, बाटल्याशिवाय बहुमान प्राप्त होत नाहीं असा अनुभव येत आहे. आणि सरदारी मिळाली म्हणजे साहजिकच तो मूळच्या मायेला विसरून नवाच ‘कलमा’ माजवीत राहतो. यामुळेंच आपल्या आतांपर्यंतच्या संमेलनांत व इतरत्र झालेल्या साहित्योत्सवांत काव्याचें ध्येय काय, आजच्या परिस्थितींत कवीचें कार्य कोणतें, इत्यादि तत्त्वबोध एखाद्या आधुनिक अभिजात कवीच्या मुखानें झाला नाहीं; निदान माझ्या वाचनांत तरी आला नाहीं. मला असें वाटत नाहीं कीं, यावर उत्तरादाखल सध्याचा कोणी मराठी कवी सत्याला स्मरून अशी ग्वाही देईल कीं, “अहो ! आम्ही जें कार्य करितों तेंच इतकें प्रभावी आहे कीं, लोकांचे त्यानें डोळे दिपावे, व आमच्या तेजाचें पृथक्करण करण्याची त्यांना बुद्धीच सुचूं नये.” कष्टानें कां होईना, पण कवींना असें कबूल करणें प्राप्त आहे कीं, महाराष्ट्राच्या आजच्या जीवनांत काव्याचा भाव बराच उतरला आहे. काव्यगायनाच्या आक्रोशानें कवींची थोडीबहुत जाहिरात झाली नसती तर बाजारभाव याहीपेक्षां कदाचित् खालीं घसरला असता. जागतिक घडामोडींचा या मंदीवर थोडासा परिणाम होत

असेल. पण एकंदरींत काव्य हें आम्हांला करमणुकीचें खेळणें झालें आहे. रविवारच्या साप्ताहिकांत कविता बहुशः नकला करून, सोंगें घेऊन, म्हणजेच विडंबन करून हंसविते. क्वचित् लोकमतांत वरवर तरंगणाऱ्या एखाद्या प्रचलित प्रसंगाचा थट्टेसाठीं उपयोग करिते. या उपहासांतसुद्धां इंग्रजी कवयित्री सॅजिटेरिअस ( Sagittarius ) ('धनुर्धारी') हिचें मर्मभेदी शरसंधान नसतें. आमच्या साप्ताहिकांतील कवितांचा सर्वसाधारण हेतु हा कीं, रविवारच्या वामकुक्षीची डोळ्यांवर लवकर झांपड यावी; डोळे उघडावेत हा नव्हे. मासिकांत काव्याची स्थिती याहून थोडीशी बरी आहे. पण त्यांतसुद्धां कविता हा एक शोभेचाच प्रकार समजला जातो. भोजनांतील चटण्या-कोशिंबिरींप्रमाणें रुचिपालट करण्यासाठीं एकदोन कविता मधून मधून असल्या म्हणजे पुरे. साहित्य-संमेलनांत तर काव्य आतां करमणुकीच्याच सदरांत जमा झालेलें दिसतें. सारांश, ज्या ठिकाणीं कवितेनें राणी म्हणून मिरवावयाचें, त्याच ठिकाणीं ती आतां सैरंध्रीसारखी हां-जी करीत, खुषमस्करी करीत वावरत आहे. आणि तिच्या तरुण पतींपैकीं कांहींजण तरी आपला वेष पालटून तिच्याकडे कानाडोळा करूं लागले आहेत. नाहींतर काणेकर, मर्ढेकर या उन्मेषशाली लेखकांना आपल्या पहिल्या प्रीतीचा विसर कां पडावा ? पूर्वी अराजकाच्या काळांत कवींनीं महाराष्ट्राच्या वृत्तीला वळण लावलें, कृतीला चालना दिली, कवींनीं महाराष्ट्र-धर्म स्थापिला असें आपण वाचतों. आजच्या कवींना अनुलक्षून आपणांस हें विधान करतां येईल काय ?

जनमनाची स्फूर्ती काव्यांत पूर्वीसारखी उसळत नाहीं असें म्हणण्याची जेव्हां पाळी येते, तोच काळ 'कवीचें कार्य काय ?' ह्या विषयाची टीकात्मक चर्चा करण्यास सर्वथैव अनुकूल असतो, असें इंग्लडचे विद्यमान श्रेष्ठ कवी एलिअट यांनीं कांहीं वर्षांपूर्वी सांगितलें. इंग्लंड व अमेरिका या देशांत काव्याची आमच्या देशांतल्या इतकी जरी शोचनीय अवस्था झालेली नसली, तरी प्रत्येक तरुण कवीच्या मनांत ही जाणीव जाचते कीं काव्य मागें पडत चाललें आहे. म्हणून तिकडे बरेचसे नामवंत कवी हृदय धुंडाळून काव्याच्या आत्म्याची तपासणी करण्यांत गुंतले आहेत. असें स्थूल मानानें म्हणतां येईल

कीं, आधुनिक इंग्रजी कवींनीं काव्यनिर्मितीइतकाच काव्यचर्चेवर भर दिला आहे. रशियांत सुद्धां इतर वाङ्मयप्रकारांपेक्षां काव्याच्याच प्रांतांत विचारमंथन झालें. त्याच प्रेरणेनें आम्हीं थोडेंसें आत्मशोधन केलें पाहिजे.

आत्मशुद्धी करून उच्छेद झालेल्या मार्गाचा मराठी कवींनीं जर शोध लावला नाहीं, तर महाराष्ट्र त्यांना वाटेंतच टाकून पुढें निघून जाईल. मग इतर वाटाड्यांकडून दिशाभूल होईल अशी हाकाटी करण्याचा त्यांना काय अधिकार ? एके काळीं कवीच्या गोटांत वावरणाऱ्या पराक्रमी वीरानें ‘ शारदेची वीणा फोडून तिच्या हातांत बंदूक द्या ’ असा जर घरभेदी उपदेश केला, तर त्यांना मग वाईट कां वाटावें ? हिंस्र श्वापदांना सुद्धां खेंचून आणण्याची मंत्र-माधुरी जर त्यांच्या वीणेंत नसेल, तर नुसता वावदूकपणा काय कामाचा ? मग बंदुकीशीं गांठ आहे ! कवींचें स्वतःचें तेजोबळ जर प्रखर असतें, तर त्यांस ठांसून सांगतां आलें असतें कीं जो जातिवंत कवी आहे तो प्रसंगवशात् सैनिकही होतो. केवळ स्वतःच्या देशासाठीं, धर्मासाठींच नव्हे, तर माणुसकीच्या संरक्षणासाठीं. महाकवि डान्टे लढून लढून शेवटीं हद्दपार झाला नाहीं काय ? ग्रीकांच्या स्वातंत्र्ययज्ञांत एरवींच्या इष्कीयार बायरननें प्राणांची आहुति नाहीं का दिली ? स्पेनच्या समतायुद्धांत स्टीफन् स्पेन्डर, ज्युलिअन् बेल्, कॉडवेल् हे नाहीं का लढले ? एवढें लांब कशाला ? ज्यानें आम्हांस गायत्री मंत्र दिला, त्या विश्वामित्रानें राक्षसांच्या निर्दालनासाठीं रामास धनुर्विद्येंत तरबेज नाहीं का केलें ? मला तर वाटतें कीं, इतर जड चेतनेच्या पण आडदांड देहांच्या लोकांपेक्षां वेडा तरुण कवीच चटकन् संग्रामांत उडी घेईल ! त्याची कल्पना विश्वाला व्यापून उरण्याइतकी जर विशाल झाली असेल, तर मात्र गोष्ट निराळी; मग विश्वंभर मनाला द्वेष तरी कोणाशीं करतां येईल ? कवी आणि सैनिक यांतील फरक एरवीं हा कीं, एकाची बंदूक खांद्यावरच राहते; दुसरा काम संपलें म्हणजे ती संदुकेंत बंद करून कोनाड्यांत टाकून देतो. खरा कवी बंदूक उचलली तरी लेखणी सोडीत नाहीं. रणांगणावर शाई मिळाली नाहीं, तर विल्फ्रेड ओवेन (Wilfred Owen) प्रमाणें आपल्या रक्तानें तो कविता लिहील, आणि संगिनीच्या टोंकानें तुमचें हृदय टोंचून त्यांत युद्धजन्य करुण रस ओतील ! असो.

राजकारणी पुढाऱ्यांची काव्यावर तात्पुरती गैरमर्जी कां झाली आहे हें आम्हांस कळतें. ते लव्ह्लेस्प्रमाणें कवितेला उद्देशून असें म्हणतील कीं –

" प्रेम जरी माझें ढळलें ।
कारण तें तुजला कळलें ॥
प्रीती जी तुजवर मोठी ।
ती सारी देशापोटीं ॥ "

[ Yet this inconstancy is such
As you too shall adore
I could not love thee Dear so much
Loved I not " Country " more. ]

पण कवींनाही त्यांना आदराची विनंती करण्याचा हक्क आहे कीं, श्रेष्ठ कोण हा वाद सर्वस्वी निरर्थक होय. हृदय, डोकें आणि हात यांच्या उपयोगाची प्रत कोणी लावावयाची ? कवींचें काव्यचिंतन, विचारवंतांचें राजकारण, शेतकरी-मजुरांचें अर्थोत्पादन, हे सारे मानवी आत्म्याच्या संपूर्ण पिंडीला प्रदक्षिणा घालणारे निरनिराळे मार्ग आहेत. त्यांतील काव्य हा एक मार्ग आहे हें कवींनीं जाणावें, व इतरांनीं मानावें.

राजकारणी पुढाऱ्यांप्रमाणेंच महाराष्ट्रीय पंडितांची देखील काव्यावर हल्लीं वक्र नजर होऊं लागली आहे. आपल्या दोन उपाध्यक्षांपैकीं एक—वामनराव जोशी—हे शारदेच्या वीणाधर उजव्या हाताचे मानकरी आहेत. दुसरे—दत्तोपंत पोतदार—हे वेदधारी हाताजवळ बसणारे 'ज्ञानकरी' आहेत. मी त्यांना कोटीच्या मोहानें सुद्धां 'वेदाभ्यासजड' म्हणणार नाहीं; कारण सहवासांत त्यांच्या हृदयस्थ काव्याचा मला पुरता परिचय झाला आहे. शारदेची वीणा आणि माळ हिसकावून घेऊन, तिच्या प्रत्येक हातांत एकेक वेद द्यावा असा दावा ज्ञानमार्गी पोतदारांनीं मांडला आहे. शारदोपासकांनीं हा घरांतला बखेडा मिटविला पाहिजे. शास्त्र हेंच काय तें जीवनाला वळण देणारें वाङ्मय; ज्ञान हीच खरी शक्ति; कवींच्या ग्रंथांतून जीवनाचें इष्ट वळण शोधण्याच्या भरीस न पडतां ज्ञानवाहक वाङ्मयाकडेच आपणांस वळलें पाहिजे; म्हणजेच

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत


कालिदास-भवभूति आणि शॉ-इब्सेन यांच्यापेक्षां मनु, शंकराचार्य आणि क्रोशे-मार्क्स यांच्याकडे आपण अधिक लक्ष दिलें पाहिजे; हीं पोतदारांच्या दाव्यांतील मुख्य कलमें. आपली अशी अपेक्षा असेल कीं, उदार मनाचे उजवे मानकरी अशी कैफीयत दाखल करतील कीं वादीचा दावा खराही आहे व खोटाही आहे; पण प्रतिवादीच्या वीणावादनास वादीनें हरकत करूं नये. आणि मग हीं दोनही अंगें संभाळणाऱ्या आपल्या अध्यक्षांना सामोपचाराचा निर्णय द्यावा लागेल. शास्त्र आणि काव्य या दोघांचा हा झगडा प्राचीन काळापासून चालत आला आहे असें प्लेटोच्या ' सुराज्यांत ' ('Republic') सॉक्रेटीस म्हणतो तेंच खरें. "मूर्ख-सभेंतुनि माथें उंच करोनीच श्वान भुंकतसे।" (The yelping hound that in assemblies of the fool exalts its head) असा काव्याचा उपहास करणारें ग्रीक पंडितांचें एक वचन सॉक्रेटिसानें उद्धृत केलें आहे. आमच्या पंडितांनीं तें ऐकून खात्रीनें माना डोलविल्या असत्या. शास्त्राकडे काव्य वास्तविक दुर्लक्ष करीत नाहीं. आमचा जुना कालिदास व इंग्रजांचा आजचा डब्ल्यू. एच. ऑडन् यांच्या काव्यांत प्रचलित शास्त्रज्ञान भरपूर वापरलेलें दिसेल. तथापि कज्जाचीच भाषा चालू ठेवावयाची असल्यास कवी असें नक्की म्हणतील कीं, शास्त्रज्ञानानें जीवनाला वळण लागतें हें वादीचें म्हणणें खोडसाळपणाचें आहे. प्रतिवादीस तें कबूल नाहीं व कधींही कबूल नव्हतें. शास्त्र जें वळण लावतें त्याविषयीं कवीची वृत्ति विल्यम ब्लेक या इंग्रजी कवीच्या वैतागाच्या उद्गारांत चांगलीच प्रकट झाली आहे. बेकनच्या निबंधाच्या पुस्तकांत त्यानें बाजूस शेरा मारला कीं " सद्गुण म्हणजे या लुच्च्यांना वाटतें तरी काय ? युद्धें, युद्धांतील भीषण प्रकार, आणि त्यांतील चारित्र्यशून्य वीरच कीं काय ? " (What do these knaves mean by virtue ? Do they mean war and its horrors, and its heroic villains ?) शास्त्रानें, नुसत्या भरीव विद्येनें, जर विवेक येता, तर युद्धाचा रानटी आचार मानवानें अजून पाळला असता काय ? शास्त्र आणि ज्ञान या " बॉम्बर-युगांत " अबलाअर्भकांच्या संहारासाठीं वापरलें जातें, हाच का विवेकाचा परिणाम ? शास्त्रानें समृद्धीचा वर दिला, तरी गरीबांचें दारिद्र्य कांहीं दूर होत नाहीं तें कां ? आज शास्त्र आणि विज्ञान हीं

माकडाच्या हातीं कोलितें झालीं आहेत. या माकडाची मानवांत खरोखर उत्क्रांती करावयाची असेल, तर त्याच्या हृदयग्रंथींत थोडासा काव्यरस घातला पाहिजे. शास्त्रामार्फत सृष्टीला गुलाम करणारा मानव स्वतःच्या गुलामगिरीच्या शृंखला तोडूं शकत नाहीं, ही शेलेची टीका कोण मान्य करणार नाहीं ? काव्याच्या मंत्रसामर्थ्यानेंच त्या आपोआप गळून पडतील. आमच्या मराठी कवींचा हा नुसता मनोरथ नव्हता; प्रत्यक्ष निष्ठेचा निर्धार होता. "सोलीव विवेकाचा विवेक" असा आपला एक एक बोल आहे हें निश्चयानें सांगणाऱ्या एकनाथांनीं शास्त्राची फार मार्मिक दृष्टांतानें बोळवण केली आहे. "मोराअंगीं अति डोळसें । अंगभरीं भरलीं पिसें । एके दृष्टीविण आंधळें जैसें । जाहलें तैसें विद्वांसा ॥" काव्यच ही दृष्टी देऊन विद्वानास खरा डोळस करतें. ज्यांच्या नांवांचा उल्लेख पोतदारांनीं केला आहे, त्यांपैकीं पुराण-पुरुष शॉ स्वतःचा बचाव करण्यास समर्थ आहे. त्याच्या प्रस्तावनेंत एकदा का आपण गुंतलों, म्हणजे नाटक दूरच राहील. पण काव्यापेक्षां ज्या कोशेचे ग्रंथ वाचावेत म्हणून पोतदार शिफारस करतात त्याचें मत एकनाथासारखेंच होतें, इतका निर्वाळा मी देऊं शकतों. आपण त्याचा 'काव्याचें समर्थन' ('Defence of Poetry') हा निबंध अवश्य वाचावा. काव्याचा फैलाव आपल्या हातें शक्य तितका व्हावा अशी त्या तत्त्वज्ञान्याची उत्कट मनीषा होती. म्हणजे शास्त्राचा महादेव काव्याचा राममंत्र जपतो, असेंच शेवटीं म्हणावें लागतें !

या मंत्रानें शिवाला सुद्धां शांती कशी प्राप्त होईल याची चिंता काव्यप्रेमी तत्त्वज्ञानी आणि प्रतिभावान् कवी आज कित्येक वर्षें करीत आले आहेत. काव्य हें शुद्ध आनंदाचें निधान आहे; मनोरंजनानें होणारा आल्हाद हेंच त्याचें प्रधान ध्येय; चिंतन हेंच त्याचें साध्य; क्वचित्प्रसंगीं कांतेप्रमाणें गोड गोड बोलून उपदेश करण्याचेंहि कार्य त्याला करतां येईल. हे सिद्धांत सर्वमान्य आहेत. नव्याजुन्या, पौर्वात्य आणि पाश्चिमात्य साहित्यचर्चेंत ते गृहीतच धरले जातात. मी त्यांचा काथ्याकूट करणार नाहीं. शारदोपासकांच्या उपासनेंत हा भाग वारंवार येतो. ही त्यांची त्रिकाल-संध्याच आहे. तेव्हां ती झाली आहे असें मानून हवें तर पाण्याशिवाय एक आचमन करून पुढें जाण्यास हरकत नाहीं.

पण या संध्येनें सर्व संदेह फिटत नाहीं. काव्यसाम्राज्याचा विस्तार या आकुंचित प्रांतापलीकडे नेला तरच तें चिरस्थायी होईल असा विचारवंतांचा आग्रह दिसतो. केवळ आनंदानें समाधान होत नाहीं; काव्याला सत् आणि चित् यांच्याच कार्यी लाविलें पाहिजे हें मत युरोपांत पहिल्या प्रथम सॉक्रेटिसानें, अगर प्लेटोनें म्हणा, ठांसून मांडलें. नाहीं तर आपल्या 'सुराज्यां'तून त्याला हांकून लावावें असें या तत्त्वज्ञान्यांनीं ठरविलें. सॉक्रेटिसाच्या मनावर काव्याची इतकी जबर मोहिनी पडली होती कीं, काव्याला हद्दपार करतांना सीतेला घरांतून काढतांना रामचंद्राला सुद्धां झाला नसेल इतका त्याला विषाद झाला. राजकीय सुव्यवस्थेला व मानवी जीवनाला कविता उपयोगी पडेल असें जर कोणी कवी किंवा कवितेचा कैवारी शाबीत करील तर तिला सुराज्यांत परत घेऊं अशी त्या वेळींच त्यानें दंवडी पिटविली. कारण त्याला हें मान्य होतें कीं कविता आनंददायी तशीच उपयोगी झाली तर खरें जनहित साधेल. सॉक्रेटिसाचें आह्वान स्वीकारून अनेक कवींनीं कवितेची कैफियत दाखल केली आहे. सिडनी, शेली, आजचे नवयुगाचे रशिअन् कवी, तरुण पिढीचे इंग्रेज आणि अमेरिकन कवि, या सर्वांनीं काव्याचा उपयोग काय व तो कसा करतां येतो, हें केवळ चर्चेनेंच नव्हे तर आपापल्या परी कृतीनें देखील सिद्ध करून दाखविलें आहे. हाच प्रश्न मुख्यत्वेंकरून आज पाश्चात्त्य कवींच्या मनांत घोळत आहे हें मीं आरंभीं सांगितलेंच आहे.[१]

संस्कृत साहित्यकारांना काव्याच्या या सामाजिक कार्याची विशेषसी चर्चा करावी असें वाटलें नाहीं याचीं माझ्या मतें मुख्य कारणें दोन असावींत. एक तर ते राजाश्रयाखालीं नांदत असल्यामुळें समाजापेक्षां राजदरबारांत आपलें स्थान काय हें ठरविणें व्यवहारदृष्ट्या त्यांस अधिक महत्त्वाचें होतें. दुसरें असेंही असेल कीं, समाजाच्या जीवनांत काव्याचें स्थान अढळ आहे असें ते

१. एलिअट म्हणतो त्याप्रमाणें "The poet is much more vitally concerned with the social uses of poetry and with his own place in society; and this problem is now perhaps more importunately pressed upon his conscious attention than at any previous time."

गृहीतच धरीत असत. त्यांच्या काळीं काव्याला देशोधडीस लावण्याची भाषाच मुळीं कोणाला सुचली नसती; कारण काव्य हा समाजाच्या संसाराचा बहिश्चर प्राणच समजला जात असे. म्हणून काव्यावर प्रकाश पाडणाऱ्या ग्रंथांत सुद्धां आरंभीं याविषयीं थोडेंसें थातुरमातुर केलें म्हणजे कार्यभाग साधत असे. "काव्यं यशसे—" इत्यादि कारिका म्हणून ग्रंथाचा समग्र विस्तार काव्याच्या कला-कुसरीच्या चर्चेनेंच ते व्यापून टाकीत असत. काव्य हें सोनें आहे असें ठरवून टाकल्यावर दागिना सुबक कसा घडवावा एवढाच प्रश्न साहजिक शिल्लक राहतो.

तर्कप्रधान मराठी मनास आधीं कळस आणि मग पाया ही वृत्ती पटणें शक्यच नव्हतें. त्यांची कृती नेहमीं पायाशुद्धच असावयाची; शिवाय मराठी कवींचा पंथच निराळा होता. हर्षधावकादि राजांकरितां नव्हे तर साळ्या-माळ्यांच्या बहुजनसमाजाकरितां ते काव्यरचना करीत होते; आणि तीही हीन लेखिल्या जाणाऱ्या प्राकृत भाषेंत. त्यांच्या स्वतःच्या जीवनांत यश, अर्थ इत्यादि प्रयोजनांस स्थानच नव्हतें. म्हणून तर या ध्येयांची एकनाथांनीं हें 'कवीश्वरांचें कवितापिसें' म्हणून उघड उघड हेटाळणी केली. काव्याच्या सामाजिक ध्येयाचा संतकवींचा शोध रामदासस्वामींनीं आपल्या नित्याच्या निःसंदेह शब्दांत स्पष्ट मांडला. काव्याचे धीट, पाठ व प्रासादिक असे त्यांनीं तीन वर्ग कल्पिले. हें वर्गीकरण बहुधा त्यांचें स्वतःचेंच असावें. "धीट म्हणिजे धीटपणें केलें। जें जें आपुल्या मनास आलें। बळेंचि कवित्व रचिलें। या नांव धीट बोलिजे ॥ पाठ म्हणिजे पाठांतर। बहुत पाहिलें ग्रंथांतर। तयासारिखा उतार। आपणहि केला ॥ सीघ्रचि कवित्व जोडिलें। दृष्टी पडिलें तेंचि वर्णिलें। भक्तिवांचून जें केलें। त्या नांव धीटपाठ ॥ कामिक रसिक शृंघारिक। वीर हास्य प्रस्ताविक। कौतुक विनोद अनेक। या नांव धीटपाठ ॥ मन जालें कामाकार। तैसेचि निघती उद्गार। धीटपाठें परपार। पाविजेत नाहीं ॥." म्हणजे बरेंचसें जगांतलें काव्य धीटपाठांत जमा करून त्याची "नाथिलें अहंतेचें पिसें" अशी बोळवण करून मग प्रासादिकाची व्याख्या देतांना रामदास प्रथम मुक्ताचें वर्णन करतात, आणि म्हणतात कीं "(मुक्ताचे) त्याचें भक्तीचें कौतुक। तया नांव प्रासादिक ॥." समासाच्या शेवटीं परत "जेणें सद्वस्तु भासे। जेणें भास हा निरसे। जेणें भिन्नत्व नासे। या नांव कवित्व ॥ जेणें होय समाधान। जेणें तुटे संसारबंधन।

जया मानिती सज्जन । तया नांव कवित्व ॥ " अशी त्यांनीं कवित्वाची व्याख्या केली आहे. पहिल्या दशकांत कवीश्वरांस नमन करतांना आपण कवींकडून कोणत्या अपेक्षा करतों हें त्यांनीं फारच उचित शब्दांत सांगितलें आहे :— " कीं हे सुखाचीं तारुवें लोटलीं । आक्षै आनंदें उतटलीं । विश्वजनास उपेगा आलीं । नाना प्रयोगाकारणें ॥ कीं हे निरंजनाची संपत्ती । कीं हे विराटाची योगस्थिती । नातरी भक्तीची फळश्रुती । फळास आली ॥. " सारांश, सॉक्रेटिसापेक्षां रामदासांची अपेक्षा अधिक व्यापक व विशाल होती.

इतकें विशाल ध्येय राखणारा कवी तितक्याच विशाल मनाचा असावा लागतो. आपल्या ध्यानांत आलें असेलच कीं प्रासादिक काव्याची व्याख्या करतांना रामदासांनीं कवीवरच अधिक भर दिला, त्याच्या काव्यावर नव्हे. कवीची कृती कशी असावी हें ठरवितांना कवीची वृत्ति कोणत्या कोटीची असावी हें निश्चित करावें लागतें. " स यत्स्वभावः कविः तदनुरूपं काव्यम् " हें महाराष्ट्री राजशेखराचें मत अनुभवाच्या कसोटीला पूर्ण उतरलेलें आहे. प्रचीति, प्रक्षोभ, प्रसाद, प्रतिभा आणि प्रयत्न हे काव्याचे पंचप्राण आहेत असें मीं माझ्या भावगीतावरील निबंधांत प्रतिपादिलें आहे.[१] प्रसाद हा शब्द मीं रामदासांच्या अर्थानें न वापरतां साहित्यांतील रूढ अर्थानें योजिला आहे हें स्पष्ट केलें पाहिजे. काव्यनिर्मितीचा सारा प्रपंच या पंचकांत सांठविला आहे. काव्याच्या ध्येयाचा आणि कार्याचा विचार करतांना प्रचीतीखेरीज इतर चार प्रकारांशीं आपणांस विशेष कर्तव्य नाहीं. काव्य ध्येयनिष्ठ असो अगर केवळ आनंदप्रधान असो, प्रचीतीशिवाय बाकी मनोव्यापार त्या चौकटींत बसणार. पण प्रचीती हेंच काव्याचें बीज असल्यामुळें जशी प्रचीती तशी काव्यकृती असें स्थूल मानानें म्हणावयास हरकत नाहीं. आत्मसात् झालेला अनुभव म्हणजेच प्रचीती. तो अनुभव स्वतःच्या सुखदुःखांतूनच आला पाहिजे असें नाहीं. इतरेजनांचा, बहुजनांचा जरी असला तरी आपलासा करून घेतां येतो. तो पचनीं पडून रक्तांत खेळला पाहिजे. अनुभव आपला असो, अगर आपलासा करून घेतलेला

१. " मुक्तक आणि भावगीत " हा निबंध माझ्या " मधुपर्क " या पुस्तकांत छापला आहे.

असो, तो जशाचा तसा त्याच स्वरूपांत सहसा संक्रामित केला जात नाहीं. कवीचें व्यक्तिमत्त्व या संक्रमणकार्यांत दिसून येतें. साधे सूर्यकिरण जाळूं शकत नाहींत. नुसत्या सूर्यकांत मण्यांत अग्नितेज नसतें. पण सूर्यकांताच्या द्वारें रविकिरण संक्रामित केले गेले कीं त्यांतून नवीनच तेज निर्माण होतें. पण सूर्यकांत कांहीं पेट घेत नाहीं. या जुन्या दृष्टांतासारखाच रसायनशास्त्रांतल्या प्लॅटिनम या संयोजकाचा--'कॅटलिस्ट'चा-एलिअटनें दृष्टांत घेतला आहे. पण अचेतनांच्या या उपमा मापाला अपुऱ्या पडतात. अनुभवाचा धांवता पारा पकडून कविमनाच्या भट्टींतून तो जावा लागतो. त्यावर त्याच्या व्यक्तिमत्त्वाचीं पुटें चढूनच मग रसायन तयार होतें हें खरें. पण या क्रियेंत कवीचें मन निर्लेप राहतें असें म्हणतां येईल काय ? अनुभव घेणारें मन निराळें आणि निर्माण करणारें मन निराळें हें एलिअटनें कल्पिलेलें द्वैत रसायनशास्त्रास शोभेल; मानस-शास्त्रास तें मान्य होणार नाहीं. प्रचीतीची आणि निर्मितीची क्रिया व प्रतिक्रिया यांचे संस्कार कवींच्या मनावर सारखे चालू असतात. महाराष्ट्रांतील मोठ्या पहाडांवर प्रखर सूर्य तापतो, वादळें आदळतात, पाऊस कोसळतो व नवी झाडीही वाढते. पण या सर्व अनुभवांमुळें, नव्या वाढीमुळें, पहाडाचें स्वरूप सारखें न कळत पालटत असतें; आणि त्यामुळें त्यांतून वाहणाऱ्या जीवनास नव्या नव्या वाटा फुटतात. खऱ्या कवीची मानसिक परिणती अशीच होत असावी.

प्रचीती आणि निर्मिती यांचे अन्योन्यसंबंध कसेही कल्पिले तरी प्रचीतीसारखें काव्य ह्या तत्त्वाला त्यानें विशेष बाध येत नाहीं. रसायनाची क्रिया एकच असेल; पण वापरलेल्या द्रव्याप्रमाणें रसायन निरनिराळ्या प्रकारचें होईल. तसेंच त्याच द्रव्यावर निराळीं पुटें चढविलीं तरी सुद्धां त्यांत फरक पडेल. सारांश, प्रचीति आणि कवीची व्यक्ती यांवरूनच काव्याचें ध्येय आणि कार्य ठरेल. व्यक्ति विशाल व प्रचीती व्यापक असली तर काव्यही विशाल व व्यापक होईल. 'Great writing is the echo of a great soul'[१] हें लॉंजायनस् ( Longinus ) चें सूत्र या तत्त्वावरच आधारलें आहे. अर्थात् कवीच्या समग्र व्यक्तिमत्त्वाचे पडसाद निरनिराळ्या कोनाकोपऱ्यांतून येतील.

१. " महात्म्याचे पडसाद म्हणजेच महा-भारत. "

त्याचे राग-द्वेष, आचार-विचार, आकांक्षा-निराशा, उल्हास-विलास, प्रसाद-विषाद ही सारी काव्याची सामग्री समजली पाहिजे. तो द्वंद्वातीत झाला असेल तर मग गोष्टच निराळी; पण जोंवर कवि निर्द्वंद्व परमहंस झाला नाहीं, तोंवर त्यानें प्रियेशीं, राष्ट्राशीं आणि विश्वाशीं केलेलें सर्व हितगुज आम्हांस हवें.

महाराष्ट्रांतील आजची कविता प्रिया, मुलें, फुलें, यांच्या मोहांतच गुरफटलेली आहे अशी वारंवार टीका करण्यांत येते. या विषयांवर कविता करणें सोपें असतें. याचें मुख्य कारण म्हणजे या अनुभवांची प्रचीति सहज मिळूं शकते. असे अनेक मंदभाग्य असतात खरे कीं ज्यांना प्रियेची माया आणि शिशूचा आशय संसाराच्या अंतापर्यंत कळतच नाहीं. तथापि कवीची दृष्टि गृहीत धरली तर असले अनुभव अगदींच सवंगसुकाळ असतात. याचा अर्थ असा नव्हे कीं काव्यांत त्यांना स्थानच नाहीं. ज्यानें प्रेमकाव्य लिहिलेंच नाहीं असा साधुसंत खेरीज करून एकही कवि दाखवितां येणार नाहीं. ज्यांनीं प्रेम-काव्याशिवाय दुसरें कांहींच लिहिलें नाहीं असे मात्र अनेक निघतील. प्रेमांत ज्या अभाग्याची समाधि लागत नाहीं त्यानें काव्याची उपाधि मागें लावून घेऊं नये. खुद्द देवाशीं झालेल्या अद्वैताचें वर्णन करतांना तुकारामाला परपुरुषाशीं रत झालेल्या विराणीचें रूपक घ्यावें लागलें. मिल्टननें फक्त एकच प्रेमगीत लिहिलें म्हणून सांगतात; पण मिल्टनला संसार सुखाचा करतां आला नाहीं आणि प्रेमाचें अमृत त्याला चाखावयास मिळालें नाहीं, हें त्याचें दुर्दैव. प्रेमगीतें महाकाव्याच्या, उदात्त काव्याच्या आड येत नाहींत हें सर्व महाकवींनीं शाबीत करून ठेवलें आहे. केवळ ध्येयनिष्ठ कविता लिहिणारा आधुनिक मयकोव्हस्की–त्यालासुद्धां शेवटीं प्रेमासाठीं आत्मार्पण करावें लागलें. आमच्या तरुण कवींचा प्रेमगीतांस्तव उपहास करण्याची प्रथा शिष्टसंमत होऊं पाहत आहे. माझ्या मतें प्रेमगीतांचा हा सुकाळ बदललेल्या काळामुळें झालेला आहे. आपल्या या पुण्यांत इंग्रेजी विद्या प्रथम सुरू झाली तेव्हां विद्यार्थ्यांना कांहीं मास्तरांस वेश्यांच्या घरून उठवून आणावें लागत असे इतकें वेश्यागमन संभावित गणलें जात होतें, असें खुद्द लो. टिळकांनींच नमूद करून ठेविलें आहे. अर्थात् कॉलेजांत मग शिष्यही

गुरूंचें व्रत पाळीत असावेत. अशा लोकांकडून प्रेमगीतांची अपेक्षा करणेंच शक्यं नव्हतें. स्त्रीला थोडेंबहुत स्वातंत्र्य मिळालें म्हणजेच तिची प्रेमगीतांनीं आराधना करतां येते. केवळ उपभोगासाठींच बाळगलेल्या नुसत्या हाडाकातड्याच्या पुतळीला गाऊन तरी काय दाखविणार ? प्रेमगीत हें प्रकृति-पुरुषांच्या पिंग्यांतून निर्माण होतें. म्हणूनच शेलीनें म्हटलें आहे कीं, " स्त्रीला स्वातंत्र्य मिळालें तेव्हां वैषयिक प्रेमाची कविता निर्माण झाली. " ( The freedom of women produced the poetry of sexual love ). मला तर असें वाटतें कीं, स्त्री-स्वातंत्र्याचा हा अनुभव आम्हांला नवाच असल्यामुळें जसजसा तो फैलावेल तसतशा अचकटविचकट लावण्या मागें पडून प्रेमगीतेंच समाजांत जास्त पसरतील. ज्यांना हा अनुभव आतां नवीन राहिला नाहीं त्या पांढरपेशा कवींचें लक्ष दुसऱ्या ध्येयांकडे वळतेंच आहे. प्रेमाच्या ' चित्रा ' ताऱ्यापासून जरी आधुनिक काव्याला सुरुवात झाली असली, आणि हा ' चैत्र ' पक्ष जरी मोठा असला, तरी आतां नुकतीच 'विशाखे'पर्यंत मजल आली आहे. अशीच प्रगति होत राहिली तर ' रेवती ' तारा आपण खचित गांठूं. तसें पाहूं गेल्यास मराठी कवींना स्त्रीप्रेमाशिवाय दुसरा विषयच उरला नाहीं हा आरोप सरसकट सर्व कवींवर शाबीत करण्यास कितीसे टीकाकार पुढें सरसावतील ? केशवसुत, टिळक, माधवराव पटवर्धन, तांबे, यांना होनाजी-सगन-प्रभाकरांच्या दावणींत बांधणाऱ्या विचारवान पाणिनीला आपली अक्कल खचित पणास लावावी लागेल. इतर काव्यांबरोबर त्यांनीं प्रेमगीतें लिहिलीं तर त्यांत काय बिघडलें ? कवींना उद्देशून ' राष्ट्र नाहीं तर प्रियाही नाहीं ' असा संदेश आपल्या संमेलनाच्या एका माजी अध्यक्षांनीं दिला होता. पण आज राष्ट्र आपलें झालें नाहीं म्हणून कितीसे लोक प्रियेला सोडून राख फांसून बसले आहेत बरें ? सर्वांस प्रिया जोडावी असें वाटत असतांना कवींनीं मात्र तिला सोडावी हा उपदेश कवींना जरासा साळसूदपणाचा वाटला तर त्यांना दोष देतां येईल काय ? मला हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे कीं परांजप्यांची अशी रास्त अपेक्षा होती कीं प्रिया संभाळून कवींनीं राष्ट्रीय स्वरूपाचीं " तीस कोटी लोकांच्या भावना प्रसादपूर्ण ग्रथित केलेलीं " काव्यें लिहावींत. " लढाईवर विजयी होऊन परत आलेल्या एखाद्या साहित्यिकानें मौजेची कविता लिहिली तर तें क्षम्य होईल. "

"सैनिक कॉलेजांतील तरुणांनीं एखादी प्रेमकथा वाचली वा सुनीत लिहिलें तरी चालेल." "दिल्लीच्या बादशाहाची दाढी जाळून आल्यावर पहिले बाजीरावहि मस्तानीच्या अंत:पुरांत एखादें पान खातांना आढळत." इत्यादि उद्गारांत मात्र काव्य म्हणजे रंडागीत हीच जुनी अपेक्षा फिरून प्रकट होते. काव्य म्हणजे वीरांनीं नाटकशाळेच्या विलासांत चघळलेली पानपट्टी हें काव्याचें वर्णन जर सत्य असेल, तर मागणी तसा पुरवठा या न्यायानें कवींच्या मुख-रसानें भरलेल्या पिकदाण्याच शेवटीं आम्हांस झेलाव्या लागतील. प्रेमगीतांवर वास्तविक निराळीच टीका केली पाहिजे. कवींस आपणांस असें सांगण्याचा अधिकार आहे कीं, "तुमच्या घरगुती जीवनाशीं आम्हांस कर्तव्य नाहीं. तुमच्या खासगी कुळकथा ऐकावयास आम्हांस वेळ नाहीं. तुमच्या काव्यांत जर आमच्या भावनांचे, आकांक्षांचे, सुखदुःखांचे पडसाद उमटत असतील तरच आम्ही लक्ष देऊं. तुम्ही तुमच्या कूपाच्या बाहेर येत नाहींना ? मग चालूं द्या तुमच्या मंडूक-प्लुत्या तेवढ्याच आवारांत. तुम्हांस आणि तुमच्या संवगड्यांस तें तुमचें आरटन म्हणजे वेदघोष वाटत असेल; पण आमचे कान मात्र किटून गेले !"

अथांग समाज-सागरांत संचार करणें सर्वांसच साधत नाहीं. त्या सागरांत बुडी मारून तळाशीं असलेलीं रत्नें वर आणण्याची कला अवघड आहे. पण जे जे म्हणून मोठे कवि झाले आहेत त्यांनीं आपल्या काळाच्या लोकहृदयाशीं लय साधण्याचा प्रयत्न केला आहे. कवि हा त्या काळच्या राष्ट्र-पुरुषाचें मुख झाला तरच त्याच्या वाचेमागें समाजाचा भावार्थ धावत येईल ! मध्ययुगाच्या अंधारांत प्रजा चांचपडत असतां प्रकाशाकडे नेणारा डान्टे, यंत्रयुगाच्या आरंभीं समतेचीं स्वप्नें सांगणारा शेली, पंडितांच्या अहंकाराच्या वेटोळ्यांतून अमृताचे घट हिरावून आणून शूद्रांस मुक्तहस्तानें वांटणारा ज्ञानेश्वर—ह्या सर्वांनीं समाज व व्यक्ति यांतील आडपडदा काढून टाकला होता. आपली भावना ती लोकांची व लोकांची भावना ती आपली इतका मनाचा व्यापार केल्यावर, ते अपार काव्य-संसाराचे प्रजापति होऊं शकले यांत नवल काय ? याच अर्थानें मयकोव्हस्कीनें आपल्या शब्दांच्या दुकानाला ( Word-shop ) "समकालीन घडामोडींच्या सर्वोत्तम प्रकटीकरणासाठीं प्रयोगशाला" ("A laboratory for the best

expression of contemporary facts " ) असें म्हटलें आहे. कवि कविता कशी लिहितो या आपल्या निबंधांत त्यानें एकच गोष्ट अग्रगण्य म्हणून मांडली आहे, आणि ती म्हणजे " काव्यान्यतिरिक्त न सुटणारा सामाजिक प्रश्न " ( " The existence in society of a problem the solution of which is inconceivable except in terms of a poetic work " ). अर्थात् असल्या प्रश्नाचा निकाल करण्यासाठीं समाजाच्या अडचणी काय आहेत याचें यथार्थ ज्ञान हवें. समाजाची चेतना कवीच्या मनांत आली म्हणजे पुढें जन्मास येणारा नवा अवतार कौसल्येप्रमाणें त्याच्या अंगांत आधींच संचरतो. ' समाजाच्या जागृतीचा साथीदार ' या शैलीनें केलेल्या कवीच्या वर्णनाचा मयकोव्हस्कीनें निराळ्या शब्दांत पुनरुच्चार केला आहे.

याप्रमाणें कवीला जर आपल्या काळाचा मनु व्हावयाचें असेल तर त्याला लोकांस असें सांगतां आलें पाहिजे कीं "समानं मनः सह चित्तमेषां ।...समानी व आकूतिः समाना हृदयानि वः । समानमस्तु वो मनः यथा वः सुसहासति ॥." पण आज लोकांशीं सहचित्त होण्याच्या मार्गांत अनेक अडचणी आहेत. जनमनाशीं प्रत्यक्ष संबंध कमी येऊं लागला आहे. देवळांत, जत्रेंत, बाजारांत बसून लोकांशीं गप्पा मारतां येत नाहींत. रेडियो, ग्रामोफोनसारख्या यंत्रांमार्फत त्यांची तोंडओळख देखील होत नाहीं. तशांत आमचे कवि मध्यम वर्गाचे. जुन्या आचारविचारांचे बंध त्यांच्या जीवनांत शिथिल होत चालले, ते बहुजनांशीं निगडित कसे राहणार ? लोकांचे सारे संस्कार बाळगणारा लिंगदेह हें जर वर्णन कवीला लावावयाचें असेल, तर त्याला समाजाच्या स्थूलदेहांत प्रवेश केलाच पाहिजे. शेतकरी, मजूर यांच्या समाजांत जो खुद्द वावरत नाहीं त्याच्या काव्य-नाडीचे ठोके लोकांत खेळणाऱ्या ताज्या रक्ताबरोबर कसे पडतील ? मयकोव्हस्की मजूरांचा इतका मित्र होता कीं ओडेसा येथील गोदींत काम करणाऱ्या मजुरांना तो आपल्यापैकींच वाटत असे. तुझें ' लेनिन ' हें काव्य जरा स्वस्त किंमतींत छापावयास सांग असें एकदां तेथील मजुरानें त्याला रस्त्यानें जातां जातां विनविलें आणि म्हणूनच त्याच्या कवितांच्या लक्षावधि प्रति खपल्या. आमच्यापैकीं किती कवि ' जनमित्र ' या संज्ञेस पात्र आहेत ? इतकी पात्रता नसतांना केवळ नवी टूम म्हणून जर आम्ही मजुरांचें जीवन

ग्रथित केलेल्या समाजसत्तावादी ( Socialist ) कविता लिहूं लागलों तर मार्क्सवादावर एक नवें भक्तिकाव्य लिहिल्याचें श्रेय मात्र आमच्या पदरीं पडेल. ज्याची प्रचीतिच आली नाहीं तें सत्य काव्यांत सांगावयाचा प्रयत्न जर आम्हीं केला तर तें काव्य केव्हांही कृत्रिमच वाटणार. अनुभव आत्मसात् न झाल्यामुळें काव्य श्वानाच्या वमनाप्रमाणें किळसवाणें होईल. त्यांत "श्री" नसल्यामुळें तें खरोखर अश्रील म्हणजेच अश्लील होईल ! त्यापेक्षां सत्याला स्मरून आपापल्या खऱ्या वृत्तीप्रमाणें काव्य लिहावें हा उत्तम मार्ग. समोर चाललेल्या प्रचंड घडामोडींपुढें आपण यःकश्चित् पामर आहोंत असेंच आमच्यापैकीं पुष्कळांस वाटतें. या प्रचीतीला अनुकूल अशी विषादाची, निर्वेदाची कविता कां लिहूं नये ? कधीं कधीं तीव्र असंतोष वाटतोना ? मग ऑडन्सारखी उपहासाची कविता कां लिहीत नाहीं ? युद्धावर काव्यें लिहावीं असें सर्वांस वाटतें; पण प्रत्यक्ष समरांगणीं लढल्यानंतर जी प्रचीति येते ती युद्धाच्या अरम्य वार्ता दुरून ऐकून येईल काय ? गेल्या महायुद्धांत प्राणदान देणाऱ्या विल्फ्रेड ओवेन ( Wilfred Owen ) ला "युद्धाचें खरें काव्य निर्वेदांत, कारुण्यरसांतच आहे. आणि धोक्याचा इशारा देण्यापलीकडे कवि तरी काय करणार ? म्हणूनच जो खरा कवि असेल त्यानें सत्य सांगितलें पाहिजे," ( " The Poetry is in the pity, and all the Poet can do to-day is to warn. That is why the true Poet must be truthful. " ) असें पटवून देतां आलें. त्याची 'Disabled' ही एकच कविता वाचा म्हणजे युद्धाचें सत्य समजेल. स्टीफन स्पेन्डर स्पेनच्या युद्धांत हेंच सत्य शिकला. त्याचींच या विषयावरील दोन वाक्यें मी आपणांस वाचून दाखवितों. तो म्हणतो, "उत्कृष्ट कलेंत नीतीचा भाग असतो; मग कवीला एखादें विशिष्ट उद्दिष्ट साधावयाचें असो अगर नसो. पण एका विशिष्ट नीतितत्त्वाच्या अगर राजकीय धोरणाच्या प्रचाराप्रीत्यर्थ लिहिलेल्या लिखाणांत खालील दोन परिस्थितींत कलेचा नाश होईल – ( १ ) जेव्हां स्वतःचा विवेक मागें ठेऊन एका विशिष्ट राजकीय पक्षाच्या पद्धतीनें लेखक जीवन मापूं लागतो तेव्हां; व ( २ ) मानवी जीवनाच्या व समाजाच्या भविष्याच्या ज्ञानाची कलावंत म्हणून प्रचीती आली नसतांसुद्धां आपणांस ती झाली आहे असें आत्मविश्वासाच्या जोरावर गृहीत धरून तो लिखाण करतो तेव्हां."

(What I am asserting is that the greatest art is moral even when the artist has no particular axe to grind. Conversely, that having a particular moral or political axe to grind does destroy art if the writer ( a ) suspends his own judgement and substitutes the system of judging established by a political creed, and ( b ) assumes knowledge of men and the future course of history which he may passionately believe but which as an artist he simply has not got. )

एक वेळ प्रचीतीची उचलेगिरी चालेल पण माझ्या मतें प्रयत्नांची उचलेगिरी निव्वळ आत्मघातकी होय. बहुजनांकरितां काव्य लिहावयाचें असेल तर तें त्यांच्याच भाषेंत लिहा असें सर्व महाकवि कंठरवानें सांगत आले आहेत; पण आम्हांला नवखेपणाचा मोह आवरतच नाहीं, आणि त्या मोहपटलानें ध्येय देखील झांकून जातें. असें सांगतात कीं रामकृष्ण परमहंसांची समाधि लागली असतां नुसता त्यांचा स्पर्श झाला तरी इतरांस सुद्धां तीच अवस्था प्राप्त होत असे. कवीची जरी समाधि लागली तरी त्याला शब्दांमार्फतच आत्मस्थिति सांडवितां येईल. शब्द म्हटलें कीं परंपरा उभी ठाकलीच ! म्हणून खरा कवि तो कीं जो परंपरेचे सर्व धागेदोरे सांभाळूनच काव्य विणील. त्याप्रीत्यर्थ जुन्या मराठी काव्याचा कसून अभ्यास कवींनीं केलाच पाहिजे. एकट्या एकनाथी भागवतांत आम्हांला पुरून उरेल इतकी शब्दसंपत्ति सांपडेल. भाषांतर केलेले उसने शब्द कां वापरावे ? तसेंच शब्दांची ठेवण जनमनांत कोणत्या स्वरूपांत सांधली आहे हें पहावयास नको काय ? यमकें, प्रास, ताल, संगीत यांतून तें मन मुक्त झालें आहे काय ? मग मुक्तछंदाचा तें छंद घेईल तरी कसा ? आमचे जुने मराठी कवी अखिल हिंदुस्थानाकरितां लिहितांना त्या काळच्या 'सबकी बोली' चा आधार घेत असत. आम्ही आज तसें कां करूं नये ? आम्ही आमच्या काव्याचा वारसा सोडतां कामा नये. खऱ्या कवीला तो सुटणारच नाहीं. आजच्या युगांत कल्पनांचा एकच आत्मा सर्व वाङ्मयांत सांपडेल कदाचित्; पण त्याची कुडी भिन्न राहणारच. जपानी, नीग्रो, इंग्रज,– सर्व मातांच्या उदरीं गर्भाची एकाच तऱ्हेनें वाढ होते. पण बाळें मात्र एकसारखीं नसतात. काव्यांतील प्रचीतीला असाच निरनिराळा अवतार घ्यावा

लागतो. शब्दाचे, तालाचे, कल्पनांचे आनुवंशिक संस्कार घेऊनच काव्यें जन्मास आलीं पाहिजेत. तरच तीं आम्हांस आपलीं वाटतील. पिंगट केस, निळे डोळे आणि गोरी त्वचा घेऊन जर तीं आलीं, तर तीं कमअस्सल होतील; शिवाय आमच्या संस्कृतीस तीं पारखीं होतील.

याप्रकारें आपल्या लोकांचीं व कालाचीं काव्यें जो निर्माण करतो, त्यास रामदासांचा शब्द योजून आपण "जनस्वी" कवि म्हणूं. हें विशेषण रामदासांनाच खुद्द लागू केलें पाहिजे. आतांपर्यंत मयकोव्हस्कीच्या नांवाचा मीं किती तरी वेळां उच्चार केला. आपणांस कदाचित् वाटेल कीं, घरच्या नांवाचा यास विसर पडला असावा. लोककवि या दृष्टीनें रामदास आणि मयकोव्हस्की यांत बरेंच साम्य दिसतें. दोघेही आपल्या श्रोत्यांत सारखे वावरत होते. प्रचलित प्रचारसाधनांचा दोघांनींही भरपूर उपयोग करून घेतला. दोघांचीही पद्यरचना उदंड आणि सारखी चालू होती. रस्त्यानें जातां-येतां मयकोव्हस्की कविता गुणगुणत फिरत असे व पुढें उपयोगी पडणाऱ्या कल्पना व शब्द टिपून ठेवीत असे. रामदासांचें, 'जो लेखणी-सहित कागद दौति वाहे ।' हें रघुनाथपंडितानें केलेलें वर्णन सुप्रसिद्धच आहे. जाहिरातीपासून महाकाव्यापर्यंत मयकोव्हस्की लिहीत असे आणि संसारांतील कीडमुंगीसारख्या बारीकसारीक गोष्टींपासून तों वेदांतापर्यंत रामदासांची प्रतिभा चाले. दोघांच्याही शब्दाच्या दुकानांत सारखाच व्यापार चालू होता. देशार्थच त्यांतून निष्पन्न होत असे. केवळ परोपकाराकरितां दोघांचीही कविता रचिली गेली. रामदासांनीं मुद्दामच अशीं ठणठणीत वृत्तें योजिलीं कीं जीं लोकांच्या कानांत दुमदुमत राहावींत. तीं वृत्तें इतर मराठी कवींनीं क्वचित्च वापरलीं आहेत याची साक्ष आपणांस माधवरावांच्या 'छंदोरचनें'त मिळेल. त्या काळचे प्रश्न रामदासांच्या वाङ्मयांत निश्चयात्मक समाधान होईल अशा रीतीनें सोडविलेले आहेत. प्रपंच आणि परमार्थ यांचा मेळ कसा घालावा, हा त्या काळीं महाराष्ट्रापुढें असणारा प्रश्न त्यांच्या काव्याचा मुख्य प्रतिपाद्य विषय. त्याप्रीत्यर्थ क्वचित् धीट उद्गार काढावे लागले, तरी त्याची त्यांनीं क्षिति बाळगिली नाहीं. नाहींतर "म्लेच्छ दुर्जन उदंड" किंवा "बुडाला औरंग्या पापी" यासारखी वाणी त्यांनीं खुद्द प्रासादिक म्हणून वाखाणिली

नसती. सारांश, कवि जनस्वी झाला म्हणजे त्याला आपण बंधनें घालूं नयेत. त्याची कृति "नियतिकृतनियमरहित"च शोभते. त्याच्या काव्यांत सर्व प्रकारच्या काव्यांचा अंतर्भाव आपोआप होईल.

अशा रीतीनें जनमनाचा ठाव घेऊन, परंपरा राखून कविता निर्माण करतांना मानवतेच्या सनातन ध्येयाचा विसर पडूं देतां कामा नये. जनमनाचा ठाव घेणें म्हणजे वरची घाण उपसणें नव्हे. बुडी मारतांना हातीं शेवाळगवतच येण्याचा संभव फार. लोकांकरितां कविता लिहिणें, म्हणजे लोकांना पाहिजे अशी कविता लिहिणें नव्हे, तर त्या काळास पुढें नेणारी, त्या काळाला कल्याणकारी अशी कविता लिहिणें होय. समाजांतील सत्यांत विश्वांतील ऋत स्थापित करणें हें तर कवीचें मुख्य कार्य. म्हणजे समकालीन लोकांत संचरणाऱ्या क्षुद्र द्वेषादि भावनांचें विष कवीनें पचनीं पाडलें पाहिजे. समाजांतील भिन्नत्व नाहींसें करतांना विश्वाशीं दगलबाजी करून चालणार नाहीं. म्हणूनच गटेला राष्ट्राभिमानाची, म्हणजे इतर राष्ट्रांच्या द्वेषाची, कविता लिहितां आली नाहीं. सारांश, ज्याला त्या युगाचा कवि होणें आहे, त्यानें आपला नावेचा मार्ग विश्वप्रेमाच्या अढळ ध्रुवताऱ्याच्या साहाय्यानें काढला पाहिजे; म्हणजे मग तो तारूं मानवतेच्या बंदरांत नेऊं शकेल. त्या कवीला सॉक्रेटिसाच्या सुराज्यांत प्रवेश मिळण्यास हरकत होऊं नये. पण रामदास मात्र अजून त्याला बाहेरच ठेवतील. उच्चार आणि आचार यांतील भेद नाहींसा करून टाकून तुम्ही आपल्या आयुष्याचें अखंड महाकाव्य केलें आहे काय ? साहित्याबरोबर शांति प्राप्त झाली आहे काय ? असे बिकट प्रश्न ते त्याला विचारतील. सर्वसाधारण कवीला ही परीक्षा पास होणें कठिण. "कश्चित् यतति सिद्धये" हें वर्णन लागू पडणारा एखादाच महाकवि तेथें धडपडतांना दिसेल. महदनुभवाच्या जोरावरच रामदास त्याला कवि म्हणून संबोधण्यास तयार होतील. "महदनुभवेश्वरी" लिहिण्याची तयारी असल्याशिवाय काव्यांत "परतत्त्व" येणार कोठून ! हा महदनुभव सांगतां येत नाहीं म्हणतात. माझ्या दीन वाणीनें तेथून परत फिरावें हेंच बरें.

भा५।५५
८७३०२
संगणकीकृत
३६, भवानी पेठ